म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निषेध
सं. क्र. 2669



REFBK-0023267

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा ी भरावी लागेल.

18 OCT 1981

17 MAY 1984

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

निबंध
२८७
२३२.६७
२५८८७

कॉ. ई. एम. एस. नंबुद्रीपाद

गांधीजी आणि त्यांचा वाद

(Gandhiji and Ism)

– अनुवादक –

मा. ह. हातिवलेकर


REFBK-0023267

विश्वभारती प्रकाशन, नागपूर – १२

गांधीजी आणि त्यांचा वाद

मूळ पुस्तक – Gandhi and Ism
कॉ. ई. एम. एस. नंबुद्रीपाद

अनुवादक : – मा. ह. हातिवलेकर
'प्रशांत' रुक्मिणी नगर, अमरावती

प्रकाशक :

आ. बी. सिंह
विश्वभारती प्रकाशन
धनवटे चेम्बर्स,
सिताबर्डी, नागपूर–१२

मुद्रक :

श्री. जे. जी. गडीकर
गोविंद प्रिंटींग प्रेस,
आयचित मंदीर, नागपूर

मूल्य १५–००

– अंतरंग –



i	vii	द्वितीयावृत्तीची प्रस्तावना	
१	२	भूमिका	१
३	१०	सुरवातीची वर्षे	२
११	२३	असहकार	३
२४	२९	पहिला तडा	४
३०	३६	संपूर्ण स्वराज्य	५
३८	४५	मिठाचा सत्याग्रह	६
४६	५२	राजकारणापासून अलिप्त	७
५३	५५	संयुक्त मोर्चा	८
५६	६३	अधिकारग्रहण आणि नंतर	९
६४	७०	कार्यकारी समितीशी मतभेद	१०
७१	८१	'चले जाव' आणि त्यानंतर	११
८२	८८	१५ ऑगस्ट : जय की पराजय ?	१२
८९	९४	गांधीवादाचा अन्वयार्थ !	१३
९५	१०२	गांधीजीनंतरचा गांधीवाद	१४

द्वितीयावृत्तीची प्रस्तावना

"कम्युनिझम् मधून हिंसाचार वजा केला असता गांधीवाद शिल्लक राहतो," असे अनेक प्रख्यात गांधीवादी म्हणतात. पण हे विधान सत्य आहे काय ? अथवा "गांधीवाद हा गुणात्मक दृष्टचा मार्क्सवाद-लेनिनवादापेक्षा अगदी वेगळा आहे," असेही काही प्रख्यात गांधीवादी व सर्वच मार्क्सवादी मानतात, यात सत्य आहे ?

आपल्या देशाच्या भावी कालासंबंधी जे लोक विचार करतात त्यांच्यातील चर्चेला हा प्रश्न निश्चितच आव्हान देणारा आहे. कारण साम्यवादाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या देशाने कोणता मार्ग स्वीकारावा, या संबंधीचे आपले समज वरील प्रश्नाच्या अचूक उत्तरावर अवलंबून आहेत.

अर्थात् याच कारणामुळे गांधीवाद व कम्यूनिझम् यांच्या मूल्यांचा काळजीपुर्वक अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. मार्क्सवादाच्या तत्वज्ञानावर अफाट साहित्य असल्यामुळे त्याचा अभ्यास करणे सोपे आहे. उदा. एंजल्सचे "Socialism-utopian Scientific", लेनिनचे 'Karl Marx,' स्टेलिनचे Dialectical & Historical Materialism— इत्यादी ग्रंथांमधून मार्क्सवादाच्या मूल तत्त्वांचा सार रूपाने अभ्यास करावयास मिळतो. परंतु गांधीवादाबद्दल हे काम तितकेसे सोपे नाही. गांधीजीच्या आयुष्यातील कार्य कालाचे मूल्य मापन–त्यांची भाषणे आणि हजारो पानांच्या लिखाणांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय कोणतेही मूल्य मापण गांधीवादाबद्दल करता येणार नाही. सार रूपाने गांधी वादाचीं मूल तत्त्वे डोळचा खालून घालता येतील असे एकही लिखाण अजून उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत गांधी–एक व्यक्ती, त्यांच्या कल्पना किंवा त्यांचे जीवित कार्य यांचा अभ्यास करावयाचा म्हटले तर श्री. डी. जी. तेंडूलकर किंवा श्री. प्यारेलाल यांच्या चरित्रात्मक ग्रंथाचा अभ्यास केल्याशिवाय हे कार्य शक्य होणार नाही. अशा चरित्रात्मक ग्रंथांवरूनच गांधीजींच्या तत्वज्ञानाचा गाभा व त्याची प्रत्यक्ष कार्यवाही-यांची कल्पना येऊ शकेल. अर्थात् विविध दृष्टिकोणातून–विविध व्यक्तींनी केलेल्या मूल्यमापनातून काढलेले निष्कर्षही वेगवेगळेच निघणे अपरिहार्य असले तरी त्यातूनच गांधीवादाचे स्वच्छ चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहणार आहे.

या पूस्तकाची प्रथमावृत्ती १९५८ सालात वाचकांच्या हातात पडली व त्या बरोबरच अनेक मित्र मंडळी कडून उलट सुलट टीकात्मक सूचनांचा तसेच गर्भित कुत्सेचा भडिमार होऊ लागला. पण या संधीचा फायदा घेऊनच गांधीवादाकडे पाहण्याच्या माझ्या दृष्टिकोणाचा फेरविचार करणे मला शक्य झाले.

भारतातील राष्ट्रीय चळवळ व समाजवादाचा एक विनम्र अभ्यासक या नात्याने गांधीवादाच्या अनेक पैलूंकडे पाहण्याचा माझा प्रयत्न माझे वरील मित्र व सूज्ञवाचक समजून घेतील अशी मला आशा आहे. याच प्रक्रियेतून आणि विचारांच्या देवाण घेवाणींतूनच योग्य मूल्यमापन होण्याची शक्यता जास्त आहे.

महात्माजी व त्यांचे कार्य, यांचे मूल्यांकन मार्क्सवाद–लेनिनवादाच्या जागतिक दृष्टिकोनातून मी केलेले आहे. परंतु येथे एक गोष्ट मात्र मला स्पष्ट करावयाची आहे. ती ही की गांधीवाद म्हणजे मी मार्क्सवादी झाल्यानंतर केलेला अभ्यास किंवा निव्वळ टिकात्मक दृष्टिकोन ठेवून केलेला अभ्यास आहे, असे नाही.

भारतातील अनेक मार्क्सवाद्यांप्रमाणेच मी देखील मार्क्सवादी होण्याच्या पूर्वीपासूनच गांधीजींचा एक अनुयायी होतो, गांधीवाद किंवा गांधीवादी विचार प्रणालीतूनच लेनिनवादाकडे मी प्रवेश केलेला आहे. गांधीजींचे व्यक्तीमत्व आणि १९२०–२१ मध्ये त्यांनी सुरू केलेली राष्ट्रव्यापी चळवळ यातूनच माझ्या राजकीय जाणिवेचा उगम झाला आहे. त्या कालातील असहकाराच्या देशव्यापी झंझावाताने केवळ ११–१२ वर्षांचा असतानाच मीं झपाटला गेलो होतो. गांधींच्या चळवळीच्या बातम्या त्या वेळच्या मल्याळी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असत व त्यातून एक वेगळेच जग माझ्या समोर उभे राहत असे. आणि त्याच कालापासून मी महात्माजी व त्यांच्या शिकवणीतून वाढत आलो आहे. स्वराजिस्ट आणि नाफेरवादी यांच्या खडाजंगीतून माझी सहानुभूती नेहमीच नाफेरवाद्यांकडे झुकलेली असे. त्या कालात मी माझ्यावर गांधीजींच्या विधायक कार्यकर्त्यांची शिस्त लादून घेतली होती. आणि त्याची पूर्व चिन्हे आंजही माझ्या दैनंदिन कार्यक्रमात आढळून येतील. गांधीवादातूनच पं. ज. नेहरूंच्या डाव्या व क्रांतीकारक विचारसरणीचा उगम होत असतानाच मी नेहरूंच्या जहाल पक्षाचा कट्टर अनुयायी बनलो आणि त्या नंतर नेहरू इतके जास्त जहाल व डाव्या पक्षाकडे वळले की त्यातूनच कांग्रेस सोशालिस्ट पक्ष उदयास आला. व मीं त्याच पक्षाचा अनुयायी बनलो. (या पक्षाचे संस्थापक व सरचिटणीस आणि प्रसिद्ध पुढारी श्री. जयप्रकाश नारायण-हे गांधीजी नंतरचे गांधीवादी पुढारी बनले आहेत)

गांधीवादाच्या डाव्या विचारसरणीतूनच मीं मार्क्सवाद–लेनिनवादाकडे उडी घेतलीं. येथे एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते, की श्रीं जयप्रकाश सारख्या नामवंत पुढाऱ्यांनी अशी उडी न घेतल्यामुळेच कित्येक पुढाऱ्यांनी मार्क्सवादाच्या अगदी जवळ जाऊनही पुन्हा गांधीवादाकडे उलटच्या सुलटच्या उड्या घेतल्या.

श्री तेंडूलकर यांच्या म. गांधींच्या चरित्राच्या ८ भागापैकी १ ला भाग वगळता इतर ७ भाग हे माझ्याकरिता इतिहासात्मक नसून भारतातील राष्ट्रीय

चळवळीच्या १ ल्या दशकातील फार कृतिशील नसलो तरी केवळ एक स्थितीप्रज्ञ असा प्रेक्षक ही मी नव्हतो. परंतु नंतरच्या २ दशकात मात्र मी अत्यंत कृतीशील असा कार्यकर्ता होतो. येथे वाचकांच्या नजरे समोर मला आणखी एक गोष्ट आणून द्यावीशी वाटते ती ही की प्रसिद्ध गांधीवादी पूढाऱ्यांच्या अगदीं नजीकच्या सहकाऱ्यांबरोबर राहण्याचे भाग्य देखील मला त्या कालात लामले आहे. वेलोर जेल मधील १९३२–३३ सालातले १।। वर्ष मी पुढील नामवंत गांधीवादी पुढाऱ्यांच्या व्यक्तीगत सहवासात घालविले आहेत. त्यात श्री. सी. राजगोपालाचारी– म. गांधींचे 'विवेक रक्षक'– तसेच गांधीवादाचे विद्वत्तापूर्ण आलोचना करणारे डॉ. पट्टाभी किंवा नाफेरवादी संत देशबंधू कोंडा व्यंकटप्पा, गांधीजींच्या विरक्ती-वादाचे मूर्तिमंत उदा. असे वुलुसू सांबमूर्ती– वगैरे पुढारी होते. पण त्या सर्वांचे आपआपसातीस हिणकस विनोद, उथळ टीका– या सर्वांची आज आठवण केली असता मला उबग आल्यासारखे वाटते.

म. गांधींच्या चळवळीतील माझा सक्रिय भाग आणि वरील व्यक्तींचा वैयक्तिक सहवास– या पार्श्वभूमीवर मी 'गांधीजी आणि त्यांचा वाद' ही समालोचना लिहिली आहे. स्वाभाविकपणेच माझ्या समोर दोन प्रश्न उभे राहतात. एकतर १९२०–२१ च्या व त्या नंतरच्याही चळवळीत माझ्यासारखे लाखो तरूण स्त्री पुरुष गांधीवादी चळवळीत सहभागी का झाले ? तसेच अशाच लाखो तरुण स्त्री–पुरुषांना यां गांधींच्या चळवळीचा उबग येऊन ते प्रथम शेकडयांनीं व नंतर हजारांनी कम्यूनिझमकडे वळले, असे का ?

म. गांधींची जीवनकथा आणि भारताच्या राजकारणातील त्यांचा सहभाग यांचे सिंहावलोकन केले तरच या प्रश्नांची उत्तरे देता येतील. ज्या विशिष्ट युगात गांधीजी जन्मले, ज्या विशिष्ट भौतिक प्रवाहात गांधींचे व्यक्तिमत्व आणि राजकीय दृष्टिकोन यांचा विकास झाला–किंवा ज्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव तत्कालीन राजकीय जीवनावर पडला, किंवा समाजातील विविध थरांच्या लोकांमध्ये बदल घडवून आणण्याचे विशिष्ट तंत्र ज्यांनी विकसीत केले त्या सर्व घटनांचे काळजीपूर्वक परीक्षण, त्यांचा अन्योन्य संबंध किंवा वैशिष्टय– यांचा मागोवा घेणें आवश्यक आहे. आणि प्रकरणे २ ते १२ यात मी नेमका हाच प्रयत्न केलेला आढळेल. या परीक्षणाचा समारोप 'गांधीवादाचा अन्वयार्थ' या प्रकरणात झालेला आहे.'

बहुतेक टीकाकारांनी हेच प्रकरण आपल्या टीकेचां विषय बनविले आहे. गांधीजींच्यां मी केलेल्या मूल्यांकनातील विरोध दर्शविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कोटयावधी ग्रामीण जनतेला दीर्घकालीन निद्रावस्थेतून जागृत करण्याचे महत्कार्य त्यांनी केले आहे, असे विधान मी एकीकडे करतो तर दुसरीकडे ते

भांडवलदार वर्गाचे पुढारी होते असे ही मी म्हणतो. यात परस्पर विरोध नाही काय, असा त्यांचा सवाल आहे. परंतु बुर्ज्वा– भांडवलदार वर्गीय विचार सरणी ही उपाधी व्यंगात्मक दृष्टीने वापरली तरच त्यात परस्पर विरोध दिसेल, असे मला नम्रतापूर्वक सुचवावेसे वाटते. कोणत्याही प्रश्नाकडे पाहण्याचा एखाद्याचा वर्गीय दृष्टिकोन 'कामगार वर्गीय' म्हणण्या ऐवजी 'भांडवलदारी लोकशाहीवादी असे म्हणणे याचा अर्थ प्रत्येक प्रश्नाकडे पाहण्याचा त्या व्यक्तीचा दृष्टिकोन मागासलेला आहे असा होत नाही. मार्क्सवाद–लेनिनवादाचे संस्थापक किंवा पुढारी यांच्या लिखाणाचा उल्लेख देखील पुढील गोष्टींबद्दल कोणाचीही खात्री करून देण्यास पुरेसा होईल. प्रत्येक देशातील राष्ट्रीय लोकशाही चळवळीच्या इतिहासात किंवा चळवळीच्या विशिष्ट अवस्थेत भांडवलदारी वर्गानेही सरंजामशाही, वसाहतवाद किंवा दोघां विरूद्धही बहुजन समाजाला संघटित करण्यात व चेतविण्यात फार मोठा वाटा उचललेला आहे आणि मार्क्सवादी विचारवंतानी भांडवलदार वर्गाचे हे श्रेय कधीहीं नाकारले तर नाहीच पण त्याचबरोबर त्यानी भांडवलदार वर्गीय पुढाऱ्यांच्या गंभीर मर्यादा देखील दाखवून दिल्या आहेत– उदा. १७८९ ते १७९३ मधील भांडवल शाहीच्या पुढाकाराखाली झालेली वैशिष्ट्यपूर्ण फ्रेंच राज्यक्रांती म्हणजे सरंजामशाहीवर केलेला जबरदस्त आघात असूनही याच भांडवलदारांनीं यांच क्रांती युद्धात एका विशिष्ट अवस्थेपर्यंत क्रांती आली असतांना श्रमिक शेतकरी वर्गाचा विश्वासघात केला आहे, हे आपणास माहित आहे. वास्तविक पाहता मार्क्स–एंजल्स यांनी लिहिलेल्या काही पुस्तकात फ्रेन्च राज्य क्रांती व त्यानंतर झालेल्या अनेक क्रांतीयुद्धाचे सुंदर वर्णन केले आहे. लेनिनने देखील वासाहतीक, अर्धवासाहतिक किंवा गुलामगिरीत असलेल्या देशात झालेल्या राष्ट्रीय मुक्ती आंदोलनातील भांडवलशाहीने वापरलेल्या दुटप्पी धोरणाचे स्थान दाखविण्यावर विशेष भर दिला आहे. म्हणूनच ज्यांना भांडवलवादाच्या दुहेरी स्थानाचे अचूक मूल्यमापन करता येत नाही त्यांनाच गांधीजींना भांडवलदार वर्गीय असे म्हणण्यात त्यांचा उपहास केल्यासारखे वाटते. आणि त्यांनाच माझ्या म. गांधी विषयी केलेल्या मूल्य मापनात परस्पर विरोध आहे असे वाटते.

गांधीजींनी भांडवलदारांचे वैचारिक प्रतिनिधित्व केले असे म्हणताना त्यांनी भांडवलदारांच्या हितसंबंधांना संरक्षण दिले, असा आरोप मी त्यांच्यावर केलेला नाही, हे देखील मला येथे सांगावयाचे आहे. कोणत्याही व्यक्तीच्या कार्याचे ऐतिहासिक मूल्यमापन हे त्या व्यक्तीला आपल्या कार्याबद्दल काय वाटत होते– यापेक्षा वेगळेच असते– हे त्या व्यक्तीचे दुर्दैव ! आपण विशिष्ट वर्ग किंवा जाती जमाती पेक्षा संपूर्ण राष्ट्राच्या हितसंबंधांचेच रक्षण करीत आहोत

असा म. गांधींचा प्रामाणिक विश्वास होता. परंतु मुख्य मुद्दा असा की या अधियक चळवळीचा परिणाम काय झाला ? सामान्य माणसाच्या बाबतीत देखील हाच नियम लागू पडतो. "नरकाकडे जाण्याचा मार्ग देखील सद्धेतूने आखलेला असतो"– अशा अर्थाची प्रसिद्ध म्हण येथे लागू पडते.

अर्थात् कोणत्याही व्यक्तीच्या कार्यांचे मूल्यमापन करताना त्याच्या कार्याच्या परिणामा बरोबरच त्या व्यक्तीचे हेतू लक्षात न घेणे– हा देखील त्या व्यक्तीवर अन्यायच होईल. म्हणूनच त्या व्यक्तीचे हेतू, ते साध्य करण्यासाठी तिने वापरलेले तंत्र आणि या सर्वांचे झालेले परिणाम– यांचे परिशीलन करणे. हाच त्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यांकन करण्याचा खरा मार्ग ठरेल. आणि माझ्या या पुस्तकात मी हाच प्रयत्न केला आहे, असा माझा समज आहे. "गांधीवादाचा अन्वयार्थ" या प्रकरणातील मी केलेल्या ५ मुद्यांच्या परिशीलनाची सुरूवात अशी आहे.– त्यांनी जी उद्दीष्टे आपल्या डोळ्यासमोर ठेवली त्यांना ते अखेरपर्यंत चिकटून राहिले. ही उद्दिष्टे म्हणजे त्यांच्या आयुष्याचे आणि शिकवणुकीचे एक अविभाज्य अंग समजले पाहिजे. हाच मुद्दा मी पुढेही मांडला आहे:– 'साम्राज्य-वादा विरूद्ध केलेल्या आंदोलनात त्यांनी ज्या नैतिक मूल्यांचा पुरस्कार केला त्याच नैतिक मूल्यांची, ज्यांनी पुढे सत्ताग्रहण केले त्याच राजकारणी पुढाऱ्यांना मोठी धोंड वाटू लागली. परंतू गांधीजी मात्र त्या मूल्यांशी एकनिष्ठ राहिले तरी त्यांच्या पूर्वायुष्यातील सहकारी व राजकारणी सेनानीमध्ये जो अकस्मात बदल घडून आला तो मान्य करणे त्यांना कधीही शक्य झाले नाही.

इकडे त्यांची ही एकनिष्ठता तर दुसरीकडे त्यांच्या सहकाऱ्यांनी याच तत्वांशी केलेली जी प्रतारणा मला दिसून आली ती मी पुढील प्रमाणे व्यक्त केली आहे– "म. गांधी व त्यांचे सहकारी यात त्यांच्या मृत्यूसमयी वाढत जाणारे वैचारिक भगदाड" ! यावरून म. गांधींना मी कोणत्याही प्रकारे स्वार्थी किंवा अनुदार हेतू चिकटविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

पण बुद्ध, ख्रिस्त किंवा महंमद यांच्या प्रमाणे गांधीजींचे विचार केवळ अगम्य नसून कोटचानुकोटी जनतेच्या गरजा व भावनांचे ते व्यक्त स्वरूप होते. कोटचावधी भारतीय जनतेच्या आकांक्षा व इच्छा यांना व्यक्त करणारी महान उद्दिष्टे व नैतिक मूल्ये यांना म. गांधी आमरण चिकटून राहिले, यातच त्यांची महानता सिद्ध होते. भारताकरिता त्यांनी दिलेले आव्हान ही एक प्रकारे क्रांतीची ललकारीच म्हणावी लागेल. भारतातील निष्कृष्ट अशा ग्रामीण जनतेला– त्यांच्या शब्दात– 'दरिद्रो नारायणाला'– त्यांनी दिलेली क्रांतीची ती एक हाक होती. सत्य, प्रेम, न्याय या त्या कालानुरूप असलेल्या त्यांच्या कल्पना म्हणजे ग्रामीण जनतेला हजारो वर्षांच्या साम्राज्य वाद्यांच्या, सरंजामशाहीच्या

सामाजिक, आर्थिक व राजकीय जोखडातून मुक्त होण्यासाठी वाटणारे स्फूर्ति स्थान होते म्हणूनच भारतीय जनता त्यांना मुक्तिदाता, प्रेषित किंवा संरक्षणकर्ता समजत असे.

परंतू केवळ खेडूत, अज्ञानी जनताच नव्हे तर राष्ट्रातील वरच्या थरातील लोकांना सुद्धा ते महान वाटत कारण त्यांच्या आकांक्षा पूर्ण होतील अशीही विशिष्ट आदर्श व नैतिक मूल्ये म. गांधींनी त्यांच्या समोर ठेवली होती. ज्या भारतीय कामगार वर्गाला स्वतःची अशी राजकीय चळवळ नव्हती त्यांना तर त्या काली गांधीजी म्हणजे आपल्या हितसंबंधांचे रक्षण करणारा प्रवक्ता किंवा उद्‌गाता वाटल्यास नवल नाही.

मध्यम वर्गीय तरूण व बुद्धिजीवी वर्ग तर एका उदात्त कार्याकरिता 'करा किंवा मरा' या भावनेने इतका भारावला होता की त्यांना म. गांधी म्हणजे एक स्फूर्ति दैवतच वाटू लागले.

भांडवलदार-जमीनदार वर्गातील श्रीमंत स्त्रीपुरूष यांचेही ते स्फूर्ति स्थान बनले. त्यांच्या करिता म. गांधी हे स्वातंत्र्याकरिता लढणारे अतुल स्वार्थत्यागी वीर तर होतेच पण सामान्य लोकांना हिंसक वृत्तीच्या ठराविक पण कठोर मर्यादेपर्यंत काबूत ठेवण्याचे त्यांचे तंत्र ही त्यांना विशेष स्पृहणीय वाटले.

म्हणूनच जनतेच्या विविध थरांच्या आकांक्षा स्वाभाविकपणेच भिन्न भिन्न असल्यातरी त्या सर्वांचे ते पुढारी बनले. सुरूवातीच्या कालात तरी स्वतःच्या पुढारीपणाखाली या सर्वांना संघटित करणे त्यांना शक्य झाले, कारण त्यांनी दिलेल्या शिकवणीमुळे या सर्वांनाच एक प्रकारचे समाधान लाभत होते. मात्र चळवळ जसजशी पुढे जाऊ लागली तसतसे विविध थरातील लोकांचे हित संबंध व आकांक्षा यातील विरोध हळूहळू स्पष्ट होऊ लागला व याचमुळे ज्या संघटनेला त्यांनी विविध स्थित्यंतरातून पुढे नेले तीत अंतर्विरोध निर्माण होऊ लागले.

चळवळीतील त्यांच्या पुढारीपणाचा परिणाम म्हणून जे अंतर्विरोध निर्माण झाले त्यांचे समालोचन करीत असतांना गांधीजींच्या आदर्शवादाला सबल व दुर्बल अशा दोनही बाजू होत्या, असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

जनतेला साम्राज्यवाद व सरंजामशाही विरुद्ध चेतविणे आणि संघटित करणे ही त्यांची समर्थ बाजू होती तर साम्राज्यशाही, सरंजामशाही व भांडवलशाही असे तिहेरी जोखड झुगारून देण्यास जो कामगारवर्ग व शेतकरी वर्ग उद्युक्त झाला होता त्याला आक्रमक वृत्ती पासून हेतू पुरःसर रोखून ठेवणे, ही त्यांची कमजोर बाजू होती आणि भांडवलदारांचे हित संबंध सुरक्षित ठेवण्यासाठी नेमकी याच गोष्टीची आवश्यकता होती. त्यांना चळवळ हवी होती पण सामान्य जनतेने या लढ्यात फार आक्रमक भाग घेऊ नये असेहि वाटत होते. त्यामुळे गांधीजींच्या पुढारीपणा-

खाली या दोन्हीही गोष्टी जुळून आल्या हा कदाचित योगायोग असेल आणि म्हणूनच गांधीजींचा जीवनाकडे व इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भांडवलवादी–लोकशाहीस्वरूपाचा होता असा अर्थ मी काढतो.

या पुस्तकासंबंधी काही लोकांनी आणखी एक मुद्दा पुढे आणला आहे, त्याचाही उल्लेख येथे मला करावासा वाटतो. पुस्तकाची पहिली प्रकरणे पुढील प्रकरणांपेक्षा गांधीजी आणि त्यांच्या चळवळी संबंधी जास्त टीकात्मक आहेत. या तथाकथित 'सत्या' संबंधी त्यांचे म्हणणे असे:– ज्या वेळी सोव्हिएट विद्वान गांधीजींचा उपहास किंवा निषेध करीत होते तेव्हा पहिली प्रकरणे लिहिली गेली आणि जेव्हा त्यांनी आपली मते बदलविली तेव्हा नंतरची प्रकरणे लिहिली आहेत. परंतु माझ्या मते असा फरक मी केलेला नाही. उदा. 'सुरूवातीची वर्षे' या प्रकरणात द. आफ्रिकेतील चळवळीबद्दल मी जे म्हटले तेच पुढील आंदोलनांबद्दल देखील माझे मत असेच होते की चळवळ जरी सर्व वर्गीय होती तरी द. आफ्रिकेतील लाखो हिन्दी गरीब व कष्टकरी जनतेचा स्वार्थत्याग आणि लढाऊ पणा त्यातूनच खरा जोम चळवळीला आला होता. दलित जनतेच्या या अतुल स्वार्थत्यागाने ते अगदी भारावून जात असेही मी म्हटले तरी त्यानंतर, ज्या पद्धतीने ते चळवळ हाताळत त्या पद्धती बद्दलही मी टीका केली आहे.

त्यामुळे एकीकडे जनतेला एकत्र व मोठ्या प्रमाणावर संघटित करण्याची त्यांची योग्यता मान्य करूनही त्यांचे संघटना चातुर्य आणि ज्या सामाजिक–आर्थिक दृष्टिकोनातून त्यांचे पुढारीपण निर्माण झाले त्या सर्व गोष्टींचा सारस्वरूपाने "गांधीवादाचा अन्वयार्थ" या प्रकरणात शेवट झाला आहे.

यावरून हे स्पष्ट होते की वरील टीकाकारांचे हे तथाकथित 'सत्य' केवळ कपोल कल्पित आहे, आणि त्यामुळे मला त्यासंबंधी स्पष्टीकरण देण्याची गरज भासत नाही.

शेवटी हे सांगणे आवश्यक आहे की मी कोणत्याही प्रकारचा बदल माझ्या दृष्टिकोनात केलेला नाही.

तरी माझ्या ज्या सर्व टीकाकार मित्रमंडळीकडून मला माझ्या या टीकात्मक समालोचनेत विविध प्रकारच्या सूचना मिळाल्या त्यांमुळे त्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार मानणे माझे कर्तव्य आहे.

त्रिवेंद्रम, ऑक्टोबर २०,१९५९ — ई. एम. एस. नंबुद्रीपाद

2009
दा. क्र. 232600
निबंध
2009

१. भूमिका

डॉ. जे. सी. कुमारप्पा व पं. सुंदरलाल यांसारख्या सुविख्यात गांधीवादी व्यक्तींना देखील एके काळी 'कम्युनिस्ट सहप्रवासी' म्हणून संबोधले जात असे. कारण त्यांनी सोव्हिएट रशिया व चीन या संबंधीचे सत्य मते प्रतिपादन करून याच देशांनी मानवाची खरी प्रगती करून त्यांचे जीवनमान उंचावण्याचे भक्कम प्रयत्न केले आहेत असे प्रामाणिकपणे सांगितले आहे. ते खरे गांधीवादी व प्रामाणिक होते म्हणून वरील देशासंबंधी 'हा खरा व्यावहारिक गांधीवाद आहे' असे म्हणण्याचे धाडस ते करू शकले.

मद्रासचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. राजगोपालाचारी यांनी कम्युनिस्टांना 'नंबर एक शत्रू' म्हणून निवडले होते; किंवा तत्कालीन रेल्वेमंत्री यांनी स्टेशनच्या बुकस्टॉलसवर सोविएत पुस्तके किंवा पत्रिका विकण्यास 'प्रचार साहित्य म्हणून बंदी केली होती परंतु त्याच वेळी तथाकथित स्वतंत्र जगातून आलेले निकृष्ट दर्जाचे अश्लील व कामोत्तेजक वाङ्मय मात्र उघडपणे विकण्यास बंदी नव्हती– असा तो काल होता. परंतु याच वेळी कम्युनिस्ट संसद्सदस्य कॉ. सुंदरय्या यांनी सोविएट रशियाबरोबर व्यापारी करार करण्याचा ठराव मांडताच 'असा करार होऊ शकत नाही' म्हणून तत्कालीन व्यापार मंत्र्यांनी तो ठराव धुडकावून लावला होता.

त्यानंतर परिस्थितीत दोनही देशात पुष्कळ फरक पडला आहे. भारत-सोविएट मधील व्यापारी करार धुडकावून लावला गेल्यानंतर १२ महिने होत नाहीत तोच एका भारत-सोविएत करारावर मंत्र्यांची स्वाक्षरी झाली. कित्येक शिष्टमंडळे एक-मेकांकडे गेली. कम्युनिस्टांना 'नंबर एक शत्रू' म्हणणारे श्री. राजगोपालाचारी यांनी ही कित्येक ठिकाणी "विश्वशांती घडवून आणण्याबाबत व ॲटम बाँब किंवा हायड्रोजन बाँब यांवर बंदी घालण्यास सोविएत रशियाने खरे प्रयत्न केले आहेत" असे प्रशंसोद्गार काढले आहेत.

याशिवाय आमच्या प्रधानमंत्र्यांचे रशियातील शानदार स्वागत, व त्यानंतर सोविएत नेत्यांचे आपल्या देशांतील हार्दिक स्वागत इ. अनेक उल्लेखनीय घटना घडल्या व नंतरच आपल्या देशात 'हिंदी रूसी–भाई–भाई" या गर्जनेचे प्रतिसाद उठू लागले.

रशिया व भारत या दोनही देशांतील मैत्रीसंबंध उत्तरोत्तर वाढू लागले व सामाजिक व्यवस्था भिन्न असलेल्या देशात शांततापूर्ण सहअस्तित्व शक्य आहे, हा सिद्धान्त आंतरराष्ट्रीय संबंधांचा आधार मानला गेल्यामुळे हे मैत्रीचे संबंध शक्य झाले.

तरीही भारत व रशियातील नेत्यांनी दोनही देशांतील सामाजिक व राजकीय

व्यवस्था तसेच त्यांचे मार्गदर्शक तात्त्विक–दृष्टिकोन अगदी भिन्न आहेत हे ही स्पष्ट केले. एकीकडे मार्शल बुल्गॅनिन व श्री. ख्रुश्चेव्ह यांनी दोनही देशांतील जनता व सरकार यांच्या पारस्परिक सहयोगाला आवाहन देऊन मार्क्सवादी तत्त्वज्ञान व व्यवहार यांचे जोरदार समर्थन केले. तर इकडे आमच्या देशातील शासक नेत्यांनी ज्याला गांधीवाद म्हणतात त्या तत्त्वज्ञानावद्दल असलेली आपली निष्ठाही प्रदर्शित केली.

यावरून हे स्पष्ट होते की दोनही देशांतील परस्परसंबंधाचे क्षेत्र विस्तृत झाले असून परस्परसहयोगाची शक्यताही दृढ झाली असली तरी देशातील गांधी वादावर आधारलेले सरकार व शासक पक्ष आणि मार्क्सवादावर आधारलेले जनवादी विरोधी पक्ष यांतील संघर्ष मात्र तितकेच तीव्र राहतील.

देशादेशातील शांततापूर्ण सहअस्तित्व व आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्याकरिता असणारा सहयोग ही गोष्ट आणि आपल्या देशातील भिन्न भिन्न पक्ष व वर्ग यांतील अंतस्थ कलह ज्या निरनिराळ्या विचारधारांतून प्रगट होतात. त्या विचारप्रणाली भिन्न असणे ही गोष्ट अगदी अलग आहे.

पहिल्या विधानावरून दुसऱ्याचे समाधान होऊ शकत नाही. उदा. भारतीय नेत्यांनी सोव्हिएट नेत्यांचे कितीही भव्य व शानदार स्वागत केले व एकता दर्शविली तरी भारतातील समस्या त्यामुळे सोडविल्या गेल्या असे नाही–

१) आमच्या देशातील भूमिसमस्या भूदान आंदोलनामुळे सुटू शकते का ? की त्यासाठी जमीनदार व अन्य प्रतिगामी शक्तींचा सर्वनाश करण्यास समर्थ ठरेल असे संघटित किसान आंदोलन उभे करणे आवश्यक आहे ?

२) देशातील औद्योगीकरणाचा कार्यक्रम द्रुतगतीने पार पाडण्यास विदेशी मक्तेदार भांडवलशाहीशी सूत बांधावयाचे की त्याविरुद्ध संघर्ष निर्माण करून औद्योगीकरण साधावयाचे ?

३) देशातील औद्योगीकरण द्रुतगतीने करून टाकावयाचे, हा एकमेव उद्देश बरोबर आहे का ? की ज्या सर्वोदयवादाला आमचे सरकार बांधले गेले आहे त्या सर्वोदयवाद्यांशी आम्ही विरोध पत्करावयाचा ?

ह्या प्रश्नांवर केवळ गांधीवादी किंवा मार्क्स व लेनिनवाद यांच्या अनुयायांमध्ये मतभेद आहे असेच नव्हे तर स्वतःला गांधीवादी म्हणवून घेणाऱ्या भिन्न भिन्न प्रवृत्तीच्या लोकांतही हा मतभेद आहेच.

अशा परिस्थितीत मार्क्स व लेनिनवादी म्हणविणाऱ्यांनी गांधीवादाचे तत्त्वज्ञान व व्यवहार यांचे सत्य परिशीलन व मूल्यांकन करणे अत्यंत निकडीचे आहे. आणि हे कार्य श्री. तेंडूलकर यांनी आठ भागांत लिहिलेले 'महात्मा गांधीचे जीवन' या पुस्तकामुळे अत्यंत सुगम झाले आहे.

———

२. सुरवातीची वर्षे

श्री. तेंडूलकरांनी पहिल्या भागाची सुरुवात 'प्लासी ते अमृतसर' च्या इतिहासाने केली आहे. काही व्यक्ती व घटना याची ते माहिती देतात. राणी लक्ष्मीबाईसारखी स्फूर्तिदेवता; १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात कामास आली १८७० च्या कालांत ब्रिटिशांच्या राजवटीत बंगालात प्रसिद्ध दुष्काळ पडला.

ज्या फ्रान्सने स्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्यासाठी क्रांतीचा झेंडा फडकविला त्याला स्वदेशातर्फे मानवंदना देण्यासाठी राजा राममोहनराय यांनी भेटण्याचा आग्रह धरला. फिरोजशहा मेहेता, दादाभाई नौरोजी, रानडे, टिळक इत्यादी कित्येक स्फूर्ति देणाऱ्या पुढाऱ्यांतून ॲमस्टरडॅमच्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषेदला १९०४ साली भारतीय राष्ट्रवादाचे वयोवृद्ध पुढारी — दादाभाई नौरोजी — भारताचे प्रतिनिधी म्हणून गेले तेव्हा सर्व प्रतिनिधी उठून आदराने नतमस्तक झाले. याच वेळी लाल – बाल – पाल यांच्या पुढारीपणाखाली या जहाल गटाने राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून स्वराज्याची हाक दिली. लो. टिळकांविरुद्ध झालेला खटला, त्यांना झालेली निर्दय शिक्षा व त्यायुळे झालेला देशव्यापी निषेध त्याचसाठी मुंबईच्या गिरणी कामगारांनी केलेला संप – भारतांतील पहिलाच राजकीय संप – लेनिनने त्याचे केलेले समर्थन, पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस साम्राज्यवादाच्या विरुद्ध उठलेला जनतेच्या चळवळीचा डोंब — अशा एकाहून एक नाट्यपूर्ण घटना घडत होत्या.

या व अशा कालात भारतीय जनता हळूहळू साम्राज्यविरोधी लढ्यात एक होत होती व त्याच वेळी मोहनदास करमचंद गांधी — करमचंदांचा कनिष्ठ पुत्र म्हणून जन्माला आला. मोहनदासाचे आजोबा उत्तमचंद आणि वडील करमचंद काठियावाडातील कित्येक संस्थानांत दिवाण होते. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये दुर्मिळ असलेल्या योग्यता, प्रामाणिकपणा आणि चारित्र्य इ. गुणांचा लौकिक त्यांनी मिळविला आणि याच गांधी घराण्याने पोरबंदरच्या राजकीय जीवनात महत्त्वाचा भाग घेतला.

मांसाहाराविषयी मोहनदासाला असे वाटत होते की आपला देश मांसाहारी झाला तर तो बलशाह इंग्रजांना हरवू शकेल.

बाल मोहनदासावर त्या कालाचा प्रभाव पडलेला दिसतो. हा अल्पसा काळ सोडला तर महात्माजींचे ८० वर्षांचे आयुष्य शाकाहारी म्हणूनच गेले.

लहानपणी मोहनदास आपल्या आईशी अस्पृश्यतेला धर्माची मंजूरी नाही– म्हणून हुज्जत घालीत असे. शिक्षणाकरिता परदेशी जाण्यामुळे तर त्यांना जाति बाह्यतेला तोंड द्यावे लागले. "मोहनदास जातिबाह्य झाला आहे. त्याला निरोप देण्यास बंदरावर जो जाईल त्याला १। रु. दंड द्यावा लागेल"–असा जात पंचायतीने इशारा दिला होता.

तरुण मोहनदासाजवळ जी ओळखपत्रे होती त्यांत एक दादाभाई नौरोजी यांच्या नावाचे होते. त्यावेळी दादाभाई लंडनमध्ये होते. त्यांनी १८९० मध्ये 'इंडिया' नावाचे भारताच्या प्रश्नाबद्दल चर्चा करण्याकरिता एक नियतकालिक सुरू केले. त्या पत्राचा भारतीय विद्यार्थ्यांवर प्रभाव पडत होता. ते 'इंडियन असोशिएशन" समोर भाषणे देत असत. अशा एका सभेत मनाचा हिय्या करुन गांधींनी ते पत्र दादाभाईना दाखविले. 'तू माझ्याकडे येऊन माझा केव्हाही सल्ला घे.' असे ते म्हणाले.

एक होतकरू वकील म्हणून मोहनदास निरनिराळ्या पुरोगामी चळवळीत लक्ष घालू लागले. ते जरी नास्तिक नसले तरी नास्तिकवादाबद्दल त्यांना कुतूहल उत्पन्न झाले. ब्रॅडलॉ त्या वेळचे प्रमुख ब्रिटिश नास्तिक होते. इतर कित्येक प्रसिद्ध ब्रिटिश लोकांबरोबर मोहनदासानी ब्रॅडलॉ यांच्या अंत्ययात्रेत भाग घेतला. "जे इतरांना ईश्वराबद्दल वाटते तेच ब्रॅडलॉ सारख्या नास्तिकांना सत्याबद्दल वाटते" असे ते म्हणत असत.

नवीन कल्पनांचा प्रसार व वापर ब्रिटिश इतिहासात फार झाला होता. स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन झाला. सिडने वेब व बर्नार्ड शॉ यांच्या नेतृत्वाखाली फेबियन सोसायटी स्थापन झाली व ती समाजवादाच्या शास्त्रीय विचाराचा प्रचार करीत होती. मार्क्सचा 'दास कॅपिटल'चा पहिला भाग नुकताच १८८७ मध्ये प्रसिद्ध झाला व कामगार वर्गाचे 'बायबल' म्हणून मान्यता पावला. मार्क्सचा सहकारी फ्रेड्रिक एंजल्स याने १८८५ मध्ये जर्मन भाषेत याचाच दुसरा भाग प्रसिद्ध केला व तिसऱ्या भागाची तयारी होत होती. बर्नार्ड शॉने १८८९ मध्ये 'फेबियन निबंध प्रसिद्ध केले, डार्विनचा युगप्रवर्तक ग्रंथ 'डिसेंट ऑफ मॅन' प्रसिद्ध झाल्यामुळे त्यावर चर्चा सुरू झाली. क्रोपोटकिनचे 'म्युच्यूअल एड' व त्याच्या अराजकवादाचा तो प्रचार करीत होता.

विल्यम मॉरिसने कलेच्या जगतात नवीन कुतूहल निर्माण केले. मोहनदासाने जहाल बौद्धिक व राजकीय चवळळीत भाग घेण्याऐवजी शाकाहायी चळवळीला महत्त्व दिलेले पाहून कित्येकांना आश्चर्य वाटले.

आपल्या प्रतिगामी विचारांची सांगड ते पुरोगामी विचारांशी कशी घालत असत याचे उदाहरण म्हणजे एका बाजूला शाकाहाराशी एकरूपता तर दुसऱ्या बाजूला लंडनच्या गोदी कामगारांच्या संपाला संपूर्ण सहानुभूती; दक्षिण आफ्रिकेत एका बाजूला लढाऊ चळवळ तर दुसरीकडे घटपटादी गूढगुंजन !

पुढे येणाऱ्या काही वर्षांत तरुण बॅरिस्टर मोहनदास यांनी वकिली करताना कायदा व स्वतःच्या आयुष्याचे तत्त्वज्ञान याचा अभ्यास करून द. आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या जीवनाच्या दृष्टीने विचार करून दोहोंची सांगड घातली. ह्या त्यांच्या तत्त्वज्ञानांचा अनुभव भारताच्या भावी ५० वर्षांच्या इतिहासात निर्णायक होणार होता.

पुढे हिंदुस्थानात आल्यावर १९२१; ३०; ३२ व ४२ या वर्षांमध्ये गांधीजींनी आपले तत्त्वज्ञान सुधारून वाढविले; पण या प्रथम प्रयोगातच त्यांच्या तत्त्वज्ञानाची व कार्यक्रमाची जी रूपरेषा दिसून पडला तीच रूपरेषा आज "गांधी वाद" म्हणून प्रसिद्धी पावली. यामुळे पुढील दोन दशकांत द. आफ्रिकेत जे घडले त्याचे वैशिष्ट्य जाणून घेणे उपयोगाचे होईल.

द. आफ्रिकेतील हिंदी लोकांची चळवळ ही सर्व वर्गांची. त्यावेळचे प्रश्न सर्व भारतीय वर्गांशी व धर्मीयांशी संबंधित होते. "भारतीयांना यूरोपियनांच्या बरोबर समानतेचा हक्क" हा वादाचा विषय होता. द. आफ्रिकेची विधानसभा हिंदी लोकांचा मतदानहक्क हिरावून घेण्याचा जो विचार करीत होती तो प्रश्न लांबणीवर टाकावा म्हणून गांधीजींनी अर्ज केला. जे तरुण लोक कधीही सार्वजनिक कार्यात पडले नव्हते ते या कार्याकरिता एक होऊ लागले. बराच मोठा ख्रिश्चन तरुण वर्गही यात सामील झाला. हा अर्ज करण्याकरिता इंग्रजी जाणणारे व न जाणणारे स्वयंसेवक रात्रभर त्या अर्जाच्या नकला करण्याकरिता जमले. व्यापारी स्वयंसेवक आपआपल्या वाहनांनी सहाय्य घेण्याकरिता सर्वत्र फिरले.

हे फक्त द. आफ्रिकेतच घडले असे नाही — हिंदुस्थानातही तेच घडले. १८९६ साली गांधीजी हिंदुस्थानात आले असता द. आफ्रिकेतील भारतीयांचा हा प्रश्न येथे लोकप्रिय करण्याचा त्यांनी प्रयत्न केला व त्याला वृत्तपत्रे व राजकारणी लोकांकडून चांगली साद मिळाली. 'पायोनिअर' व 'टाइम्स ऑफ् इंडिया' सारख्या अँग्लोइंडियन पत्रांनी गांधीजींनी लिहिलेल्या पुस्तिकेला पुष्टी दिली.

१) जसजशी द. आफ्रिकेतील चळवळ वाढू लागली तसतशी गांधीजींना अति श्रीमंत अशा भारतीय समाजाच्या काही लोकांकडून आर्थिक मदत मिळू लागली. यात सर रतन टाटा यांचेकडून २५००० रु.; आगाखान यांचेकडून रु. ३०००, जे. बी. पेटिट यांचे ५०० पौंड, हैद्राबादच्या नबाबाकडून २५०० रु. देणगी म्हणून मिळाले.

२ या चळवळीला अति श्रीमंत वर्गाचा पाठिंबा मिळाला असला तरी चळवळीची खरी ताकद मात्र आफ्रिकेतील हिंदी लोकांनी जो लढाऊपणा व स्वार्थ-त्याग दाखविला त्यातच होती. मतदानहक्क हिरावून घेतला जाणे हा प्रश्न सर्वांचाच होता. परंतु आफ्रिकेतील भारतीय मजूराला तर यामुळे घृणास्पद जबरदस्ती व शोषण यांना तोंड द्यावे लागणार होते. या संबंधात गांधीजींना आलेला पहिला अनुभव पुढे दिला आहे :–

कपडे फाटले आहेत, हातात पागोटे, समोरचे दोन दात पडले आहेत, तोंडातून रक्त येत आहे, असा एक तामिळ माणूस त्यांच्यापुढे उभा होता हे पाहून त्यांना धक्काच बसला. त्यांनी त्याचे पागोटे सावरले. बालसमुद्रमला हा नवाच अनुभव होता. या माणसाला रक्तबंबाळ होईपर्यंत मारल्याबद्दलचे डॉक्टरसर्टिफिकेट घेऊन ते त्याला मॅजिस्ट्रेटकडे घेऊन गेले. बालसमुद्रमच्या मालकाला शिक्षा देवविण्याची गांधीजींची इच्छा नव्हती पण त्याच्यापासून ह्या मजुराची मुक्तता व्हावी अशी इच्छा होती. त्याला दुसऱ्या मालकाकडे सोपविण्यात ते यशस्वी झाले. ही बातमी सगळ्या भारतीय करारबंद मजुरांच्या कानावर गेली आणि ती मद्रासपर्यंत पोहोचून गांधीजी 'मजुरांचे मित्र' म्हणून प्रसिद्ध झाले.

एकदा जागृत झाल्यावर व प्रत्यक्ष कृतीने गरीब हिंदी मजुरांनी जे दुर्दम्य शौर्य दाखविले ते फक्त कामगारवर्गच दाखवू शकतो. न्यू कॅसलच्या ६ हजार कोळसाखाणमजुरांनी जो संप केला व जो त्यांच्या लढ्याचा अविभाज्य भाग झाला–त्या चळवळीत त्यांनी शौर्य तर दाखविलेच पण संघटनसामर्थ्यही प्रगट केले.

संप जोरात होता. आगगाडी व रस्त्यावरून कामगारांची रीघ लागला होती. दोन स्त्रिया धैर्याने चार्लसटाऊनला पोहोचल्या. त्यांची लहान मुले रस्त्यातच मृत्यू पावली होती पण त्या शूर मातांनी न खचता 'मेलेल्यांकरिता काय झुरायचे ? ते पुन्हा थोडेच परत येणार ?' म्हणून मागे राहिलेल्याकरिता कार्य केले पाहिजे असा निश्चय केला.

सामान्य माणसाच्या या स्वार्थत्याग मुळे गांधीजी अत्यंत प्रभावित झाले व त्याचा त्यांच्या मनावर कायमचा ठसा बसला. हे त्यांनी १९१५ साली मद्रास येथे त्यांचे स्वागत करण्याकरिता जी सभा भरली होती त्या सभेत सांगितले. ते म्हणाले :–

"येथे आमच्या गौरवाबद्दल वापरलेली भाषा $\frac{1}{10}$ ने ही बरोबर असेल तर आपल्या देशबांधवाकरिता द. आफ्रिकेत ज्यांनी प्राणदान केले त्यांच्याकरिता आपण कोणती भाषा वापरली ? ज्या १७–१८ वर्षाच्या नागप्पाने आपल्या साध्या निष्ठेकरिता संकटे, यातना, अपमान यांना दृढनिश्चयाने तोंड दिले– त्याच्याबद्दल

आपण कोणती भाषा वापराल ? ---आपण म्हणाल, 'आम्ही त्यांना स्फूर्ति दिली, – पण नाही ! साधेभाळे लोक ! फलाची अपेक्षा न करता कर्तव्य करीत राहिले. त्यांनीच मला प्रभावित केले असून त्यांच्या महान त्यागाने व ईश्वरावरील त्यांच्या श्रद्धेने मी हे काम करू शकलो.

ज्या लढ्यात कामगारवर्गाने प्रत्यक्ष भाग घेऊन शौर्य दाखविले, तो गांधीनीच आखला होता. द. आफ्रिकेतील लढ्यात सुरुवातीपासून अखेरपर्यंत एक विशिष्ट गोष्ट दिसून येते: -- सामान्य जनता शौर्याचे व स्वार्थत्यागाचे आश्चर्यकारक प्रदर्शन करते तर चळवळीची आखणी व पुढारीपण करणारे काही निवडक वरचे लोक अशा प्रकारे प्रदर्शन करतात की ती त्यांच्या काबूत राहील. Path they think best) खरे म्हणजे गांधीजींनी पुढील वर्षांत संघटना व संघर्ष या करिता जे तंत्र वापरले त्या सर्वांची पूर्वचिन्हे आपण येथे पाहू शकतो.

'यंग इंडिया' आणि 'हरिजन' या पत्रांचा जणू अग्रजच असे 'इंडियन ओपोनियन' नावाचे पत्र; १९०४ मध्ये "फोनिक्स वसाहत" व १९१० मध्ये स्थापन केलेला टॉलस्टॉय फार्म (साबरमती व वर्धा आश्रमाचे जणू अग्रदूतच), त्या वसाहतीत राहणाऱ्या लोकांकरिता काटेकोरपणे तयार करण्यात आलेले नियम आणि कोणतीही चळवळ चालू करण्यासाठी व सतत चालू ठेवण्यासाठी स्वतःवर लादून घेतलेल्या शिस्तीच्या पालनाची आवश्यक अशी पूर्व अट; चळवळीच्या आधी व चळवळ चालू असताना काळजीपूर्वक शब्दांत सत्ताधिकाऱ्यांशी केलेला पत्रव्यवहार, तुरुंगातूनसुद्धा केलेला पत्रव्यवहार आणि वाटाघाटी, चळवळीत भाग घेतलेल्या जनतेला माहीत न करता केलेल्या तडजोडी, चळवळीतल्या अगदी लहानातल्या लहान गोष्टींविषयी केलेले वैयक्तिक मार्गदर्शन आणि अटक झाल्यावर आपल्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती, ह्या सर्व चळवळ सुरू करण्याच्या, चालविण्याच्या आणि मागे घेण्याच्या पद्धती द. आफ्रिकेतील चळवळीत प्रथम दिसून आल्या.

ह्या सर्व चळवळीला प्रभावित करणारी गांधीजींची अत्यंत प्रतिगामी अशी सामाजिक दृष्टी लक्षात घेण्यासारखी आहे (ठळक ठसा अनुवादकाचा) त्यांच्या शाकाहारी सभासदत्वाचा खरा मथितार्थ येथेच लक्षात येतो. एका बाजूला लंडनच्या गोदी कामगारांच्या संपाबाबत त्यांना सहानुभूतीही वाटते तर दुसऱ्या बाजूला तत्कालीन जहाल विचारसंरनाबद्दलचे औदासीन्य. तद्वतच त्यांनी सामान्य लोकांच्या लढाऊ चळवळीची. सांगड दुर्बोध विचारांशी घातली. बाईटात बाईट अशी गोष्ट ही की ज्यावेळी ते या लढ्याचे पुढारीपण करीत होते त्याचवेळी आपले दुर्बोध व अनाकलनीय विचार लोकांना सांगू पाहात होते. अशा प्रकारे मार्क्स, एंजल्स, लेनिन यांच्या विरोधात ते ठळकपणे उठून दिसतात. लेनिन तर त्याचा समकालीनच होता. जेव्हा तरुण बॅ. गांधी

'व्हेजिटेरियन' ला लेख लिहीत, त्याच वेळी त्यांच्याच सारखा तरुण वकील लेनिन मार्क्स, सिडने वेब आदींचे लेख भाषांतरित करीत होता. व स्वतः 'रशियात भांडवलवादाचा वाढ' म्हणून पुस्तक लिहीत होता. लेनिनने कामगारांच्या लढाऊ जनआंदोलनाला अत्यंत प्रगत विचारांची जोड दिली तर गांधीजींनी आपल्या चळवळीशी अत्यंत प्रतिगामी व दुर्बोध विचारांची सांगड घातली.

आपल्या १९०९ च्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात गांधीजींनी आधुनिक संस्कृतीचा धिक्कार केला आहे. त्यातील वीस प्रकरणांत, स्वराज्य, संस्कृती, वकील, डॉक्टर्स, यंत्रे, शिक्षण, मूक प्रतिकार, (Passive Resistance) इ. विषय येतात.

गांधीजींनी हे विचार नुसते प्रतिपादनच केले नाहीत. तर 'फोनिक्स वसाहत' व 'टॉलस्टाय फार्म' वर आपल्या अनुयायांना संघटित करताना व्यवहारात आणले. त्यांच्या 'वसाहत' व 'फार्म' वर राहणाऱ्या मुलामुलींना अहिंसा ब्रम्हचर्य, चोरी न करणे, वस्तूवरील मालकी सोडणे, जिभेवर तावा ठेवणे या गोष्टी शाथा घेऊन करावयास भाग पाडल्या. त्यांना तरुण पिढीच्या वैचारिक व बौद्धिक घडणीबद्दल तिरस्कार वाटत असल्यामुळे त्यांनी त्याची जागा स्वतंत्र विचाराऐवजी अंधविश्वासाला करून दिली.

हें मात्र खरे की, या सर्वामुळे ध्येयवाद, निःस्वार्थीपणा, त्यागाची भावना यला आव्हान मिळून ते गांधीजींच्या झेंड्याखाली एकत्रित होत. आपल्या सामाजिक विचारांतील दुर्बोधपणा लपवून ठेवून दुष्ट लोकांविरुद्धच्या लढ्यात हालअपेष्टा सहन करण्याची ध्येयवादी वृत्ती त्यांनी अनुयायांत वाढविली. आधुनिक सुधारणेबद्दल जो तिरस्कार त्यांना वाटत असे तो ते आपल्या अनुयायांच्या मनावर बिंबवीत असत. त्याचाच परिणाम त्यांचे धोरण भारतीय व इतर पद-दलित वर्गाचे शोषण करणाऱ्या साम्राज्यवादाचा विरोध करण्यात झाले. ऐतिहासिक भौतिक वादाच्या संस्थापकांनी 'कम्युनिस्ट जाहीरनामा' ह्या प्रसिद्ध पुस्तकात मध्यमवर्गीय समाजवादाचे जे वर्णन केले आहे, ते गांधीजींच्या 'हिंद स्वराज्य' पुस्तकाला बऱ्याच अंशी लागू पडते.

"समाजसत्तावादाच्या या पंथाने आधुनिक उत्पादनाच्या परिस्थितीतील अंतर्विरोधाची अगदी बारकाईने छाननी केली. अर्थशास्त्राच्या ढोंगी युक्तिवादाचा त्याने दंभस्फोट केला. यंत्रे व श्रमविभाग यांचे घातक परिणाम, मूठभर लोकांच्या हाती भांडवलाचे व जमिनीचे केंद्रीकरण, अत्युत्पादन व आर्थिक अरिष्ट—— त्याने निर्विवादपणे सिद्ध केले; मध्यमवर्ग व शेतकरीवर्ग यांचा सत्यानाश होण्याची अपरिहार्यता, कामगारवर्गाची दुर्दशा, उत्पादनातील बेबंदशाही, संपत्तीच्या वाटणीतील भयंकर विषमता, औद्योगिक क्षेत्रात राष्ट्राराष्ट्रामध्ये चालणारे विध्वंसक युद्ध जुन्या नीतिबंधनांचा, जुन्या कौटुंबिक संबंधांचा, जुन्या राष्ट्रांचा विलय ह्या गोष्टी त्याने निदर्शनास आणल्या." (कम्यु. पक्षाचा जाहीरनामा :पान ७३, ७४)

सुरवातीचा वर्ष

'हिंद स्वराज्या' मधील गांधीजींच्या आधुनिक संस्कृतीच्या टीकेचा आणि शोषित जनतेच्या साम्राज्यवादविरोधाशी काही संबंध नव्हता. आधुनिक संस्कृतीवर टीकेची झोड उठविताना त्याच वेळी ब्रिटिश साम्राज्याचे इमानी सेवक म्हणून ते वावरत होते, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. इंग्लंड या वेळी या (पाशवी) सुधारणेचे एक मोठे केंद्र होते हे सांगणे नकोच. 'भारतातील प्रत्येक इंग्लिश व्यक्तीला उद्देशून ते म्हणतात –

"मी आपले आयुष्य (ब्रिटिश) साम्राज्यासाठी हालअपेष्टात ढकलले आहे. बोअर युद्धाच्या वेळेला मी शुश्रुषा पथकाचा प्रमुख होतो आणि या कार्याचा जनरल बुलर यांच्या लिखाणात उल्लेख आहे. त्याचप्रमाणे नाताळ-मधील झुलूबंडात मी असाच पथकाचा प्रमुख होतो. पहिल्या महायुद्धाच्या सुरवातीच्या वेळी मी सेवाशुश्रुषा पथक उभारले. त्या कामाच्या प्रखर ताणामुळे मला प्ल्युरसीचा विकार झाला. शेवटी लॉ. चेम्स्फोर्ड यांना दिल्लीच्या युद्ध अधिवेशनाच्या प्रसंगी दिलेले वचन पाळण्यासाठी मी माझी सर्व शक्ति खर्ची घालून खेडा जिल्ह्यात युद्धभरतीसाठी मोहिम काढली. त्या वेळच्या दगदगीमुळे मला हगवण लागली. या सर्व गोष्टी करण्याचा माझा उद्देश माझ्या देशाला साम्राज्यात समान दर्जा प्राप्त व्हावा".

हे सर्व अशा वेळी घडत होते की ज्यावेळी देशात नवचैतन्य उत्पन्न होऊन साम्राज्यवादाविरुद्ध लोकांत बंडाची लाट उठत होती. एकीकडे अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन तर युद्धाकरता तरुणांची सैन्यभरतीची मोहिम करून ते ब्रिटिश साम्राज्याची सेवा करीत. इंग्लंडला मदनलाल धिंग्राचा निषेध करणाऱ्या काही थोडक्या लोकांपैकी ते एक होते. त्याने कर्नल वायली यांच्या खुनाचा प्रयत्न केला. मदनलालने पोलीस कोर्टात जबानी देताना देशभक्त म्हणून हे कृत्य करण्याचा त्याला अधिकार आहे म्हणून प्रतिपादिले. त्याने पुढे सांगितले, 'परकी देशाने बंदुकीने दडपलेल्या, युद्धपरिस्थितीने घेरलेल्या, शस्त्रहीन केलेल्या, संपत्ती व बुद्धिमत्तेत गरीब असलेल्या माझ्यासारख्याला मातृभूमीला स्वतःच्या रक्ताशिवाय देण्यास काहीच नाही. म्हणून मी माझ्या रक्ताचे बलिदान देत आहे'.

कट्टर साम्राज्यवादी–अंडर सेक्रेटरी विन्स्टन चर्चिलने त्यावर 'देश-भक्तीच्या नावाखाली करण्यात आलेले सर्वोत्कृष्ट भाषण' असा त्यावर टोमणा मारला. पण गांधीजींना या बाबतीत दुसरेच काही सांगावयाचे होते. "धिंग्राच्या कृत्याने किंवा तशाच इतर कृत्यांनी भारताला काही मिळालेले आहे असे जे समजतात ते गंभीर चूक करीत आहेत. धिंग्रा देशभक्त होता;

पण त्याचे देशप्रेम आंधळे होते. त्याने चुकीच्या कार्यात प्राण अर्पण केला व त्याचा परिणाम व्रात्यपणातच होऊ शकतो."

या जागी गांधीजींचे व्यक्तित्व ठळकपणे आपणास दिसते. त्यांनी विराट जनसमुदायाला साम्राज्यशाही शोषणाविरुद्ध व तिच्या दडपशाहीस तोंड देण्याकरता उद्युक्त केले. ज्यांनी शौर्य व स्वार्थत्याग यांनी इतिहासावर आपली छाप पाडली अशा हजारो स्त्रीपुरुषांची निष्ठा व विश्वास संपादन करून संपूर्ण हिंदुस्थानात पुढारीपण मिळविले, ते आपल्या अनुयायांना हे पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत की शोषणाचा अंत करण्याचा मार्ग त्याविरुद्ध लढाऊ चळवळ करण्याचा नसून त्याने चालविलेल्या युद्धाला मदत करणे होय. अहिंसेच्या नावाखाली ते धिंग्राच्या देशभक्तीचा व क्रांतिकारक कृत्याचा धिक्कार करतात पण त्याच वेळी शेकडो लोकांना साम्राज्यवाद्यांच्या बंदुकांना बळी पाडण्यात त्यांच्या मनाला खंत वाटत नाही. येथे साम्राज्यशाही शोषणाला विरोध या नावाखाली आजच्या जगातील जे सर्व आधुनिक, शास्त्रीय व मानवी सुधारणेच्या दृष्टीने पुरोगामी असेल त्या सर्वांचा ते धिक्कार करतात.

३. असहकार

ह्या अशा व्यक्तीने पहिल्या महायुद्धात भारताच्या राष्ट्रीय राजकारणात प्रवेश केला. गोखल्यांसारख्या पूज्य व्यक्तीकडून ज्यांना निःसंदिग्ध आदर मिळत होत तेच त्यांना काही बाबतीत मात्र विचित्र वाटत असत. गोखले आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गांधींविषयी आदर व प्रेम होते. परंतु त्यांना सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे समासद म्हणून घेण्यात आले नाही. गोखले यांच्या सांगण्याप्रमाणे "त्यांच्याविषयीचा नितांत आदर धोक्यात येऊ नये म्हणून लोक जबाबदारी पत्करायला तयार नाहीत." खालच्या श्रेणीतील उतारूंच्या दुर्दशेची कल्पना आपणास यावी म्हणून आपण भारताचा दौरा तिसऱ्या श्रेणीत करणार आहोत ह्या गांधींच्या निर्णयाची त्यांना गंमत वाटली.

तरीही भारतात येऊन स्थायिक होताच कांही वर्षांतच त्यांना देशातील सर्वात मोठ्या राष्ट्रीय-राजकीय चळवळीचे निर्विवाद नेतृत्व लाभले. फारच थोड्या लोकांचे विचार त्यांच्या सामाजिक आणि तात्त्विक विचारांशी जुळत होते. त्या वेळच्या राजकीय चळवळीतील बरेचसे लोक त्यांच्या तोलाचेच काय पण श्रेष्ठ होते. व्यक्तिगत आयुष्याविषयी आणि राजकारणाविषयी त्यांची मते भिन्न होती तरी राष्ट्रीय राजकारणात त्यांनी जेमतेम प्रवेश केला असेल तोच ते लोक त्यांच्या व्यक्तित्वामुळे मंत्रमुग्ध झाले आणि त्यांच्या राजकीय व व्यक्तिगत प्रभावाखाली आले. त्यांच्या उपदेशाला व मार्गदर्शनाला ते शरण गेले. वैचारिक योग्यतेमध्ये त्यांच्या मानाने कितीतरी पटीने श्रेष्ठ अशा अनेक स्त्री-पुरुषांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची शपथ घेतली आणि स्वतःच्या मतांना त्यांच्या मतापेक्षा गौण स्थान दिले.

सकृद्दर्शनी ही घटना आश्चर्यकारक वाटेल. परंतु ती तेवढी आश्चर्यकारक नाही. ह्याचे कारण ? ह्या काळात भारतीय समाजात वाढणाऱ्या भांडवलदार-वर्गाच्या राजकीय व सामाजिक विचारांशी गांधीजींचे विचार तंतोतंत जुळत होते आणि याच वर्गाचा प्रभाव तत्कालीन सामाजिक व राजकीय जीवनावर विशेषकरून पडत होता.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धातच भारतीय समाजात एक नवा वर्ग उदय पावत असल्याची चिन्हे दिसतात. या कालात राजा राममोहन रॉय यांच्या नेतृत्वाखाली लग्न, स्त्रियांचे हक्क, आनुवांशिक हक्क इ. सामाजिक चळवळी नवीन संस्कृतीच्या विकासासाठी पुढे येत होत्या. त्यांचा प्रभाव इतर प्रांतांवरही दिसत होता. ब्रिटिशांच्या प्रेरणेने निर्माण झालेला हा वर्ग पाश्चात्यांचे सांस्कृतिक विचार तंतोतंत भारतीय जीवनात आणू इच्छित होता. परंतु त्यापैकी भांडवल

दारी लोकशाही मात्र भारतात आणण्यास ब्रिटिशांचा विरोध होता. कारण त्यांच्या दृष्टीने लोकशाही ही वस्तु फक्त इंग्लंडपुरतीच मर्यादित ठेवावी असा या विरोधाचा गर्भितार्थ होता. उदयास येणाऱ्या मांडवलदारवर्गाची हीच दुहेरी लक्षणे 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' च्या संस्थापकांच्या 'मवाळ राजकारणात' दिसून येत होती.

तथापि, हळूहळू त्यांचे प्रतिनिधित्व करणारा हा वर्ग 'मवाळ राजकारणा'ने ठरविलेल्या मर्यादेपलिकडे प्रमाणाबाहेर वाढला. मांडवलदारी विचारवंतांची वाढ, व्यापारी आणि औद्योगिक मांडवलदारवर्गाच्या आर्थिक शक्तीची निश्चित वाढ, भारताच्या आधुनिकीकरणाच्या कित्येक दशकांच्या प्रयत्नात या दोन वर्गांनी मिळविलेला अनुभव, ह्या सर्वांपेक्षा चीन व जपानसारख्या पौर्वात्य देशांतील लोकशाही चळवळी आणि विशेषत: १९०५ ची रशियन क्रांती ह्या सर्वांचा परिणाम तत्कालीन 'जहाल राजकारणा' च्या उदयात झाला. गोखले, नौरोजी आणि इतर जुन्या पंथांच्या पुढाऱ्यांच्या विरोधात टिळक वगैरे प्रतिनिधित्व करत असलेल्या नव्या पंथांचा उदय झाला. सभांमधून ठराव पास करणे, शिष्टमंडळे नेणे वगैरे कालप्रतिष्ठित प्रकार जाऊन त्याच्या विरोधात लोकप्रिय आंदोलनाचा नवा प्रकार उदयास येत होता. हा नवा प्रकार जनतेला ब्रिटिश राजवटीविरुद्ध एकवटण्यास इतका प्रभावी झाला की राज्यकर्त्यांना अक्षरश: धडकीच भरली.

लोकप्रिय आंदोलनाच्या या नव्या प्रकाराने नव्या पिढीची लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पॉल ही प्रसिद्ध त्रयी जनतेत लोकप्रिय होऊ लागली. आणि टिळकांना ६ वर्षांची शिक्षा झाल्यामुळे ते आधुनिक राष्ट्रीय चळवळीचे पराक्रमी वीर ठरले. या आंदोलनाने बंगालच्या फाळणीसारख्या प्रश्नावर सबंध देश जागृत झाला. आणि त्याचा परिणाम स्वदेशीसारख्या चळवळी होण्यात झाला. देशाच्या आर्थिक दास्यविमोचनासाठी झालेली ही पहिली देशव्यापी चळवळ होती. या नव्या उधाणामुळेच पंजाब, बंगाल व संयुक्त प्रांताच्या त्यावेळी 'दहशतवादी' म्हणविल्या जाणाऱ्या चळवळी अस्तित्वात आल्या. ह्याचे नेतृत्व बंगालमध्ये 'युगांतर' आणि 'अनुशीलन' आणि पंजाबमध्ये 'गदर' ह्या क्रांतिकारक गटांनी केले.

नव्या आणि जुन्या पंथांतील संघर्ष १९०६ च्या सुरत काँग्रेसमध्ये कळसास पोहोचला. त्याचा परिणाम दोन गटांत जाहीर फूट पडण्यात झाला. त्यातील एक गट (जहाल) वस्तुत: बाहेर फेकल्या गेला.

तथापि, ही फूट पडण्याचे मुख्य कारण फार दिवस टिकले नाही. दोस्त राष्ट्रांच्या पुढाऱ्यांनी स्वयंनिर्णयाचे तत्त्व जाहीर केले. युद्धकालात जनतेत वाढलेल्या साम्राज्यविरोधी भावनांच्या पाठिंब्यामुळे भांडवलदार वर्गाच्या अत्यंत 'राजनिष्ठ' व 'मवाळ' राजकीय पुढाऱ्यांनादेखील जहाल राजकारणाचे एक दशकापूर्वीचेच तंत्र पुन्हा परिणामकारक होऊ शकते असा आत्मविश्वास आला.

ह्या बदलामुळे दोन पंथांतील सलोख्याचा मार्ग मोकळा झाला. १९१६ च्या प्रसिद्ध लखनौ काँग्रेसमध्ये सुरतच्या फुटीनंतर एका दशकातच मवाळ व जहाल यांच्यातील सलोख्याबरोबरच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातही समझोता झाला. लखनौ करारात मुस्लिम लोकांना राजकीय हमी देण्यात आली. श्रीमती बेझंट यांच्या पुढारीपणाखालील एक व टिळकांच्या पुढारीपणाखालील दुसरी, अशा स्थापन झालेल्या होमरुल लीगजनी लखनौच्या दोन ठरावाचे, राज्ययंत्रणेत पुरोगामी सुधारणा करण्यासाठी देशव्यापी चळवळीत परिवर्तन केले.

ती वेळ अशी होती की सबंध भांडवलदारवर्ग राष्ट्रीय चळवळीत प्रवेश करीत होता व एकमुखाने होमरुलच्या साध्या घोषणेभोवती सबंध देशाला एकत्रित करण्याचा प्रयत्न करीत होता. अशा वेळी द. आफ्रिकेत त्यांनी संघटित केलेल्या नाविन्यपूर्ण अशा चळवळीतील अनुभव घेऊन गांधीजी भारतात परतले. या चळवळीतील इतर गोष्टींबरोबरच कौतुक व उपहास ही दोन्ही त्यांच्या पदरी पडली.

जहाल, मवाळ, काँग्रेस, लीग किंवा होमरुल लीग यातील भांडवलदारवर्गाच्या सर्व पुढाऱ्यांनी गांधीजींनी ज्या पद्धतीने द. आफ्रिकेतील भारतीय मजुरांची चळवळ यशस्वी करून दाखविली, त्या पद्धतीचे कौतुक केले. तथापि, गांधींचे तत्त्वज्ञान किंवा त्यांनी वापरलेल्या चळवळीचे तंत्र याविषयी भांडवलदारवर्गाला फारशी आस्था नव्हती.

देशातील भांडवलदारी–लोकशाही राजकीय चळवळीतील सर्व पंथ आधुनिक भांडवलदारवर्गाच्या राजकीय चळवळीवर आधारभूत होते. त्यांना ब्रिटन–सारख्या आधुनिक भांडवलशाही देशातील 'टोरी' किंवा 'उदारमतवादी' पक्षांच्या धर्तीवरच जहाल किंवा मवाळ राजकारण आणावयाचे होते. उलट–पक्षी त्यांच्या तत्त्वज्ञानात हिंदुत्वाबरोबरच ख्रिश्चन धर्माचा प्रभाव दिसून येत होता. त्यांच्या तत्त्वज्ञानात आधुनिक भांडवलदारांना पोषक असणारी समाजशास्त्र किंवा राज्यशास्त्रविषयक विचारसरणी दिसून येत नव्हती. गांधीजींच्या या विचारसरणीत भांडवलदारवर्गाला हव्या असलेल्या धर्मविरहित राजकारणाच्या मूलभूत सिद्धांतांचा नेमका अभाव वाटत होता.

तरीही जहाल व मवाळ, मु. लीग व काँग्रेस यांच्यातील समझोता पूर्णत्वाला नेण्यासाठी जे प्रखर देशव्यापी आंदोलन झाले त्याचे नेतृत्व अल्पावधीतच गांधीजींना देण्यात आले. गांधीवादी तंत्र व त्याचे घटक यांचे योग्य आकलन ज्यांना झाले नसेल त्यांना या घटमेचे आश्चर्य वाटेल.

गांधीजी आणि इतर पुढारी यांच्या दृष्टिकोनात काय फरक होता ? गांधीजींनी आपले जीवन जनतेच्या जीवनाशी, भावनांशी व आशाआकांक्षांशी एकरूप केले होते. उलट, इतर पुढाऱ्यांसमोर हा दृष्टिकोनच नव्हता. त्यांच्या-करिता (गांधी) राजकारण हे विद्वत्तेच्या वादपटुत्वापुरते मर्यादित नसून ते जनतेच्या हितसंरक्षणासाठी व निःस्वार्थ सेवेसाठी उपयोगात आणावयाचे साधन होते. गांधीवादाचे हे वैशिष्ट्यपूर्ण कृतिशील स्वरूप द. आफ्रिकेतच दिसून आले होते. तेथील चळवळीत सामान्यजनांच्या निष्ठायुक्त कार्याचा गांधीजींनी आधार घेतला होता.

जनतेच्या जीवनांशी, भावनांशी व आशाआकांक्षांशी एकरूप होण्याच्या तळमळीमुळेच गांधीजींना चळवळीचे नवीन तंत्र विकसित करणे शक्य झाले. हे तंत्र 'जहाल' किंवा 'मवाळ' दोघांच्याही तंत्रापेक्षा भिन्न होते. भारतात या तंत्राचा उपयोग गांधीजींनी प्रथम 'विरमगाव जकाती' चा प्रश्न हाताळताना केला.

विरमगाव जकातीच्या प्रश्नाकडे गांधीजींचे लक्ष एका सामाजिक कार्य-कर्त्याने वेधून घेतल्याबरोबर मुंबई सरकारशी त्याबाबत ताबडतोब पत्रव्यवहार करून त्यांनी हा प्रश्न हाती घेतला. या पत्रव्यवहारातून काहीही निष्पन्न झाले नाही. तरी पुढे झालेल्या व्हाईसरॉयच्या भेटीमुळे विरमगाव जकातीचा प्रश्न निकालात निघाला.

ह्यानंतर लौकरच हेच तंत्र वापरून दुसरा प्रश्न हाती घेण्यात आला-बिहारमधील 'चंपारण'च्या बागायतदारांचा प्रश्न ! चंपारण ही विरमगावपेक्षा फार वरच्या दर्जाची चळवळ होती. कारण लढा केल्याशिवाय हा प्रश्न सुटला नसता. तसे पाहिले तर गांधींनी केलेले हे पहिलेच जनआंदोलन होते.

चंपारणचा लढा फार महत्त्वाचा आहे. कारण, १) त्याचा रोख युरोपियन बागायतदारांविरुद्ध होता. २) जनतेच्या मागण्यांसाठी केलेल्या लढ्याच्या झेंड्याखाली त्या वेळचे काही सर्वोत्तम बुद्धिमान तरुण एकत्र झाले. त्यात बाबू राजेंद्रप्रसाद, मझरुल हक, जे. बी. कृपलानी यासारखे बुद्धिवादी तरुण उतरले आणि नंतर गांधीजींचे निकटतम सहकारी व एकनिष्ठ अनुयायी बनले. सामान्य

जनतेच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी उच्च व मध्यम वर्गांतील काही निःस्वार्थी व्यक्तींनी बरोबरीने भाग घेतला, अशी ही पहिलीच चळवळ होती.

तितकीच महत्त्वाची पण सर्वस्वी निराळ्या प्रकारची घटना म्हणजे गांधीजींनी १९१८ साली अहमदाबाद सूतकामगारांच्या संपात केलेली मध्यस्थी ! गांधीजींनी आपले तंत्र कामगार व भांडवलदार ह्यांच्या संघर्षात वापरले, असा हा पहिलाच प्रसंग होता.

ह्या चळवळीचे नेतृत्व त्यांनी केले आणि सामान्यतः जिला गांधीवादी व कामगार चळवळ' म्हणतात तिचा हळूहळू विकास केला. राष्ट्रीय चळवळ व भांडवलदारांनी कामगार चळवळीचे नेतृत्व करण्याच्या दृष्टीने हे तंत्र विशेष महत्त्वाचे होते.

"संपाचे यशस्वी नेतृत्व करण्यासाठी गांधीजींनी नव्या मार्गाचा अवलंब केला आणि ह्या अटी पुढे केल्या– १) हिंसेचा अवलंब न करणे, २) संपफोड्यांना विरोध न करणे, ३) दुसऱ्याच्या दयेवर अवलंबून न राहणे, ४) कितीही काळ संप चालला तरी मागे न हटणे आणि संपकालात कोणत्याही सचोटीच्या मार्गाने भाकरी मिळविणे – – – संपवाले हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत असत. गांधीजी त्यांना त्यांच्या शपथेची आणि शांतता व स्वतःचा अ व राखण्याच्या कर्तव्याची आठवण करून देत असत. कामगार रोज अहमदाबादच्या रस्त्यातून शांततेने मिरवणुका काढीत आणि त्यात 'टेक ओथ'–'शपथ पाळा' अशी अक्षरे लिहिलेले फलक आढळत.

"परिस्थिती आणिबाणीची होऊ लागली होती. **गांधीजी विणकरांना उदरनिर्वाहाकरिता मदतीची याचना करून मानभंग करून घेऊ देण्यास तयार नव्हते.** पण हजारो लोकांना काम पुरविणेही सोपे नव्हते. सुरवातीचे दोन आठवडे कामगारांनी शौर्य आणि आत्मसंयम दोनही दाखविले आणि रोज मोठमोठ्या सभा घेतल्या – – – **पण शेवटी ढिलाईची चिन्हे दिसू लागली. गांधीजींना अशी भीती वाटू लागली की, ते आडदांडपणा करतील आणि त्याचा उद्देश धुळीस मिळेल.** दररोजच्या सभेची उपस्थिती कमी होऊ लागली आणि जे उपस्थित असत त्यांच्या चेहऱ्यावर निराशा आणि उद्वेग दिसू लागला".

"संपकालात गांधीजी मधून मधून मिलमालकांना भेटत असत आणि त्यांना 'मजुरांना न्याय द्या' अशा विनवण्या करीत असत: "आमच्याही काही शपथा आहेत. आमचे व मजुरांचे संबंध पालक आणि मुले असे आहेत. तिसऱ्या पक्षाची लुडबुड आम्ही कशी सहन करणार ? यात लवादासाठी जागा आहे कुठे ?" असे मालक म्हणत असत.

गांधीजींच्या शब्दात वीस दिवस गेले. उपासमार आणि मिलमालकांचे हस्तक यामुळे मजूर न उमेद होऊ लागले. सैतान माणसाच्या कानात कुजबुजू लागला की पृथ्वीवर देव नावाची कोणतीच वस्तू नाही. आणि शपथा म्हणजे कमकुवत माणसांची लबाडी ! गांधीसाहेबांना आम्हाला 'मरेपर्यंत लढा करा' असे सांगणे ठीक आहे पण आम्हाला उपाशी राहावे लागते. हे कामगारांच्या कुरबुरीचे पालुपद असे.

१२ मार्चच्या सकाळी— ती एक कामगारांचीच सभा होती—गांधीजी अजून विचारमग्नच होते. त्यांना एकदम कल्पना सुचली. 'तुमच्या शपथा पाळण्यासाठी आपण दोघेही उपोषण करू' ते म्हणाले ! एकदम त्यांच्या ओठाशी पुढील शब्द आले. "जोपर्यंत संपवाले एकत्र होत नाहीत आणि समझोता होईपर्यंत संप चालू ठेवीन नाहीत किंवा ते सर्व गिरण्या बंद पाडीत नाहीत तोपर्यंत मी अन्नाला शिवणार नाही."

हे शब्द आपणाला ऐकावे लागतील अशी संपवाल्यांच्या मनाची तयारी नव्हती. ते म्हणाले—"नाही नाही ! आम्हीच उपोषण करू ! तुम्ही करू नका. तुम्हाला उपोषण करावे लागले तर ते सर्व दृष्टीने घातक होईल. कृपा करून आमच्या चुकीबद्दल क्षमा करा, आम्ही शेवटपर्यंत आमच्या शपथेशी इमान राखू." (तेंडूलकर)

अर्थात गांधीजींनी उपोषणाचा मार्ग पहिल्यांदाच स्वीकारला नव्हता. तथापि संघर्ष करणाऱ्या जनतेच्या लढाऊपणाला आळा घालण्यासाठी हा पहिलाच प्रसंग होता. ही चळवळ सर्ववर्गीय नसून ती कामगारवर्गीय होती आणि म्हणून ह्या घटनेला विशेष महत्त्व आहे. ह्या प्रयोगाच्या यशस्वितेतूनच मांडवलदारवर्गाला हा एक मौल्यवान धडा मिळाला. हे तंत्र असे होते की ज्यामुळे जनता एकाच वेळी ऐक्यबद्ध होऊ शकत होती आणि लढाऊ कृतीपासून अलिप्तही राहू शकत होती.

विरमगाव, चंपारण व अहमदाबाद ह्या म्हणजे पुढे होणाऱ्या मोठ्या चळवळींची नांदीच म्हणावी लागेल. कारण ह्यातील मागण्या ह्या जनतेच्या एका विशिष्ट गटाच्या व त्याही अंशात्मक स्वरूपाच्या होत्या. ह्याउलट पुढील चळवळी, ज्या एका मागणीभोवती 'मवाळ व जहाल काँग्रेस तसेच मुस्लिम लीग हे लखनौमध्ये एक झाले होते अशी जनतेची मूलभूत मागणी होती. ती म्हणजे होमरुल गांधीजींना ही राष्ट्रीय मागणी पूर्ण करण्यासाठीसुद्धा आपले हेच तंत्र वापरणे आवश्यक होते.

खेडा जिल्ह्यात 'प्रत्येक खेड्यातून २० जवान' ह्या घोषणेभोवती एक चळवळ करून त्यांनी हे तंत्र वापरले. ब्रिटिशांना लढाईसाठी हजारो भारतीय जवानांची नितांत आवश्यकता होती, असे ते दिवस होते. हॉर्डिंगरॉयने दिल्लीला एक युद्धविषयक संमेलन बोलाविले त्यात गांधीजींनाही बोलाविले होते. गांधीजी सैन्यभरतीच्या ठरावाच्या बाजूने बोलले. फक्त त्यांची एक अट होती ती म्हणजे त्यांना हिंदीत बोलण्याची परवानगी असावी ! व्हाईसरॉय ह्याला एकदम तयार झाले.

गांधीजींचे सैन्यभरतीचे कार्य हे मांडवलदारवर्गाच्या मुत्सद्दी व धूर्त पुढाऱ्याला शोभेल असेच होते व त्या पुढारीपणाचे ते प्रतीक होते. राजकारणी मुत्सद्दी तर खरेच ! पण कसे ? अहिंसेसारख्या नैतिक मूल्यांच्या बाबतीत बोलताना आणि तरुण भारतीयांना साम्राज्यशाहीच्या युद्धासाठी, होमरुलच्या बदल्यात दारुगोळा म्हणून सैन्यभरती करताना ज्यांना कुठेही हळहळ वाटली नाही, असे ते पुढारी होते. स्वराज्यमोहिमेचाच एक भाग म्हणून त्यांनी जी सैन्यभरतीची मोहीम केली तिचे समर्थन ते कसे करतात हे उदाहरणादाखल पहा–

"स्वराज्य मिळविण्याचा सरळ व सोपा मार्ग म्हणजे साम्राज्याच्या रक्षणार्थ युद्धात भाग घेणे ! जर साम्राज्य नष्ट झाले तर त्याबरोबर आपल्याही आकांक्षा नष्ट होतील. काही लोक असे म्हणतात की आत्ताच आपण आपले हक्क जिंकून घेतले नाहीत तर नंतर आपल्याला फसविण्यात येईल. पण साम्राज्याचे रक्षण केल्यामुळे आपल्याला जी शक्ती येईल तिच्या जोरावर आपण ते हक्क मिळवू शकू".

तथापि गांधीजींनी इतर पुढाऱ्यांनी मनात बाळगलेल्या अपेक्षा पूर्ण केल्याच नाहीत. होमरुलची मागणी मंजूर करणे तर दूरच पण उलट ब्रिटिशांनी राष्ट्रीय चळवळीवर नवे हल्ले चढविले. माँटेग्यू-चेम्सफोर्डने सुचविलेल्या घटनेतील दुरुस्त्या म्हणजे राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य मागण्यांना स्पष्ट नकारच होता. अत्यंत मवाळ मुत्सद्दीसुद्धा त्याने नाराज झाले. त्यातच भर म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध असलेली चळवळ चिरडून टाकण्यासाठी मिळणार असलेले शस्त्र म्हणजे रौलट बिल ! म्हणून जनमत हळूहळू माँटफोर्ड सुधारणा व रौलट बिलाच्या विरुद्ध जोर पकडत होते.

बदलत्या परिस्थितीनुरूप आपल्या अहिंसात्मक चळवळीच्या साच्यात जन-आंदोलनाची दिशा त्यांना आखावी लागली. बऱ्याच मोठ्या वर्गांकडून आपल्या कल्पनेला मान्यता मिळत असली तरी अनेक काँग्रेस पुढाऱ्यांकडून आपल्याला कडक विरोधही होईल ह्याची त्यांना कल्पना होती म्हणून त्यांनी काँग्रेसबाहेर स्वतंत्रपणे आपली शक्ती संघटीत केली.

कुप्रसिद्ध रौलट बिल गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाल्याबरोबर गांधीजींनी आपल्या सत्याग्रह आश्रमामध्ये एक संमेलन आयोजित केले आणि त्यातच सत्याग्रहाची शपथ तयार करण्यात आली. त्यावर वल्लभभाई पटेल, सरोजिनी नायडू, हॉर्निमन वगैरे पुढाऱ्यांनी सह्या केल्या. सह्या करणाऱ्यांनी 'आम्ही असे वचन देतो की ही बिले जर कायदा झाली तर ती रद्द होईपर्यंत आम्ही ते कायदे पाळण्यास सविनय नकार देऊ' — — — — त्यांनी अशीही शपथ घेतली— 'ह्या लढ्यामध्ये आम्ही निष्ठेने सत्याचा मार्ग अनुसरू आणि प्राणहानी व वित्तहानी यापासून अलिप्त राहू.''

गांधीजींनी मुंबईमध्ये एक सत्याग्रह सभाही सुरू केली. त्या सभेने सत्याग्रहाच्या शपथेवर सह्या घेण्यास सुरुवात केली. १२०० लोकांनी एका पंधरवाड्यात नावे नोंदविली. समितीने असा आदेश दिला की तूर्त बेकायदेशीर साहित्य व वर्तमानपत्राच्या मान्यतेसंबंधीचे कायदे सविनय मोडण्यात यावे.

समितीने प्रचार करण्यासाठी बेकायदेशीर साहित्याची एक यादी केली. तीत 'हिंद स्वराज्य', 'सर्वोदय' आणि 'एका सत्याग्रहीची गोष्ट', यांचा समावेश होता.

रौलट बिलाला विरोध करण्याचा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी गांधीजींनी सार्वत्रिक हरताळाचा आदेश दिला.

'सत्याग्रह ही आत्मशुद्धीची प्रक्रिया आहे, आणि आपला एक पवित्र लढा आहे आणि म्हणून मला ह्या परिस्थितीत ह्या लढ्याची सुरुवात आत्मशुद्धिच्या कार्याने व्हायला पाहिजे असे वाटते. म्हणून भारतातील सर्व लोकांनी त्या दिवशी आपले रोजचे व्यवहार बंद पाडावे आणि तो दिवस उपोषणाचा व प्रार्थनेचा म्हणून पाळावा. मुसलमान एका दिवसाच्यावर उपोषण करणार नाहीत; म्हणून उपोषणाचा काल २४ तासांचा असावा. सर्व प्रांत याला प्रतिसाद देतील की नाही हे सांगणे कठीण आहे. पण मुंबई, मद्रास, बिहार व सिंध याविषयी मला खात्री वाटते. ह्या प्रांतांत जरी योग्य रीतीने हरताळ पाळला गेला तरी आपल्याला समाधान वाटण्यास जागा आहे !''

६ एप्रिल १९१९ हा हरताळाचा दिवस ठरविण्यात आला. रौलट बिलाविरुद्ध झालेल्या राष्ट्रव्यापी चळवळीची ही सुरुवात झाली आणि ही चळवळ भारताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पसरली. अमृतसर येथे तो सार्वत्रिक उत्साहाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचली. नोकरशाही अत्याचारानेही हद्दच वेळी कळस गाठला. तेथेच मायकेल ओडवायरच्या जुलुमी राजवटीत ६ एप्रिलच्या

निदर्शनानंतर एकामागून एक घटना घडल्या व त्याचेच पर्यवसान 'जालियनवाला बागे'च्या कुप्रसिद्ध हत्याकांडात झाले.

खिलाफत आंदोलनाच्या वाढीने गांधीजींना आणि त्यांच्या असहकाराच्या कार्यक्रमाला नवा जोम आला. हचामुळे सबंध मुस्लिम धर्मोपदेशकही त्या कार्यक्रमाचे कैवारी झाले. त्यांच्या दृष्टीने खिलाफत प्रश्न हा धार्मिक व राजकीय गुंतागुंतीचा होता. गांधीजींनी धूर्तपणे हचाचा ब्रिटिशविरोधी भूमिकेसाठी तावडतोब समावेश केला.

१० मार्च १९२० च्या निवेदनात ते म्हणाले :—

'खिलाफत हा आता अनेक प्रश्नातील एक प्रश्न झाला आहे — ~ आता हचा मागण्या मंजूर झाल्या नाहीत तर काय केले पाहिजे, हचासाठी दोन शब्द ! उघड किंवा छुपे युद्ध हा रानटी प्रकार आहे. हा रानटी प्रकार विचारातून काढून टाकला पाहिजे. मी जर लोकांना हे वाईट आहे असे नेहमी पटवू शकलो तर आपण आपले उद्दिष्ट लौकर गाठू शकू. हिंसेची निर्भत्सना केल्यामुळे एखादी व्यक्ती किंवा एखादे राष्ट्र जी ताकद मिळवेल ती ताकद अजिंक्य राहील.

मुसलमान धर्मोपदेशकांचा अहिंसेवर विश्वास नसला तरी जनतेचा एक प्रचंड उठाव करण्याची त्यांची इच्छा होती, हे गांधीजी जाणून होते. म्हणून त्यांनी मुसलमानांना आपले अहिंसेचे तत्त्व वापरण्याचा आग्रह केला नाही. परंतु सर्व हिंदू भाग घेऊ शकणार नाहीत अशी कुराणाची काही खास बंधने असल्यामुळे मुसलमानांनी स्वतःकरिता हा हिंसात्मक मार्गाचा हक्क राखून ठेवला. न्याय मिळविण्याकरिता अहिंसात्मक असहकार जर फोल ठरला तर मुस्लिम धर्मग्रंथाने मान्य केलेल्या मार्गाचा अवलंब करण्यास ते मोकळे राहतील.

अशा अनेक गोष्टींमुळे यावेळी वातावरण चळवळीला अत्यंत अनुकूल होते. उदा. लोकांच्या मनात अगदी ताजे असलेले रौलट बिल व पंजाबचे हत्याकांड अशा ज्वलंत राजकीय प्रश्नांवरचे यशस्वी आंदोलन, मुस्लिम धर्मोपदेशकांशी खिलाफतच्या बाबतीत संगनमत, यामुळे आंदोलनासाठी भूमिका तयार झालेली होती. म्हणूनच गांधीजींनी व्यक्तिशः उभारलेल्या संघटनेच्या जोरावर १ ऑगस्ट १९२० ला असहकार चळवळीची हाक देणे त्यांना शक्य झाले. गांधीजींनी काँग्रेसच्या निर्णयाची वाट पाहावयाला पाहिजे होती असे पं. मालवियांसारख्यांचे स्पष्ट मत होते. हचा हरकतीला त्यांचे उत्तर पुढीलप्रमाणे होते:

"काँग्रेसच्या एखाद्या सभासदास काँग्रेसचा निर्णय मान्य नसल्यास व्यक्तिशः स्वतंत्र धोरणाचा अवलंब करण्यास कोणतीच हरकत असू नये आणि काँग्रेस

आपल्याबरोबर नाही हे जाणूनच तो स्वतःच्या जबाबदारीवर आपले धोरण ठरविल. हे कर्तव्य आपआपल्या परीने पार पाडणे हादेखील देशसेवेचा सर्वोत्तम मार्ग आहे."

गांधीजींनी शौकतअली व इतरांबरोबर सर्वत्र दौरा काढून रौलट बिल, पंजाब हत्याकांड व खिलाफत ह्या प्रश्नांवर जनतेला जागृत केले. काँग्रेसच्या १९२० मधील खास कलकत्ता अधिवेशनावर ह्या गोष्टींचा परिणाम झाला. त्यांच्या पुढाकाराखाली काँग्रेसने पुरोगामी अहिंसात्मक असहकाराचा प्रस्ताव पास केला.

त्याअन्वये असे मान्य करण्यात आले की ज्या वर्गाने आतापर्यंत जनमत घडविले त्याच वर्गाने या लढ्याची सुरवात करावी.

ह्या ठरावाचे परीक्षण केल्यास गांधीजींनी पुढे केलेल्या कार्यक्रमाचे वर्गीय स्वरूप दिसून पडते आणि भांडवलदार व मध्यमवर्गीय पुढाऱ्यांनीच चळवळीचे नेतृत्व करावे असा ठरावांचा स्पष्ट अर्थ होतो.

ह्या चळवळीने साम्राज्यशाही सरकार त्रस्त झाले तरी त्यांच्या मूलभूत सत्तेला यत्किंचितही धक्का बसणार नव्हता. औद्योगिक कामगारांचा सार्वत्रिक संप, कर न भरणे व जमिनी ताब्यात घेणे यासारखी लढाऊ जनआंदोलने या ठरावात सूचित केलेली नाहीत हे विशेष ! भारतीय भांडवलदारांच्या आणि जमीनदारांच्या नफ्यावर, त्याचप्रमाणे परकीय राज्यकर्त्यांच्या आर्थिक आणि राजकीय पायावर घाव घालतील असे लढ्याचे प्रकार यात नाहीत.

सैन्यभरतीसाठी नकार, अशा लढाऊ कृतीला त्यांनी स्थान दिले परंतु तेसुद्धा मेसोपोटेमियासाठी होणाऱ्या भरतीपुरते मर्यादित केले. अहिंसात्मक असहकाराचा उद्देश साम्राज्यशाही समूळ उलथून पाडण्याचा नसून सरकारला काँग्रेसशी समेट करणे भाग पडावे हाच होता.

औद्योगिक कामगारांचा संप याचा निव्वळ एक राजकीय शस्त्र म्हणून वापर करावा असे गांधीजींचे मत होते.

"द. आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या चळवळीच्या कालात कित्येक हजार हिंदी कामगारांनी संप केला. हा सत्याग्रही स्वरूपाचा संप असल्यामुळे पूर्णपणे शांततामय आणि स्वयंस्फूर्त होता. हा संप चालू असतानाच युरोपिअन खाण-कामगार आणि रेल्वे कर्मचारी यांनीही संप जाहीर केला. युरोपिअन कामगारांबरोबरच आपणही संयुक्त लढा द्यावा या मागणीस गांधीजींनी नकार दिला.

आमचा संप युरोपिअनांच्या हिंसात्मक संपासारखाच समजला जाईल या भीतीने त्यांनी हा सत्याग्रह थांबविला. कारण युरोपिअनांच्या संपात हिंसात्मक कार्याला आणि शस्त्राला महत्त्वाचे स्थान होते. त्यावेळेपासून द. आफ्रिकेतील युरोपियन लोक सत्याग्रह हीदेखील एक प्रतिष्ठित आणि प्रामाणिक चळवळ समजू लागले. ज. स्मट्स याच्या शब्दांत "तो एक सनदशीर चळनळ होती". (तेंडूलकर) हिंसेबद्दल या कालात फारच बाऊ केला गेला होता. परंतु त्याच्या बुडाशी भांडवलदारांची मुख्य भीती वेगळीच होती. ती म्हणजे एकदा कामगारवर्गाने स्वतःचे राजकीय संपाचे शस्त्र उगारले तर भांडवलदारी नेतृत्वाने घालून दिलेल्या मर्यादेपलिकडे चळवळ जाईल. ज्या गांधीजींना लढाईत बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडण्याकरिता 'प्रत्येक खेड्यात २० लोक' सैन्यभरतीस मिळावे असे वाटत होते, तेच गांधीजी कामगार शेतकरी वर्ग राजकीय चळवळीत संघटीतपणे उतरताच होणाऱ्या तुरळक हिंसात्मक प्रकारांच्या कल्पनेनेच घाबरून जात होते.

गांधीजींनी याचकरता आपल्या कार्यक्रमात 'डोईजड व्याजाचे कर्ज रद्द करा', 'करआकारणी कमी करा', 'जमिनदारांच्या जमिनीचे वाटप करा' यासारख्या मध्यम व गरीब शेतकऱ्यांच्या घोषणांना कधीही स्थान दिले नाही.

नागपूरच्या १९२१ च्या अधिवेशनातील ठरावांमध्ये गांधीजी जास्तीत-जास्त कोणत्या मर्यादेपर्यंत जाऊ शकतील व गेले याचे स्पष्टीकरण आपल्याला मिळले.

"काँग्रेस अहिंसात्मक असहकाराच्या तत्त्वावर पूर्ण विश्वास ठेवून असे जाहीर करते की अहिंसावादी कार्यकर्त्यांनी सरकारशी स्वयंप्रेरणेने संबंध तोडावेत आणि त्याच वेळी कर भरण्यास नकार द्यावा. ह्या गोष्टी केव्हा अंमलात आणाव्यात हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस किंवा अ. भा. काँग्रेस महासमा ठरविल".

कर भरण्यास नकार देणे ही गांधीजींच्या विचारांची कमाल मर्यादा होती. या मर्यादेपर्यंत जाण्याला श्रीमंत शेतकरी व जमीनदारसुद्धा तयार होते. त्या कालात सामान्य लोकसुद्धा आपल्या चळवळीस अशी मर्यादा घालून घेण्यास तयार नव्हते. अहिंसात्मक का होईना पण हीबंडाची हाक देण्यात आली आहे. हीच घटना शेतकरी, कारागीर व कामगारवर्गाला जुलुमाविरुद्ध लढा देण्यास उद्युक्त करण्यास पुरेशी होती. औद्योगिक कामगारांचे व मळे कामगारांचे संप होते आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष धुमसत होता. त्याचा परिणाम म्हणजे ज्या घटना घडू नयेत अशी गांधीजींची अपेक्षा होती त्या शेवटी घडल्याच.

"काँग्रेसचे अनेक नवे कार्यकर्ते तेव्हा एकप्रकारच्या धुंदीत राहत असत. भीती, दडपण, नाउमेदी या भावना पूर्णपणे नाहीशा झाल्या होत्या. अगदी दूरच्या खेडचातसुद्धा लोक काँग्रेस व स्वराज्य, पंजाबच्या घटना व खिलाफत याविषयी चर्चा करू लागले. खेडेविभागात 'खिलाफत' ह्या शब्दाला वेगळाच अर्थ आला होता. लोकांना वाटत होते की हा शब्द उर्दुतील 'खिलाफ' म्हणजे विरुद्ध असा आहे. आणि त्याला ते 'सत्तेच्या विरोधी' असे समजत. राष्ट्रवाद–धर्म आणि गूढवाद यांचे हे विचित्र मिश्रण होते.' (ते)

गांधीजींची प्रतिक्रिया त्यांच्या व्यक्तित्वाला आणि ते ज्या प्रकारची चळवळ उभी करणार होते तिला अनुरूप अशीच होती. जनतेने त्यांच्या सैतानी 'सरकारशी असहकार' या घोषणेला प्रचंड पाठिंबा दिल्याने ते प्रभावित झाले नाहीत. उलट सविनय कायदेभंगाच्या चळवळीकरिता जे अहिंसात्मक व सत्याचे वातावरण पाहिजे होते त्याचा नेमका अभाव असल्यामुळे त्यांना धक्काच बसला.

रौलट बिलाच्या आंदोलनाच्या वेळी गांधीजी म्हणाले, "मी माझी पाऊले मागे घेतली आणि त्याला हिमालयाएवढी चूक म्हटले, व देवापुढे व मानवापुढे स्वतःसाठी क्षमायाचना केली आणि फक्त जनतेचा सविनय कायदेभंगच मागे घेतला नाही तर माझा व्यक्तिगत सत्याग्रह सविनय आणि अहिंसात्मक होता अशी माझी खात्री असूनही तो मी मागे घेतला."

सविनय कायदेभंगाच्या चळवळीबद्दल जी कल्पना केली होती ती १९२२ मधील चौरीचौरा घटनेमुळे निष्फळ ठरली. ह्या घटनेमुळे त्यांची अत्यंत मानहानी झाली असे त्यांना वाटले. चळवळ पुष्कळदा त्यांच्या हाताबाहेर जाईल अशी भीती त्यांना वाटली. म्हणून त्यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली.

चौरीचौरा ही एक घटना नव्हती. त्याच्याआधी मलबारचे मोपला बंड झाले. ह्या बंडामध्ये गांधीजींची 'ब्रिटिशांशी असहकार' ही हाक शेतकऱ्यांच्या जमीनदारविरोधी मागण्यांबरोबर गोवली गेली. आणि म्हणून हजारो दलित शेतकऱ्यांनी त्यात भाग घेतला. देशातील इतर प्रांतांतीलही शेकडो आबालवृद्धांनी शाळा, कॉलेजे व कोर्टकचेऱ्यांवर बहिष्कार घातला आणि गांधीजींच्या हाकेला प्रतिसाद दिला. गांधीजींच्या असहकारितेच्या मंत्राचे ते दूत बनले. ते शेतकऱ्यांमध्ये गेले. आणि 'शेतसाऱ्यात सूट द्या; डोईजड कर कमी करा' यासारख्या मागण्यांना त्यांनी वाचा फोडली.


खरे पाहता गांधीजींच्या मते ही चळवळ ज्या मार्गाने आतापर्यंत जनमत घडविले आणि त्यांचे नेतृत्व केलेल्या वर्गानेच सुरू करायला हवी होती.

वास्तविक पाहता त्या वर्गाने (मांडवलदार) निर्धारित केलेल्या मर्यादेपलिकडे ही चळवळ जात होती आणि खरीखुरी राष्ट्रव्यापी चळवळ होत होती.

हा नवा वर्ग, शेतकरीवर्ग, चळवळीत ओढला गेल्यानंतर त्याने स्वत:चेच लढ्याचे आणि संघटनेचे तंत्र झुगारून दिले. मलबार बंडात हे स्पष्ट दिसून आले. त्यात शेतकऱ्यांचेच खास वैशिष्ट्य असलेले लढाऊ मार्ग वापरले गेले. त्यात जमीनदारांच्या नोंद-दप्तरांची जाळपोळ, रजिस्ट्री कार्यालयांची जाळपोळ, सरकारी कार्यालयांवर हल्ले, पोलिसांना नि:शस्त्र करणे, जनता कोर्टांची स्थापना, जमीनदारांच्या वाड्यातील धान्य व इतर वस्तू यांचे वाटप, या प्रकारांचा समावेश होता.

एकदा शेतकरीवर्ग राज्ययंत्रणेच्या समोरासमोर उभा ठाकल्यावर त्याचा अपरिहार्य परिणाम अशीच तंत्रे वापरण्यात होतो. ही तंत्रे गांधीजींच्या अहिंसेच्या व्याख्येबाहेर आहेत, हे चौरीचौऱ्याने स्पष्ट केले.

गांधीजींनी यावर पुढील कबूली दिली. 'मद्रासने (मलबार) धोक्याचा इशारा दिला पण मी त्याकडे दुर्लक्ष केले. पण चौरीचौऱ्यामुळे ईश्वरी संदेश मिळाला आणि माझे डोळे उघडले'. चौरीचौरा येथे पोलिसांनीच चिथावणी दिली ह्याबद्दल गांधीजींना शंका नव्हती. पोलिसांच्या चिथावणीनेच 'जनतेला ठाण्याला आग लावण्यास व गुंडगिरीला फावले' परंतु ह्याला क्षमा करायला ते तयार नव्हते. एकदा शेतकरीवर्ग जागृत झाला आणि कृतीत उतरला की त्याचे राज्ययंत्रणेशी असे खटके पुन्हा पुन्हा उद्भवणार हे त्यांना स्पष्ट दिसून आले. ह्या प्रश्नाचे गांभीर्य त्यांना इतके वाटले की यापुढे चळवळ चालू ठेवण्याची कल्पनासुद्धा त्यांना पाप वाटून आपल्या शपथेशी प्रतारणा केल्यासारखे होईल म्हणून सविनय कायदेभंगाची चळवळ त्यांनी रद्द केली.


ग्रंथालय
दा. क्र. 232-99
शाखा (स्थळ प्रत)

४ पाहला तडा

असहकाराच्या चळवळीत काही प्रसंगी गांधीजी फारच असहिष्णु वृत्ती दाखवीत असत. त्यांच्या सहकाऱ्यांना त्याचे कारण मात्र कळत नसे. गांधीजींच्या निर्णयाबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांची प्रतिक्रिया कशी होते ते पाहा.

"चळवळ एकदम बंद पाडणे हा त्यांना जबरदस्त धक्का होता. बार्डोली निर्णयामुळे तुरुंगात असणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये खळबळ माजली. आणि सामान्य कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. गांधीजींवर सर्व बाजूंनी टीकेची झोड उठली व प. मोतीलाल नेहरूंसारख्यांनी गांधींना त्यांच्या धोरणाच्या निषेधार्थ संतप्त पत्रे लिहिली. चौरीचौरा व गोरखपूर येथील हिंसात्मक घटनांकडे डोळेझाक करून चळवळ चालू ठेवण्यास त्यांनी सांगितले". (ते)

रौलट व खिलाफत आंदोलनाच्या वेळेपासून गांधीजी आतापर्यंत जी एकजूट घडवू शकले तिला या वेळी प्रथमच तडा गेला. अहिंसात्मक असहकाराच्या कार्यक्रमांद्वारा गांधीजींनी जहाल आणि मवाळ यांना एकत्र आणले. त्यांच्या अहिंसेच्या आग्रहाने मवाळांचे समाधान झाले. आणि साम्राज्यशाहीविरोधी जनआंदोलनाच्या हाकेने जहाल जागृत झाले. तथापि गांधीजींनी ज्या घाईने सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली आणि ज्या भीतीने ते या लढाऊ चळवळीकडे पाहत होते तीमुळे काँग्रेसमध्ये आधी ज्या मूलभूत प्रश्नांवर फूट पडली होती ते जुनेच प्रश्न पुन्हा एकदा समोर आले.

ते प्रश्न म्हणजे :—

राष्ट्रीय मागणीच्या पूर्ततेसाठी लढ्याचा मार्ग कोणता असावा ? सत्तेच्या विरुद्ध जनतेच्या एकजुटीचा लढा असावा की जास्तीतजास्त सुधारणा मिळविण्यासाठी सनदशीर मार्ग स्वीकारावा ? ब्रिटिशांशी शांततामय वाटाघाटींचा की त्याविरुद्ध लढाऊ चळवळीचा ? ज्या प्रश्नांमुळे एकदा मवाळ व जहाल यांच्यात फूट पडली होती तेच हे प्रश्न पुन्हा एकदा पण निराळ्या स्वरूपात पुढे आले.

सविनय कायदेभंग रद्द करण्याच्या गांधींच्या कृतीचा निषेध करणारे मोतीलाल नेहरू किंवा लाला लजपतराय यासारखे पुढारी कोणत्याही अर्थाने लढाऊ साम्राज्यविरोधी नव्हते. त्यांपैकी मोतीलाल नेहरूंसारखे काही पुढारी यापूर्वी मवाळांच्या गटात होते. गांधीजींच्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनतेला एकत्र करण्याच्या पद्धतीने साम्राज्यशाहीवर बरेच दडपण येईल म्हणून त्यांनी गांधीजींचे नेतृत्व मान्य केले. ह्या दडपणामुळे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना वाटाघाटी करणे भाग पडेल आणि गांधीजींच्या नेतृत्वाखालील जनआंदोलनाचा

कौशल्याने उपयोग केल्यास ते घटनेत जास्तीत जास्त सुधारणा घडवून आणू शकतील असे त्यांना वाटले. म्हणून एक दोन ठिकाणी 'हिंसेचे प्रकार' झाल्यास त्यांना विशेष काही वाटणार नव्हते. उलट असे प्रसग घडणारच, आणि त्यांची जबाबदारी काँ. ने झुगारून द्यावी व ती देऊ शकते, असे त्यांचे मत होते. यामुळे चळवळ ठराविक मर्यादेपलीकडे जाईल या गांधीजींच्या निराशावांदाशी ते सहमत नव्हते. म्हणून गांधीजींच्या निर्णयाने ते संतप्त झाले.

पण सविनय कायदेभंगाची चळवळ रद्द झाली ही गोष्ट आता इतिहास जमा झाली होती. त्यामुळे 'पुढे काय', हा अपरिहार्य प्रश्न समोर आला. जनता हळूहळू अहिंसात्मक लढ्याचे तंत्र आत्मसात करील आणि पुरेशी तयारी झाल्यावर काँ. देखील गांधीजींनी कल्पिलेला अहिंसात्मक लढा देऊ शकेल, एवढा धीर त्यांना नव्हता. गांधीजींचा 'अहिंसात्मक असहकार' हे तंत्र ब्रिटिशांना वाटाघाटी करण्यास भाग पाडण्याचे एक यशस्वी व व्यावहारिक उपयुक्ततेचे साधन म्हणून ते या तंत्राकडे पाहत होते. म्हणून त्यांनी असा निर्णय घेतला की सविनय कायदेभंगाची चळवळ रद्द करावयाची असेल तर काँ. ने नवीन डावपेच योजावेत.

या नविन डावपेचांच्या शोधात असतानाच फेरयाद्यांना अशी कल्पना सुचली की नविन निर्माण झालेल्या विधी मंडळावर बहिष्कार घालण्याऐवजी त्यांचा उपयोग करुन घ्यावा. जोपर्यंत विधी मंडळाचा बहिष्कार हा अहिंसात्मक असहकाराचाच भाग होता तो पर्यंत ठीक होते. पण आता अहिंसात्मक असहकाराचाच विचारच सोडल्यावर त्या बहिष्काराला अर्थ नाही. हे त्यांनी नुसते दर्शबिलेच नाहीं तर त्यांची मजल हा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी नवा पक्ष स्थापण्यापर्यंत गेली. 'स्वराज्यपक्ष' अर्थात हे लोक काँ. मध्ये अल्पमतातच होते. १९२३ साली काँ. च्या गया अधिवेशनाने त्यांचा विधीमंडळ प्रवेशाचा ठराव ९७४० विरुद्ध ८९० मतांनी फेटाळला गेला.

काँ. मधीग लढाऊ प्राबल्याचे हे द्योतकच होते. अल्पमतात असला तरीहि हा गट काँ. मध्ये प्रभावी होता. एकतर या गटाचे नेतृत्व प्रसिद्ध वरिष्ठ पुढाऱ्यांकडे होते आणि शिवाय विधी मंडळ प्रवेशाच्या विरोधकांजवळ (नाफेरपक्ष) पर्यायी कार्यक्रम नव्हता.

स्वराज्यवादी आणि नाफेर यांच्यातील लढा गांधीजी तुरुगांत असतानाच सुरु झाला आणि विकोपासहि गेला. सविनय कायदेभंगाची चळवळ रद्द केल्यावर थोड्याच दिवसात गांधीजींना अटक करण्यात यावी हे हास्यास्पदच होते. गांधीजी सुटून येईपर्यंत काँ. जवळ जवळ दोन गटात

विभागली गेली होती आणि दोन संघटना निर्माण होण्याच्या मार्गावर होत्या. म्हणून गांधीजींनी हे भगदाड बुजविण्याचा व काँ. चे दोन्ही गट एकत्र आणण्याचा प्रयत्न सुरु केला. परिस्थिती ओळखून विधिमंडळ प्रवेश 'ही अटल घटना' आहे हेहि त्यांनी ओळखले. त्यांनी असा प्रश्न पुढे केला.

! "पुढे काय ? असहकार वाद्यांनी स्वराज्य वाद्यांशी विरोध करावा की शक्य त्या ठिकाणी निःपक्ष राहून आपल्या तत्वात बसेल तेथे त्यांना मदत सुद्धा करावी ? स्वराज्य वाद्यांचे कार्य यशस्वी झाले आणि देशाचे भले झाले तर माझ्या सारख्याला त्यांची मते बरोबर, आणि आपली चूक असल्याचे प्रांजळपणे मान्य करावे लागेल.

स्वराज्य वादी सुद्धा इतके देशभक्त आहेत की त्यांच्या धोरणाचा अनुकूल परिणाम दिसून न आल्यास ते आपली मते मागे घेतील. मी स्वराज्यवाद्यांच्या मार्गात अडचणी उत्पन्न करणार नाही किंवा त्यांच्या विरुद्ध प्रचारहि करणार नाही. परंतु त्यांच्या पद्धतीवर माझा विश्वास नसल्यामुळे मी त्यात प्रत्यक्ष सहभागी होणार नाही". ! (तें.)

अशाप्रकारे गांधींनी स्वराज्यावाद्यांना आशिर्वाद दिला. खरे म्हटले तर राजगोपालचारी, वल्लभभाई पटेल व राजेंद्रप्रसाद इ. नाफेरवादी पुढाऱ्यांचा विचारांशी हे जुळत नव्हते. नाफेरवाल्यांनी स्वराज्यवाद्यांवर निष्फळ टीका करण्याऐवजी विधिमंडळाबाहेरील विधायक कार्यक्रमाने आपल्या धोरणाचे महत्व पटवून द्यावे, त्यांनी कायदेमंडळाबाहेर राहून जनतेला संघटित करुन पुढील लढण्यासाठी तयार करावे, आणि याच मार्गाने राष्ट्रीय कार्याची प्रगती होईल असे गांधीजीचे मत होते.

काँ. वाल्यांचे मत वळवून स्वराज्यवादी धोरणात कोणाचा अविभाज्य भाग नसला तरी राजकीय चळवळीचे केंद्र म्हणून त्याचा उपयोग व्हावा असा गांधीनी युक्तिवाद केला मात्र खादी प्रचार, अस्पृशता निवारण, हिंदीचा प्रचार ह्या सारखे कार्यक्रम अमलात आणावेत असे बंधन मात्र स्वराज्यवाद्यांवर त्यांनी घातले.

म्हणून पुढील काही वर्षे गांधीजी आणि त्याच्या नाफेर अनुयायांनी विधायक कार्यक्रम पुढे नेण्यावर भर दिला. हाच कार्यक्रम अमलात आणण्यासाठी त्यांनी अखिल भारतीय खादी बोर्ड स्थापिले, हा कार्यक्रम लोकप्रिय करण्यासाठी गांधीजींनी संपूर्ण भारताचा दौरा केला. खादी कार्यक्रमाला लोकप्रिय केले, अस्पृश्यतेविरुद्ध भाषणे दिली आणि राष्ट्रभाषेचा प्रचार केला.

गांधीजींनी ज्या तऱ्हेने हा कार्यक्रम सर्वत्र लोकप्रिय केला, त्या पद्धतीनें जनतेला जागृत करीत असतानाच तिला साम्राज्यविरोधी लढाई आंदोलनापासून रोखून ठेवणेहि त्यांना शक्य झाले.

आश्चर्याची गोष्ट अशी की–

१) या प्रचारात राजकीय प्रश्नांचा संबंध कोठेहि आणला नाही. १९२१–२२ मधील त्यांच्या भाषणात पंजाबमधील अत्याचार, रौलट बिल आणि खिलाफत चळवळ यांचा नेहमी ब्रिटिशांविरुद्ध म्हणून उपयोग केला आहे. ह्या उलट त्यांची १९२४ ते २८ मधील भाषणे पहा:–ती सर्व सामाजिक आणि आध्यात्मिक प्रश्नांवरच होती. प्रचलित राजकीय व आर्थिक व्यवस्थेबद्दल न बोलता ते सामाजिक दुष्ट प्रथा व अध्यात्मिक मूल्यांबद्दलच बोलत असत.

२) जमीनदारी आणि त्यांचे दडपशाहीचे व शोषणाचे इतर प्रकार यांच्याविरुद्ध न बोलता, लोकांचे दु:ख, दैन्य व देशातील विषमता दूर करण्याविषयी ते बोलत. जनतेतील प्रत्येक थराच्या प्रश्नावर त्यांनी विचार केला त्यामुळे सामान्य दलित जनता त्यांच्याकडे आकृष्ट झाली.

३) जरी ते कामगार वर्गाच्या वतीने त्यांना समजेल अशा भाषेत बोलत असत तरी जनतेने कोणत्याही तऱ्हेने प्रचलित समाजरचनेच्या विरुद्ध एकत्र होण्यास त्यांचा कट्टर विरोध होता. श्री. सकलातवाला १९२७ मध्ये भारतात आले असतांना झालेल्या चर्चेत गांधीनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. त्याचा आशय असा :- कॉमरेड सकलातवाला यांना प्रचलित समाजरचना बदलण्याची अत्यंत घाई झाली आहे. त्यात त्यांची कळकळ स्वच्छ दिसून पडते. त्यांचे गरीबांविषयीचे प्रेम वादातीत आहे पण ते वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करतात, भारत आणि भारतीय परिस्थिती ते विसरतात.

अशी कोणती 'वस्तुथिती' आणि 'परिस्थती' आहे की जिच्याकडे कॉम्रेड सकलातवाला दुर्लक्ष करतात?

! "मी भांडवलदाराला मजूराचा शत्रू समजत नाही. त्या दोघांचा समन्वय पूर्णपणे शक्य आहे असे मी समजतो. द· आफ्रिका, चंपारण आणि अहमदाबाद येथे कामगारांचे मी जे संगठन केले त्यात भांडवलदारांशी शत्रुत्वाची भावना नव्हती. या प्रत्येक घटनेतील प्रतिकार माझ्या अपेक्षित मर्यादेपर्यंत यशस्वी झाला होता. माझा आदर्श संपत्तीच्या समान विभागणीचा आहे. पण ही गोष्ट शक्य दिसत नाही. खादीच्या कार्यातून ही समान विभागणी शक्य होईल असा माझा विश्वास आहे." (तें.)

दुसऱ्या शब्दात खादीचा कार्यक्रम हा वर्ग समन्वयाचा व ब्रिटीश संबंध 'पावन' करण्याचा कार्यक्रम होता.

४) विधायक कार्यक्रम हा कृतीशील कार्यक्रम होता. शपथ घेतलेल्या प्रत्येयकाठी काही तरी कार्य होतेच. गांधीजींच्या महानतेतील हे एक वैशिष्ट्य होते. त्यांच्याजवळ गेलेल्या प्रत्येकासाठी काम शोधून देण्याची व करवून घेण्याची हातोटी त्यांच्या जवळ होती. तुम्ही कामगार, शेतकरी, धंदेवाईक-कोणीही असा गांधीजीं जवळ तुम्हाला गुंतविण्यासाठी काम आहेच ! आणि अशा कार्यातूनच देशाचे आर्थिक व राजकीय पुनरूज्जीवन करण्याचे महान कार्य तुम्ही करीत आहात अशी जाणीवहि ते निर्माण करीत असत.

चरखा, ग्रामोद्योग, हिंदीचा प्रसार, अस्पृश्योद्धार व इतर सामाजिक सुधारणा या कार्यक्रमाद्वारे लोकांना त्यांनी मानसिक समाधान मिळवून दिले.

गांधीजी या सर्व कार्याकरिता तुम्हाला उद्यक्त करीत आणि तुमच्या मनात ही धारणा उत्पन्न करीत को हे सर्व करीत असताना आपण स्वातंत्र्यलढ्याची पूर्व तयारी करीत आहोत. विधायक कार्यक्रमाच्या प्रत्येक कृतीमागे ब्रिटिश साम्राज्यशाहीविरोधाचा संदेशहि होता. गांधीजींनी त्यांच्या पुढारीपणाखाली विधायक कार्यक्रमामार्फत राष्ट्रीय चळवळीकरिता सेवा आणि त्याग या भावनांनी प्रज्वलित झालेले शेकडो कट्टर कार्यकर्ते तयार केले. परंतु गांधीजी प्रतिनिधीत्व करीत असलेल्या वर्गाचे अस्तित्व धोक्यात येईल अशा क्रांतिकारी भावनेचा त्यांना स्पर्शहि झाला नव्हता. (गांधीच्या मताप्रमाणे क्रांतिकारी विचार म्हणजे 'पाप' होय व म्हणून कार्यकर्त्यांनी या विचारांमुळे दूषित व्हावयास नको होते.)

५) गांधीजींच्या त्या कालातील कार्याचा वैशिष्टचपूर्ण भाग म्हणजे त्यांनी राजकारण बाह्य दिसणारे विधायक कार्य आणि स्वराज्यिस्टांचे उघड राजकीय कार्य मोठ्या कौशल्याने एकत्र गोवले. एकीकडे स्वराज्यनाद्यांना 'आपण खरे राजकीय कार्य करित आहोत', हे समाधान मिळू दिले तर नाफेरवाद्यांना 'आपण भावी लढ्याची तयारी करीत आहोत', हे समाधान मिळाले. स्वराज्यवाद्यांचे खरे कार्य म्हणजे सर्व बाजूंनी सरकारवर टीका करणे व लढा देणे ! याप्रमाणे गांधीजी, स्वराजिस्ट व विधायक कार्यकर्ते या दोन्ही गटांचे सूत्रे आपल्या हातात ठेवून काँ. पुढारी व कार्यकर्ते यांची एकजूट घडवू शकले.

स्वराज्यवाद्यांना आशीर्वाद तर दिला पण काही अटीहि बालून दिल्या. त्यांनी काँ. च्या विधायक कार्यक्रमाला आधार द्यावा ही मुख्य अट ! त्यांनी काय करू नये याबद्दलही पुढील सूचना दिल्या :—

अडवणूकीचे धोरणाचा वापर न करता केंद्र सरकार व राज्य सरकारांना हात विणाई व बुनाईचे कापड खरेदी करण्यास भाग पाडावे, एवढेच नव्हे तर परदेशी कापडावर जबरदस्त कर बसविण्याचा आग्रह धरावा आणि जर सरकार हे ठराव विधि मंडळात मान्य केल्यावरहि अमलात आणण्यास तयार नसेल तर या मुद्यावर मतदारांची मते घेण्यास भाग पाडावे आणि हेहि न केल्यास सदस्यांनी आपआपल्या जागांचे राजीनामे द्यावेत व सविनय कायदे भंगासाठी देशाची तयारी करावी.

आपण स्वत: स्वराज्यवादी नाही असा दावा करूनहि स्वराज्यिस्टांच्या कार्यक्रमात मात्र त्यांनी मन:पूर्वक लक्ष दिले. मध्यवर्ती कायदेमंडळातील त्यांच्यासह (स्वराज्यिस्ट) सर्व सहकाऱ्यांनी वापरलेल्या डावपेचांना त्यांनी मान डोलविली. राष्ट्रीय मागणीचा प्रस्ताव, अडवणूकीचे धोरण व ते साध्य न झाल्यास सभात्याग करणे, हे ते डावपेच होत. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी उघडणे समझौता घडवून आणण्यास जें जे प्रयत्न स्वराज्यवादी करीत त्या सर्व प्रयत्नांना आपले वजन व अधिकार खर्ची घालून त्यांनी पाठिंबा दिला. परंतु त्या वाटाघाटी यशस्वी होत आहेत असे दिसून येईपर्यंत ते स्वत: मात्र पडद्यामागे राहत असत.

या संबंधात त्यांनी स्वराज्य पक्षांचे पुढारी देशबंधू दास आणि सेक्रेटरी ऑफ् स्टेट लॉर्ड बर्कनहेड यांच्यातील वाटाघाटीविषयी जे मत व्यक्त केले ते वैशिष्ट्यपूर्ण आहे. १ मे १९२५ च्या कलकत्त्याच्या भाषणात ते म्हणाले, "इंग्लंडच्या अद्वितीय मुत्सद्यांशी परराष्ट्र संबंध प्रस्थापित करण्याऐवजी भारताची अंतर्गत शक्ती वाढविण्यासाठी विधायक कार्यावर भर देणेच जास्त महत्वाचे आहे." तथापि काही दिवसांनंतर २० जूनला त्यांनी इग्रजांना देशबंधूंच्या मागणीला प्रतिसाद देण्याची जाहीर विनंती केली.

थोडक्यात त्यांनी जे तंत्र हळूहळू असहकारानंतरच्या कालात विकसित केले ते असे :– एकीकडे स्वराज्य वाद्यांना स्वराज्याची मागणी पुढे करू देणे आणि ब्रिटिशांशी बोलणी सुरु करण्याच्या प्रत्येक संधीचा उपयोग करु देणे, हे एक तंत्र! तर दुसरीकडे बोलणी फसली तर हजारो निःस्वार्थी विधायक कार्यकर्त्यांची संघटना तयार ठेवणे, आणि त्यातून देशाची दुसऱ्या अहिंसात्मक लढ्यासाठी तयारी करणे !

हे तंत्र भांडवलदार वर्गाच्या गरजांशी सुसंगत होते, एवढेच नव्हे तर गांधीजी त्या तंत्राचा यशस्वी रीतीने वापर करु शकले. एकीकडे विधायक कार्यक्रमाचे प्रत्यक्ष नेतृत्व तर दुसरीकडे वाटाघाटीच्या प्रश्नावर स्वराज्यिस्टांचे अप्रत्यक्ष नेतृत्व, असे दुहेरी पुढारीपण त्यांनी यशस्वी करून दाखविले यात शंका नाही. याच बरोबर काँग्रेसजन व इतर मवाळ भांडवलदारी पक्ष यांचेहि पुढारीपण त्यांनी मिळविले.

५ संपूर्ण स्वराज्य

गांधीजींच्या प्रभावाखाली काँ. विधीमंडळ प्रवेश व विधायक कार्यक्रम अमलात आणत होती. त्याच वेळी राष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रात दोन नवीन शक्तींचा उदय होत होता. जातीयवाद (हिंदू व मुस्लिम) आणि जहाल शाम्राज्यविरोधी शक्ती ! सविनय कायदेभंगाची चळवळ रद्द केल्यानंतर आणि त्यामुळे आलेल्या नाउमेदीच्या आणि राजकीय गोंधळाच्या वातावरणाचा परिपाक म्हणून ह्या शक्तींचा उदय झाला. ह्या दोन्ही शक्तींनी आपआपल्या परीने स्वराज्यपक्षाच्या व विधायक कार्यकर्त्यांच्या संबंधित कार्यक्रमात अडथळे निर्माण केले.

सविनय कायदेभंग रद्द केल्यानंतर काँ. मध्ये जी फूट पडली तिच्या मागोमाग स्वराज्यपक्षातहि फूट पडली. विधानसभांचा उपयोग सरकारचे वाभाडे काढणे व प्रचार करणे यासाठी करण्याचा मूळ उद्देश सोडून देऊन त्या ऐवजी तथाकथित 'प्रतियोगीसहकारिते'चे धोरण अमलात आणण्यासाठी त्यांनी स्वतःचे निराळे गट स्थापिले. हे मतभेद विधिमंडाळात आपले धोरण अमलात आणण्यासाठी कोणते प्रत्यक्ष डावपेच वापरावेत या प्रश्नावर झाले. त्यातूनच मतभेद वाढून त्याला जातीय स्वरूप आले.

१९२१ च्या कालातील बरेच असहयोगी कार्यकर्ते जातीयवादी झाले. सर्वसाधारणपणे जातीय संघटना विशेषतः हिंदू व मुस्लिम वाढू आगल्या आणि पुढारी आपआपल्या जमातीसाठी भरमसाट मागण्या करू लागले.

हा जातीयवाद वरच्या पातळीवर मागण्या आणि प्रतिमागण्या करूनच थांबला नाही तर त्याने सबंध देशावर जातीयवादाचा पगडा बसविला. गोहत्त्या, मशीदीपुढे वाद्य वादन, धर्मांतर या सर्वांनी गंभीर रूप धारण केले. आणि याचे पर्यवसान आपआपसात चकमकी व खून यात झाले. असहकारितेचे आंदोलन आणि खिलाफत चळवळीच्या दिवसांचे देशातील राष्ट्रीय लोकशाहीचे स्वरूप जाऊन त्याचे स्थान जातीयवादाच्या तंग वातावरणाने घेतले.

गांधीजींची या परिस्थितबद्दलची प्रतिक्रिया वैशिष्टचपूर्ण होती. या परस्परविघातक मांडणाने पूर्वीच्या गौरवपूर्ण दिवसांचे उल्हसित वातावरण नष्ट केले होते आणि त्यामुळे गांधीजींचे हळवे मन या जातीयतेमुळे उद्विग्न झाले. देवाधर्माच्या नावाखाली जी अमानुष कृत्ये लोकांनी केली ती प्रत्यक्षात सैतानालाहि लाजविणारी होती आणि त्यामुळे गांधीजींचे अंतःकरण पिळवटून निघाले. या परिस्थितीत जातीयवादाच्या निषेधार्थ त्यांनी 'पहिले' उपोषण सुरू केले.

अर्थात याचा तात्पुरता परिणाम झाला. निरनिराळ्या जमातीचे पुढारी एकत्र आले आणि त्यांनी जातीय सलोखा राखण्यासाठी आम्ही सर्व शक्ती खर्च करू असे आश्वासन गांधीजींना दिले. पण त्याचा देशाच्या सार्वजनिक जीवनावर कायम स्वरूपाचा परिणाम झाला नाही. या उलट गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वराज्याची चळवळ जितकी पुढे गेली तितकी जातीय परिस्थिती बिघडत गेली. पुढच्या प्रत्येक टप्पावर जातीय परिस्थिती म्हणजे गांधीजींच्या साम्राज्यविरोधी लढ्यात एक अडचणच झाली. शेवटी विकृत स्वरूपाच्या स्वराज्यात त्याचे पर्यवसान झाले. गांधीजींच्या ध्येयवादाला हा जबरदस्त टोला होता. परिणामतः बहुसंख्य हिंदूंचा भारतीय संघ आणि मुस्लिम बहुसंख्येचा पाकिस्तान, अशी दोन शकले झाली. आणि शेवटी यातील हिंदू जातीयवाद्यांच्या गोळीला बळी पडून त्यांचा दुःखद अंत झाला.

गांधीजींची जातीयवादाबद्दलची प्रतिक्रिया नुसतीच धर्माच्या नावाखाली केल्या गेलेल्या अमानुष अत्याचारापुरती मर्यादित नव्हती. स्वराज्याच्या लढ्यात निरनिराळ्या वर्गात, जमातीत व विभागात एकजूट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणारे ते राजकारणी पुरुष होते. जातीयतेचा प्रश्न हा नुसताच लोकांच्या धार्मिक भावनांचा प्रश्न नव्हता तर एक जिवंत राजकीय प्रश्न होता हे त्यांना ताबडतोब पटले. ब्रिटिशांकडून मिळालेल्या सत्तेची विभागणी करताना निरनिराळ्या जमातींच्या मागण्या व प्रति मागण्यांचा मेळ कसा बसवावा हा त्यांच्यासमोर प्रश्न होता.

स्वराज्याचे स्वरूप व आशय काय असावा ह्या विषयी काही मतैक्य असल्याशिवाय स्वराज्य मिळविणे अशक्य होते. त्यापूर्वी स्वराज्य मिळाल्यावर जनतेतील निरनिराळ्या भागांनी नव्या राजकीय घटनेत काय अपेक्षा करावी हे जनतेला समजाऊन देणे अवश्यक होते. भारतीय जनतेची स्वराज्याची मागणी नाकारण्यासाठी योग्य युक्तिवाद न करता ब्रिटिश सरकार देशांतील जातीजातींमधील फुटीचा जास्त ता जास्त उपयोग करून घेत होते.

तत्कालीन भारतमंत्री लॉर्ड बर्कनेहकड यांनी भारतीय पुढाऱ्यांनी सर्वांना मंजूर होईल अशी घटना तयार करावी असे आव्हान दिले. त्यांची खात्री होती की हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि अस्पृश्य वर्ग एकमेकांविरुद्ध ज्या मागण्या-प्रति मागण्या करतील त्यामुळे स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय, लोकशाही मागणीला संपूर्ण नकार मिळेल. (युरोपिअन, राजेरजवाडे, जमीनदार यासारख्या हितसंबंधियाची तर गोष्टच सोडा.)

प्रमुख राष्ट्रीय राजकीय संघटना या नात्याने काँ. ला जिवंत राहावयाचे असेल तर हे आव्हान स्वीकारणे भागच होते. आणि ते स्वीकारले गेले. काँ. ने पुढाकार घेऊन सर्वपक्षीय समिती स्थापिली. ह्या समितीचे अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू व सचीव जवाहरलाल होते. त्यांनी जो मसूदा तयार केला. (नेहरू रिपोर्ट) व घटना तयार केली तिचे सर्वांनी समर्थन केले. तरीहि तपशीलात मतभेद होतेच.

काँग्रेस, उदारमतवादी आणि इतर ज्येष्ठ मुत्सद्यांची नेहरू रिपोर्टला मिळालेली मान्यता, हे स्वराज्यवादी पुढाऱ्यांचे निःसंशय यश होते. या एकजुटीला साम्राज्यविरोधी जहाल शक्तींकडून प्रतिआव्हान मिळू लागले.

सविनय कायदेभंग रद्द केल्यामुळे सामान्य काँ. कार्यकर्ते आणि स्वयंसेवक यात चीड उत्पन्न झाली होती. **प्रतिपक्ष कमजोर असताना त्याचवेळी आपल्या पुढाऱ्यांनी दगा दिला, ही भावना हजारो काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनात दृढ झाली.** गांधीजींच्या धोरणातच त्यांना काहीतरी चूक आहे असे वाटत असले तरीहि मोतीलाल नेहरू, दास, विठ्ठलभाई पटेल इ. मंडळी काँ. मध्ये जे नवे राजकारण आणू पाहत होती त्याच्याशीहि ते सहमत नव्हते. विधीमंडळ प्रवेशविरोधी या अर्थाने ते नाफेरवादी होते. तथापि, नाफेरवाद्यांच्या विधायक कार्यक्रमशीहि त्यांचे विचार जुळत नव्हते. परिणामतः दोघांशीहि सहमत नसल्यामळे अगतिकता व नैराश्य वाटत होते. 'काहीतरी चुकत आहे' असे वाटत तर होते पण 'काय चुकते आहे', हे शोधून काढता येत नव्हते. काही बदल व्हावा अशी इच्छा होती पण तो काय असावा हे मात्र कळत नव्हते.

याचवेळी नवीन विचारांच्या लाटा परदेशातून येत होत्या. इजिप्त आणि आयर्लंडमधून लढाऊ साम्राज्यविरोधी विचार; तुर्कस्थानातून जहाल सामाजिक व सांस्कृतिक बदलाचे विचार; सोव्हिएत रशियामधून समाजसत्तावाद, या विचारांचा तरुण काँ कार्यकर्त्यांच्या भ्रमनिरास झालेल्या मनावर परिणाम होत होता. त्याचवेळी समाजातील नवेनवे वर्ग आणि विभाग प्रत्यक्षपणे सार्वजनिक जीवनात प्रवेश करित होते.

ह्या क्षेत्रात कामगारवर्गाच्या शक्तीचा उदय, ही एक विशेष महत्वाची घटना होती. १९२० पासून कामगारवर्गाच्या ह्या शक्तीची दखल घेणे आवश्यक झाले होते. असहकाराच्या चळवळीच्या आधी आणि त्या नंतरच्या कालात मजुरांचे संप, औद्योगिक आणि राजकीय जीवनांचे एक अंग होऊन ते

हळूहळू ट्रेडयूनिअनमध्ये संघटित होत होते. कामगार वर्गाच्या संघटनेची ही सुरवातीची पायरी होती. ऑलइंडिया ट्रेड यूनिअन काँग्रेस औद्योगिक क्षेत्राच्या रंगमंचावर आली आणि तिचा उपयोग सरकारने इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या अधिवेशनासाठी प्रतिनिधी निवडण्याची यंत्रणा म्हणून केला. ही ट्रेडयूनिअनच्या वाढत्या संख्येवर आधारित होती. ह्यातील बऱ्याच यूनिअन्सचे नेतृत्व तरुण राष्ट्रवाद्यांकडे होते. ते कामगारांमध्ये काम करू लागल्यामुळे जहाल साम्राज्यशाही विरोध आणि सामाजिक न्याय, यांचे नवे विचार त्यांनी हळूहळू आत्मसात केले.

साहजिकच जे तरूण राष्ट्रवादी कामगारवर्गात गेले आणि त्यांच्या चळवळीत समरस झाले ते जहाल साम्राज्यशाही विरोध, सामाजिक आणि सांस्कृतिक क्रांती आणि समाजवाद या नव्या विचारांच्या चळवळीचे ते केंद्रस्थान झाले. समाजवादी आणि कम्युनिस्ट, यांचे सुद्धा तुरळक गट मुंबई आणि कलकत्त्यात उदयास आले. हळूहळू राजकीय कार्याच्या इतर केंद्रापर्यंत ते पसरले आणि त्याचे पर्यवसान कामगार-किसान पक्षासारख्या संघटनेत झाले.

तथापि जो विभाग कामगार वर्गापर्यंत गेला तोच फक्त जहाल साम्राज्यशाही विरोधी विचारांचा बनला असे नाही, तर शहरी मध्यमवर्गात देखील हे विचार वाढू लागले आणि स्पष्ट होऊ लागले. त्यातील काहींनी वैयक्तिक दहशतवादाचा मार्ग धरला. असहकारानंतरच्या कालात असे गट वाढू लागले आणि त्याच प्रमाणात त्यांची 'दहशतवादी' कृत्येहि वाढू लागली.

तथापि दहशतवाद किंवा गांधीजींचे अहिंसातत्त्व व विधायक कार्यक्रम किंवा स्वराज्यवाद्यांचा विधीमंडळ प्रवेश यापैकी एकहि गोष्ट मान्य नसणारे काही गट देखील होते. ह्या शूर आणि स्वार्थत्यागी जहाल साम्राज्यविरोधी लोकांना गौरवणारा काँ. मध्येहि बराच मोठा वर्ग होता. त्यातील बऱ्याच जणांना त्यातील राजकारण पटत नसले तरी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या देशाचे ते खरे प्रतिनिधित्व करीत आहेत असे निश्चितेपणे वाटत होते.

अर्थातच हे जहाल साम्राज्यशाही विरोधी गट स्थानिक स्वरूपाचे होते आणि त्याना संघटित अखिल भारतीय, असे मार्गदर्शन नव्हते. त्यांच्यात धोरणाबद्दल तीव्र आणि महत्त्वाचे मतभेद होते. आणि त्यामुळे एक गट दुसऱ्या गटापासून अलग झाला होता. स्वराज्यिस्ट आणि नाफेर; प्रतियोगी सहकारी आणि इतर स्वराज्यिस्ट; काँग्रेस व उदारमतवादी इ. गटात जितके तीव्र मतभेद होते तितकेच तीव्र मतभेद या जहाल साम्राज्यशाही विरोधी गटांमध्ये होते.

लॉर्ड बर्कनहेड याच्या आव्हानानंतर सार्वजनिक चर्चेतून मिळालेल्या पाठिंब्यामुळे सर्वपक्षीय परिषद आणि नेहरूरिपोर्ट यातून देशाचे ध्येय कोणते असावे, या प्रश्नावर सर्व गटांचे ऐक्य घडून आले. नेहरूरिपोर्टाला (वसाहतीच्या स्वराज्याला) पाठिंबा देणारे एका बाजूला, तर त्याला विरोध करणारा देशातील जहाल साम्राज्यविरोधी तरूण वर्ग संपूर्ण स्वराज्याच्या झेंड्याखाली एकत्र झाला. ब्रिटिशसाम्राज्यातीत कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांना मिळालेले वसाहतीचे स्वातंत्र्य हे स्वराज्याचे ध्येय असावे या प्रश्नावर गांधी, मो. नेहरू व इतर मवाळ यांच्यात मतैक्य झाले. या वसाहतीच्या स्वराज्याच्या मागणीला देशातील निरनिराळचा जहाल साम्ज्यविरोधी गटांकडून प्रखर विरोध झाला. काँ. ने निःसंदिग्धपणे वसाहतीच्या स्वराज्याची मागणी फेटाळून लावावी आणि ब्रि. साम्राज्यपासून फुटून निघावे अशी त्यांची मागणी होती.

ह्या मागणीभोवती फक्त काँ. बाहेरील जहाल गटच एकत्र झाले असे नाही, तर तिने आपल्या बाजूला खुद्द काँ. मधील जहाल वर्गहि ओढले ह्या गटात काँ. चे सामान्य सभासदच नव्हे ज. नेहरू, सुभाषचंद्र बोस श्रीनिवास अय्यंगार, सत्यमूर्ती यासारखे धुरंधर पुढारीहि होते. पूर्ण स्वराज्याची घोषणा इतकी प्रभावी आणि आकर्षक होती की असंख्य काँ. वाल्यांना १९२७ मध्ये मद्रास अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव पास केला.

गांधीजींचा ह्या विचाराला पूर्ण विरोध होता. त्यांनी पहिल्या. महायुद्धात स्पष्ट केल्याप्रमाणे ते ब्रि. साम्राज्याचे मित्र होते. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्युझीलँड यांच्या बरोबरीचा दर्जा भारतीयांना मिळत नव्हता एवढेच त्यांचे गाऱ्हाणे होते. म्हणून त्यांनी मद्रास अधिवेशनातील मागणीचा उघड निषेध केला.

जे ठराव आपल्याला कार्यान्वित करता येत नाहीत असे ठराव करून आपण आपला निष्क्रीयपणा व्यक्त करतो व स्वःताचे हसे करून घेऊन टोकाकारांचा रोष ओढवून घेतो, असे गांधीजींचे मत होते.

मद्रास व लाहोर काँ. मधील दोन वर्षांच्या कालात संपूर्ण स्वराज्याच्या मागणीवर तुंबल खंडाजंगी होऊन २९ साली लाहोरला संपूर्ण स्वराज्याची मागणी हे त्वरित उद्दिष्ट ठरविण्यात आले. वसाहतीचे स्वराज्य आणि पूर्ण स्वराज्य यातील फरक केवळ शाब्दिक आहे असे ज. नेहरू, सुभाष बोस, श्रीनिवास अय्यंगार इ. पूर्ण स्वराज्य पंथाच्या लोकांना म. गांधी, मो. नेहरू यांनी पटवून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला.

जवळ जवळ एक वर्षाने काँ. च्या कलकत्ता अधिवेशनाचा समारोप करताना मोतीलाल नेहरू म्हणाले. :—

"आजपासून तुमच्या मनातून परदेशी भाषेतून घेतलेले 'इंडिपेन्डन्स्' आणि 'डोमीनिअन स्टेटस', हे शब्द पुसून टाका. त्या ऐवजी स्वराज्य आणि आझादी हे शब्द वापरा. शब्द कोणताहि असो ! आपण स्वराज्यासाठी झगडू या!" (ते)

तथापि काँ. च्या ह्या दोन वरिष्ठ दुढाऱ्यांचा उघड विरोध असूनहि पूर्ण स्वराज्याची चळवळ मदावली नाही. उलट मद्रास अधिवेशनानंतर चळवळीची शक्ती क्रमशः वाढतच गेली. ज. नेहरू सुभाष बोस, श्रीनिवास अय्यंगार, सत्यमूर्ती आणि इतर, यांनी सघटित केलेल्या 'इंडिपेन्डन्स ऑफ् इंडिया लीग' या संस्थेच्या झेंड्याखाली हजारो काँ. कार्यकर्ते एकत्र झाले. ह्यांतूनच काँ. मध्ये पर्यायी नेतृत्व निर्माण होण्याची शक्यता दिसू लागली.

ही परिस्थिती हेरून, गांधीजींनी वसाहतीचे स्वराज्य आणि पूर्ण स्वराज्य या दोन प्रकारच्या विचारसरणीत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पूर्ण स्वराज्याच्या उद्दिष्टाला चिकटून राहावयाचे पण वसाहतीचे स्वराज्य जर एक वर्षाच्या आत दिले तर काँ. ने ते मंजूर करावे, अशीही तडजोड होती. तथापि, जर ही अट एक वर्षात पूर्ण झाली नाही तर काँ ने पूर्ण स्वराज्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी गांधी, मो. नेहरू वगैरे पुढारी अहिंसात्मक असहकार संघटित करावयास मान्यता देतील.

ही तडजोड ठरावाच्या स्वरूपात काँ. च्या कलकत्ता अधिवेशनात ठेवण्यात आली. या ठरावाला सुरवातीस ज. नेहरू, सुभाष बोस यांनी मान्यता दिली. पण त्यांच्या अनुयायांच्या दबावामुळे या तडजोड प्रस्तावाला शेवटी त्याना दुरुस्ती सुचवावी लागली. तथापि गांधीनी आपल्या ठरावाच्या बाजूला बहुसंख्य प्रतिनिधींचे पाठबळ मिळविले. पण ९७३ प्रतिनिधी एक वर्षहि वाट पाहण्यास तयार नव्हते (१३५० प्रतिनिधी ठरावाच्या बाजूने होते) या वरून पूर्ण स्वराज्याच्या मागणीची चळवळ पुढे नेण्यास ते किती उत्सुक होते हे दिसून येते.

तथापि ब्रि. सरकार गांधी, मो. नेहरू यांची मागणी पूर्ण करायला तयार नव्हते. एकीकडे बहुसंख्यांक काँ. वाल्यांचे वसाहतीच्या स्वराज्याने समाधान होणार नव्हते तर ब्रि. सत्ताधारी प्रांतीय स्वायत्ततेशिवाय दुसरे काहीहि द्यायला तयार नव्हते. ते सुद्धा अल्पसंख्यांकांचे हक्क सुरक्षित ठेवून ! युरोपिअन जमीनदार, मुसलमान व इतर अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणाबद्दल बोलणे दूरच ! सप्रूंसारख्या मवाळांच्या सहाय्याने गांधी, मोतीलाल या पुढाऱ्यांनी त्यांचे वाटाघाटीचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत चालू ठेवले. लाहोर अधिवेशनाच्या सुमारास एक वर्षाची दिलेली मुदत संपत असतांना सुद्धा वाटाघाटी केल्या.

एका बाजूला गांधीजी ब्रि. शीं तडजोड करण्याचे प्रयत्न करीत होते तर दुसरीकडे काँ. मध्ये ठरलेली पूर्ण स्वराज्याची मागणीहि डोळ्यासमोर ठेवीत होते. या प्रयत्नाने काँ. मधील जहाल साम्राज्यविरोधी गट आपल्या बाजूला ओढला जाईल हे गांधीजींनी जाणले व याच उद्देशाने पं. ज. नेहरू यांचे नाव काँ. च्या लाहोर अधिवेशनाकरिता त्यांनी सुचविले.

ह्या अधिवेशनात देशभर प्रत्यक्ष चळवळीची हाक देण्याची शक्यता असल्यामुळे गांधीजींनीच काँ चे नेतृत्व करावे असा आग्रह धरणारे बरेच अनुयायी होते. काहींनी वल्लभभाई पटेलांचे नांव सुचविले. कारण त्यांनी बार्डोलीच्या लढ्याचे यशस्वी नेतृत्व केले होते. गांधीजींनी दोन्ही सूचना फेटाळल्या.

"वृद्ध लोकांकडे असलेले नेतृत्व तरुण वर्गाकडे" सोपविण्याचा परिणाम काँ. साठी घातकी ठरेल हा युक्तिवाद त्यांनी खोडून काढला. गांधीजी म्हणाले :-

"जवाहरलाल अती जहाल असले तरी अत्यंत क्षोभजनक परिस्थिती मध्येहि कठोर शिस्तीने व संयमाने वागण्याची योग्यता त्यांच्यात आहे." (तें.)

सर्व साधारणपणे तरुणांना उद्देशून गांधीजी म्हणाले की नेहरूंची निवड हे तरूणांनी त्यांच्या कार्याचे श्रेय समजावे ! तरुणांच्या शक्तीची तुलना वाफेशी करुन गांधीजी म्हणाले, "वाफ कोंडली गेली तरच प्रचंड शक्ती बनते आणि प्रचंड गती निर्माण करते." त्याचप्रमाणे, "या देशाच्या तरुणांनी स्वेछेने आपली अविरत शक्ती बंदिस्त करावी, तीवर ताबा मिळवावा आणि क्रमशः गरजेप्रमाणेच तिचा उपयोग करावा."

गांधीजींनी स्वराज्यिस्ट आणि नाफेरवादी यांना नेहरुंची काँग्रेसाध्यक्षपदी निवड करून एकत्र आणले. तरुणांच्या शक्तीवर आवर घालून योग्यवेळी तिचा वापर करण्याच्या दृष्टीने उचललेले हे पहिले पाऊल होते. आधुनिक समाजवादाच्या दिशेने जाणाऱ्या डाव्या चळवळीला भांडवलदार वर्गीय नेतृत्वाच्या चौकटीत आणण्याचा प्रयत्न त्यांनी अशा तऱ्हेने केला. त्या चळवळीला वर्गीय मार्गावर वाढू दिले नाही.

ज. नेहरुची लाहोर अधिवेशनात अध्यक्षपदी निवड आणि पूर्ण स्वराज्याची घोषणा हा पूर्ण स्वराज्याच्या समर्थकांचा विजयच होता. तथापी या विजयाच्या पाठीमागे वसाहतीचे स्वराज्य आणि पूर्ण स्वराज्य ह्या पंथात घडलेली तडजोड दिसून येते ह्या तडजोडीचा प्रयत्न कलकत्त्याला करण्यात आला होता पण तो अयशस्वी झाला होता. ह्या तडजोडीचा आधार दोन महत्वाच्या पत्रात आढळतो. तेंडूलकर खालील उतारा देतात :-

लाहोर अधिवेशनाचे काही आठवडे आधी लिहिलेल्या लेखात गांधीजी म्हणतात :- "खरेखुरे वसाहतीचे स्वराज्य मिळणार असेल तरच मी वसाहतीच्या स्वराज्यासाठी वाट पाहू शकतो.

"वसाहतीच्या स्वराज्याच्या कल्पनेचा माझा अर्थ पुढील स्वरूपाचा आहे. माझी इच्छा असेल तर ब्रिटिश संबंध तोडण्याची मला मुभा असावी"

ज. नेहरूंनी लाहोर अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात गांधीजींच्या भावना प्रतिध्वनित केल्या।— "ब्रि. दडपणापासून आणि ब्रि. साम्राज्यापासून पूर्ण मुक्तता हा आमच्या करिता स्वातंत्र्याचा अर्थ आहे. स्वातंत्र्य मिळाल्या-नंतर जागतिक सहकाराच्या आणि फेडरेशनच्यासाठी होणाऱ्या सर्व प्रयत्नांचे भारत स्वागत करील." (ते)

दुसऱ्या शब्दात गांधीजी पूर्ण स्वराज्य आपल्या समजूतीप्रमाणे मानावयास तयार होते तर जवाहरलाल स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यावर काही मर्यादा घालण्यास तयार होते.

गांधीजी व नेहरु या दोघांच्या मतातील तफावत अशा तऱ्हेने कमी झाल्यामुळे आणि राष्ट्रीय मागणीच्या पूर्ततेसाठी जनतेची चळवळच करावी लागेल, ही स्पष्ट जाणीव झाल्यामुळे कलकत्ता अधिवेशनाने मंजूर केलेले धोरण स्वीकारुन लढ्याची तयारी करण्यास त्यांना मान्यता द्यावी लागली. आता पूर्ण स्वराज्य हे अंतिम ध्येय नसून ते "नजीकचे उद्दिष्ट" आहे, असे गांधीजींनी लाहोर काँ.मध्ये (१९२९) जाहीर केले.



भारत खरोखरीच एका नव्या युगात प्रवेश करीत होता. जनव्यापी चळवळीची लाट उसळू लागली. १९२२ साली सविनय कायदेभगाची चळवळ रद्द केल्यामुळे नाउमेद झालेले हजारो स्त्रीपुरूष स्वातंत्र्यासाठी शिस्तबद्ध शिपाई म्हणून स्वतःला अर्पण करण्यासाठी पुढे आले. २६ जानेवारी १९३० हा 'स्वातंत्र्य दिन' म्हणून पाळण्यासाठी कार्यकारी समितीने दिलेल्या हाकेवर जनतेची गौरवास्पद निदर्शने झाली. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालील कार्यकारी समितीने दिलेले स्फूर्तिप्रद निवेदन (स्वातंत्र्याची शपथ) म्हणजे केवळ परकीय राजकर्त्यांच्या दुष्कृत्यांचे व अत्याचारांचे आरोपपत्रकच नव्हते तर परकीय सत्तेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी देशाच्या तरुण देशभक्तांना केलेले ते आवाहन होते ह्या ऐतिहासिक दिवसाच्या स्वागतासाठी खेड्यांनी आणि शहरांनी एकमेकांशी जणू स्पर्धा चालविली. कलकत्ता आणि मुंबई शहरात हजारो लोक एकत्र जमले आणि ती महान शपथ त्यांनी घेतली; आणि देशभर हजारो खेडुत निरनिराळ्या सभांना जमले.

मिठाचा कायदा मोडण्याचा आणि दाण्डी पदयात्रा काढण्याचा जो ऐतिहासिक निर्णय गांधीजींनी घेतला त्याकडे लोक संपूर्ण स्वराज्याच्या 'जनव्यापी चळवळीची सुरूवात' ह्या दृष्टीने पाहात होते. मिठाचा कायदा सामूहिकपणे मोडण्याची मोहीम प्रथम गांधीजींनी दाण्डीला सुरू केली आणि त्यानंतर देशातील इतर पुढाऱ्यांनी ! ब्रिटिशांच्या कायद्याचे उल्लघन होताना पाहण्यासाठी हजारो स्त्री-पुरुष व मुले ठिकठिकाणी जमू लागली. अटक, लाठीमार आणि गोळीबार यांनी न डगमगता जनता काँग्रेसच्या झेंड्याखाली जमली आणि तिने चळवळीत भाग घेयला.

जनतेच्या भावनेचे मोजमाप खालील वर्णनावरून घेता येईल: 'कलकत्ता, मद्रास, कराची येथे गोळीबार झाला आणि देशभर लाठीमार झाला. सभा आणि मिरवणूकांवर बंदी होती. परदेशी कापडाची दुकाने आणि दारूची दुकाने यांवर प्रखर निरोधने करून लोकांनी जुलुमाचा प्रतिकार केला.

१८ एप्रिलला चितगाव शस्त्रागारावर हल्ला झाला. पेशावरला क्रांतिकारी चळवळीची लाट शिखराला पोहचली. तिथे २३ एप्रिलला उग्र निदर्शने झाली. दुसऱ्याच दिवशी, नुकत्याच स्थापन झालेल्या 'खुदाई खिदमतगार' किंवा 'रेड शर्ट' चे पुढारी खान अब्दुल गफारखान यांना अटक झाली. ते जिथे स्थानबद्ध होते त्या जागेला हजारो लोकांनी गराडा घातला; आणि पेशावरकडे प्रचंड मोर्चा निघाला. संतप्त निदर्शकांना नामोहरम करण्यासाठी

शस्त्रसज्ज गाड्या सोडण्यात आल्या. एक शस्त्रसज्ज गाडी जाळण्यात आली. तिच्यातले लोक बचावले. त्यानंतर जमावावर जो गोळीबार करण्यात आला त्यात शेकडो लोक मृत्युमुखी पडले; शेकडो जखमी झाले. १८ व्या रॉयल गढवाली रायफल्सच्या दुसऱ्या बटालियनमधील दोन हिंदू पलटणींनी मुस्लिम जमावावर गोळीबार करण्यास नकार दिला; व त्यातील बऱ्याच जणांनी आपली शस्त्रे अधिकाऱ्याकडे परत केली.'

(प्र. ३, पृ. ४४)

गांधीजींच्या अटकेमुळे खळबळ माजली.

'गांधीजींच्या अटकेमुळे देशभर हरताळ आणि संप झाले. जवळजवळ ५० हजार गिरणी कामगारांनी मुंबईमध्ये संप केला. रेल्वे कामगारांनीही निदर्शनांत भाग घेतला. ही प्रंचड मिरवणूक पाहून पोलीसदेखील तेथून पळाले. कापड व्यापारांनी ६ दिवसांचा हरताळ पाळायचे ठरवले. गांधीजींना पुण्याला स्थानबद्ध करण्यात आले होते; व तिथल्या सरकारी व बिनसरकारी अधिकाऱ्यांचे राजीनामे वरचेवर जाहीर होत होते.

क्रांतिकारी उत्साहाने परमोच्च बिंदू गाठला. सोलापूर शहर आठदिवस पर्यंत जनतेच्या नियंत्रणाखाली होते. पोलीसाना बाजूला सारून जनतेने आपला अधिकार गाजविला. अखेरीस मार्शल लॉ पुकारण्यात आला. कलकत्ता, कराची, दिल्ली, रावळपिंडी आणि पेशावर येथेही उपद्रव झाला. सैन्य विमाने, रणगाडे, बंदुका आणि दारूगोळा आणण्यात आला; आणि वायव्य सरहद्द प्रान्तात त्यांचा सर्रास वापर करण्यात आला. जून महिन्यात पठाणांवर ५०० टन बाँब फेकण्यात आले; पण त्यांचे अवसान गळाले नाही. 'रेड शर्टस्' ची संख्या काही शेकडयांवरून ८०,००० पर्यंत गेली. पंजाबमधल्या दडपशाहीने 'अहरार' पक्षाला जन्म दिला. ही एक प्रभावी मुस्लिम संघटना होती.' (प्र. ३, पृ. ४९)

तथापि, एकीकडे जनता काँग्रेसच्या हाकेला प्रचंड प्रतिसाद देत होती; तर दुसरीकडे गांधीजी, हा उत्साह आणि लढाऊपणा भांडवलदार वर्गाला संरक्षण मिळेल अशा मार्गावर वळवू पाहात होते. हे त्यांनी अनेक मार्गांनी केले.

१) नजीकचे उद्दिष्ट म्हणून त्यांना 'पूर्ण स्वराज्य' मान्य करावे लागले असले तरी 'स्वातंत्र्याच्या शपथेवरची' शाई वाळते न वाळते तोच त्यांनी ते उद्दिष्ट सोडूनही दिले. व्हॉइसरॉयच्या घोषणेवर प्रतिक्रिया नोंदवितांना, ब्रिटिश

सरकार 'साररूपाने स्वातंत्र्य देण्यास तयार असेल' तर सविनय कायदेभंग रद्द करण्याची तयारी गांधीजींनी दाखविली. त्यांनी अकरा गोष्टींची मागणी केली.

संपूर्ण दारूबंदी; हुंडणावळीचा भाव १४ पेन्स करणे; शेतसारा ५० टक्क्यांनी कमी करणे; सुरवातीला सैन्यखर्च ५० टक्क्यांनी कमी करणे; सनदी नोकराचे पगार ५० टक्क्यांनी कमी करणे; परदेशी कापडाविरूद्ध संरक्षक जकात बसविणे; किनारपट्टीच्या संरक्षणाचा कायदा करणे; खून किंवा खुनाच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा झालेल्या कैद्यांव्यतिरिक्त अन्य सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता करणे; गुप्त पोलीसांचे खाते रद्द करणे किंवा लोकमताच्या नियंत्रणाखाली आणणे; स्वसंरक्षणार्थ, सार्वजनिक हिताचे बंधन पाळून दारूगोळ्याची हत्यारे बाळगण्यासाठी परवानगी देणे ....

ह्या अकरा मागण्या विशद करतांना गांधीजी म्हणाले: या अत्यंत साध्या पण अत्यावश्यक अशा आमच्या गरजा व्हॉईसरॉयने मान्य कराव्या. मग त्यांना सविनय कायदेभंगाची भाषादेखील ऐकावी लागणार नाही.

२) सविनय कायदेभंग करतांना त्यांनी प्रत्यक्ष कृती ही काही सत्याग्रहीं-पुरती मर्यादित केली. गुजरात विद्यापिठाच्या विद्यार्थांना उद्देशून बोलताना गांधीजी म्हणाले :

"आम्ही संख्येच्या बळावर अवलंबून नाही; तर सदाचाराच्या शक्तीवर अवलंबून आहोत. आणि सविनय कायदेभंगाचा ठराव आणला तो माझा काही लोकांच्या त्यागावर विश्वास होता म्हणून !" (पृ. ३, पृ. २)

३) चळवळीचे क्षेत्र निश्चितपणे मर्यादित करण्यासाठी आपल्या मागण्यांच्या मसुद्यात, लाखो कामगार किंवा शेतकरी-कामकरी जनतेच्या मागण्या गोवण्याचे त्यांनी टाळले. हा मसुदा गांधीजींच्या मते 'स्वातंत्र्याचा गाभा' होता; परंतु त्यात मालक-जमीनदार-सावकार यांच्याविरूद्ध कामगार-शेतकरी वर्गाला मिळावयाच्या मागण्याचा मागमूसही नव्हता. शेतकऱ्यांचा हिताचा केवळ एकच गोष्ट त्यात होती व ती म्हणजे शेतसारा ५० टक्क्यांनी कमी करणे ! खंड कमी करणे, कर्जफेड लांबणीवर टाकणे, कुळांची बेदखली थांबविणे, कामगार व कर्मचारी यांना पुरेशी मजुरी व पगार देवविणे यांसारख्या प्रश्नांचा विचार त्यात करण्यात आला नव्हता.

एक वर्षानंतर कराची अधिवेशनात काँग्रेस पुढाऱ्यांनी कामकरी जनतेच्या बऱ्याच मूलभूत मागण्या मान्य केल्या. औद्योगिक कामगारांना राहणीमानानुसार

मजुरी, कामाचे ठरीव तास, कामाकरिता आरोग्यदायक वातावरण, म्हातारपण-आजारपण-बेकारी यांच्या आर्थिक परिणामापासून संरक्षण, शेतकऱ्यांनी भरावयाच्या खंडात महत्त्वाची सूट आणि अनुत्पादक शेतीच्या खंडात घट ह्या मागण्यांचा काँग्रेसच्या कार्यक्रमात समावेश करण्यात आला. हे ठराव मांडतांना केलेल्या भाषणात गांधीजी म्हणाले.

"जे आमदार नाहीत; घटनेच्या बारकाव्यांची छाननी करण्याची ज्यांना गरज नाही; देशाच्या राज्यकारभारात ज्यांचा भाग नाही अशा मूक जनतेस उद्देशून हे ठराव आहेत. मोळचामावडचा गरीब भारतीयांना स्वराज्य किंवा रामराज्याची स्थूलमानाने कल्पना देणे हा याचा अर्थ आहे." (प्र. ३, पृ. ११२-३)

कराची कार्यक्रम मांडण्यात दुहेरी उद्देश होता.

१. कामकरी वर्गाला जागृत करण्याची क्षमता काँग्रेस नेतृत्वात येऊन त्यांच्या या मागण्यांकरिता काँग्रेस लढत आहे असा भास निर्माण व्हावा. व

२. अशाप्रकारे मिळविलेल्या जनतेच्या ताकदीचा उपयोग करून ब्रिटिश सरकारकडून ११ कलमी मागण्या मिळवाव्या.

जनतेच्या नियंत्रित कृतीच्या जोरावर साम्राज्यवाद्यांशी वाटाघाटी करण्याचे तंत्र गांधीजींनी पूर्वी द. आफ्रिकेत वापरले होते; व पूर्ण स्वराज्याची 'नजिकचे उद्दिष्ट' म्हणून घोषणा करताना किंवा सविनय कायदेभंगाची घोषणा करताना गांधीजींनी या तंत्रात यत्किंचितही बदल केलेला नव्हता. ब्रिटिश सरकारशी तडजोड करणे हा त्यांचा मूळ उद्देश होता हे त्यांनी शब्दांतून आणि कृतींतून वारंवार स्पष्ट केले होते. सविनय कायदेभंग सुरू करण्यापूर्वी त्यांनी व्हॉईसरॉयला लिहिले;

'आपल्यापेक्षा लोकसंख्येने व प्राचीनत्वाने कितीतरी मोठे असलेल्या व सांस्कृतिक दृष्टचा कोणत्याही अर्थाने कमी नसलेल्या एखाद्या राष्ट्रास कळत न कळत गिळंकृत करणारे जे राष्ट्र असते त्याचे आमूलाग्र मतान्तर घडवून आणणं ही गोष्ट साहसाची आहे.

मी मतान्तर हा शब्द बुद्धिपुरस्सर वापरला; कारण ब्रिटिशांचे अहिंसात्मक मार्गांनी हृदयपरिवर्तन करण्याची माझी इच्छा आहे; आणि त्यांनी भारतावर काय अन्याय केला हे त्यांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे.' (प्र. ३, पृ. २२)

१९३० मधील सविनय-कायदेभंगाच्या चळवळीतील वरील तीन गोष्टींचा उपयोग, लॉर्ड आयर्विन व लॉर्ड विलिंग्डन या दोन व्हॉईसरॉयांमार्फत करून घेण्याचे ब्रिटीश सरकारने ठरविले. १९३०-३२ मधील ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या डावपेचांचा सारांश एकंदरीत असा देता येईल

एकीकडे जनतेविरूद्ध दडपशाही तर दुसरीकडे पुढाऱ्यांशी वाटाघाटी असे 'दुटप्पी धोरण' लॉर्ड आयर्विन व लॉर्ड विलिंग्डन यांनी स्वीकारले. हयाच

धोरणामुळे, एकीकडे काँग्रेस नेतृत्वाला सविनय कादेभंग रद्द करण्यास भाग पाडणे आणि दुसरीकडे त्यांचे प्रतिनिधी 'दुसऱ्या गोलमेंज परिषदेला' पाठविणे त्यांना शक्य झाले. सविनय कायदेभग रद्द करुन 'दुसऱ्या गोलमेज परिषदेला' हजर राहण्यास काँग्रेसला भाग पाडून भारतीय जनतेची दडपशाही व त्याचवेळी गैर-काँग्रेस प्रतिनिधींना चलाखीने परिषदेला पाठवून काँग्रेस–प्रतिनिधींची केलेली एकाकी अवस्था हे त्यांच्या धोरणाचे फलित होय. भारतीय राज्यघटनेचा प्रश्न अत्यत विकट झाला असून भारतीय पुढारी तो सोडवू शकत नाहीत असा जगभर डागारा पिटून त्यावर उपाय म्हणून 'जातीय निवाडा' जाहीर करणे भाग पडत आहे असे भासविणे ब्रिटिश सरकारला यामूळे शक्य झाले.

अशा प्रकारे 'दुसऱ्या गोलमेज परिषदेत' काँग्रेसला एकाकी पाडून व राज्यघटनेचा प्रश्न सोडविण्यास काँग्रेस असमर्थ आहे असे भासवून साम्राज्यवाद्यांना काँग्रसवर तीव्र हल्ला चढविला. गांधीजी गोलमेज परिषदेहून परत येईपर्यंत उत्तर प्रदेश व वायव्य सरहद्द प्रान्त वटहुकुमाखाली आलेले होते आणि जवाहरलालसकट बरेच काँग्रेस पुढारी जेलमध्ये डांबले गेले होते. तडजोड घडवून आणण्याचे गांधीजींचे सर्व प्रयत्न फसल्यामुळे गांधीजींनी व काँग्रेस कार्यकारिणीने मार्च १९३१ मध्ये झालेला संधी रद्द करण्याचे आणि रद्द केलेला सविनय कायदेभंग पुन्हा सुरू करण्याचे ठरविले. तेव्हा संबंध देश 'न भूतो न भविष्यति' अशा दडपशाहीच्या भक्ष्यस्थानी पडला.

साम्राज्यवाद्यांच्या डावपेचांना उत्तर देण्याचे काँग्रेसने ठरविले. हे तंत्र ज्या पद्धतीने अंमलात आणले गेले त्यावरुन गांधीजींची कार्यपद्धती, तत्वज्ञान आणि तंत्र प्रत्यक्षात कसे होते हे अचूकपणे निदर्शनास येते.

मिठाचा कायदा मोडून सविनय कायदेभंग सुरू करण्यासाठी तयारी करण्याच्या नावाखाली त्यांनी जनतेची साम्राज्यविरोधी भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला आणि अहिंसापालनाची मर्यादाही घालून दिली. त्यात ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या मतपरिवर्तनाचे तत्वज्ञानही होते. त्या प्रसिद्ध स्वातंत्र्य-शपथेत असे सांगण्यात आले की ब्रिटिश सरकारने भारताचा आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व आध्यात्मिक दृष्ट्या नाश केला आहे; व ज्या ब्रिटिश सरकारने असा चतुर्विध अन्याय आमच्या देशावर केला त्याला शरण जाणे हे मानवजातीचा व परमेश्वराचा उपमर्द करणेच होय. तथापि, स्वातंत्र्य मिळविण्याचा परिणामकारक मार्ग हिंसेचा नव्हे, असा आमचा दृढविश्वास आहे.

हे नजरेसमोर ठेवूनच ११ कलमे तयार झाली होती. त्यांचा रोख ब्रिटिश शोषणाविरूद्ध होता व त्यामुळेच मांडवलदारवर्गासकट जनतेचे सर्व भाग एकत्र येणार होते. त्यांचा रोख भारतीय शोषकांच्या शोषनाविरूद्ध नसल्यामुळे देशात 'सार्वत्रिक हिंसा' उत्पन्न होण्याची शक्यताही नव्हती.

जेव्हा हे पर्व संपले आणि ब्रिटिश सरकारशी वाटाघाटी करण्याचे नवे पर्व सुरू झाले तेव्हा वाटाघाटीच्या सर्व मार्गांचा अवलंद करुन मांडवलदारवर्ग हा ब्रिटिशांच्या तुलनेत आर्थिक आणि राजकिय दृष्टया मजबूत होईल अशी तडजोड घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्या अटींच्या आधारावर गांधीजी आणि नेहरु पितापुत्र सविनय कायदेभंग मागे घ्यायला तयार होते त्या अटी अशा — (अ) भारताचा ब्रिटिश सामग्रज्यातून बाहेर पडण्याचा हक्क मान्य करावा. (ब) भारतीय जनतेला जबाबदार राहील अशा संपूर्ण राष्ट्रीय सरकारच्या हाती नियंत्रण असावे. त्याने ही अकरा कलमे अंमलात आणावी. (क) ब्रिटिशांचे हक्क, त्यांच्या सवलती, त्यांचे भारतावरील राष्ट्रीय कर्ज यांचा विचार स्वतंत्र लवादाने करावा

तथापि, या अटीवर तडजोड अशक्य आहे असे दिसताच त्यांनी देशात राजकीय व संघटना दृष्टीने काँग्रेसपक्ष मजबूत होईल असा तह मान्य करण्याचे ठरविले. शक्तीशाली ब्रिटिश सरकारने काँग्रेसशी वाटाघाटी केल्या आणि तडजोड केली. हया तडजोडीत काँग्रेसच्या मागण्या अंशतः पूर्ण करण्यास वाव होता. (उदा. काही भागांत मीठ उत्पादन करण्याची परवानगी, बहुसंख्य राजकीय कैद्यांची सोडवणूक इ.) ही वस्तुस्थिती काँग्रेसला मजबूत बनविण्यास व स्वातंत्र्य लढा सुरू ठेवण्याची क्षमता निर्माण करण्यास पुरेशी होती.

म्हणून त्यांनी हया करारान्वये मिळालेल्या फायद्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला आणि स्वातंत्र्यलढा आणखी मजबूत करण्यासाठीच हया अटी स्वीकारल्याचे त्यांनी जनतेला सांगितले. तथापि, नेमकी होच परिस्थिती नोकरशाहीला नको होती. आणि म्हणून काँग्रेस व नोकरशाही या दोहोंत राजबंद्यांची सुटका, कायद्यांची अंमलबजावणी व शेतसारावसुली हयासारख्या प्रश्नावर खटके उडत गेले.

हया प्रत्येक मुद्यावर आपल्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्यासाठी काँग्रेस नेत्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. आणि सरकारने कराराच्या अटी काटेकोरपणे न पाळल्यास दुसऱ्या गोलमेज परिषदेस प्रतिनिधी न पाठविण्याची धमकीही ते देत राहिले. मात्र सरकारने काही सवलती दिल्यामुळे शेवटी काँग्रेसने गांधीजींना गोलमेज परिषदेला हजर राहण्याची परवानगी दिली.

दुसऱ्या गोलमेज परिषदेत त्याचप्रमाणे नंतरही काँग्रेसने मुसलमान व इतर अल्पसंख्याकांना काही सवलती देऊन ब्रिटिश सरकारच्या जातीय तोडफोडीच्या कारवायांना प्रत्युत्तर दिले. दुसरी गोलमेज परिषद फिसकटल्यानंतर ब्रिटिश सरकारने काँग्रेसवर सरळ हल्ला केला. त्यामुळे साहजिकच डिवचले जाऊन काँग्रेसने प्रत्यक्ष प्रतिकाराचे धोरण स्वीकारले. पण दुसरी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली न झाली तोच त्यांच्यातील सर्वात चाणाक्ष अशा गांधीजींनी नवे डाव पेच शोधून काढले.

४ जानेवारी १९३२ ला गांधीजींना अटक झाली. पूण स्वराज्यमिळविण्यासाठीं सविनय कायदेभंगाच्या परिणामकारक कृतीपेक्षा महत्वाचे असे दुसरे उद्दिष्ट आपणास साध्य करावयाचे आहे असा निर्णय गांधीजींनी ११ मार्चपर्यंत घेतला. ११ मार्चला त्यांनी सर सॅम्युअल होअर यांना लिहिले– " (गोलमेज परिषदेच्या वेळी दिलेल्या भाषणानुसार) अस्पृश्य व मागासलेल्या वर्गाकरिता स्वतंत्र मतदार संघ देण्यांचे ब्रिटिश सरकारने ठरविल्यास मी प्राणातिक उपोषन करीन " (प्र. ३, पृ. १९५)

ब्रिटिश पंतप्रधानांनी 'जातीय निवाडा' दिल्यामुळे (ज्या द्वारे दलित वर्गाला वेगळा मतदारसंघ मिळणार होता) मला प्राणांतिक उपोषण करणे भाग पडेल, असे ते म्हणाले.

हे पत्र म्हणजे काँग्रेसने सार्वत्रिक सविनय कायदेभंगाच्या चळवळीतून हळू हळू अंग काढून घेण्याच्या क्रियेची नांदीच होती. त्यासाठीच एकीकडे विधिमंडळातोल लढा व दुसरीकडे विधायक कार्यक्रम; असे धोरण आखण्यात आले. ब्रिटिश सरकारने ही मागणी धुडकावली व शेवटी 'जातीय निवाडा' दिला त्यामुळे गांधीजींनी प्राणांन्तिक उपोषण सुरू केले.

हचा उपोषणामुळे काँग्रेस व काँग्रेसेतर पुढाऱ्यांचे जे संमेलन झाले त्यात दलित वर्गाचे पुढारीही होते. त्यांच्यामध्ये समझौता झाला आणि त्यामुळे 'जातीय निवाडचा' – त दलित वर्गाच्या संबधात काही दुरूस्ती मान्य करणे शक्य झाले.

हचा समझौत्यात अस्पृश्यता-निवारणासाठी आणि दलितांची स्थिती सुधारण्यासाठी देशव्यापी जन-आंदोलनाची मोहीम सुरू करावयाचे ठरले. गांधीजींना जेलमधून हरिजन कार्य चालू ठेवू देण्यात आले. त्यामुळे तुरुंगाबाहेरील काँग्रेसजनांची शक्ती, सविनय कायदेभंगाची चळवळ संघटित करण्याऐवजी हरिजन कल्याण कार्य संघटित करण्याकडे वळवली गेली.

हरिजन कार्यांच्या प्रगतीमुळे आपण पूर्णपणे संतुष्ट नाही असे म्हणून गांधीजीनी में १९३३ मध्ये आत्मशुद्धिकरिता २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. हचाचा परिणाम म्हणून त्यांची सुटका झाली व हचा सुटकेचा उपयोग करून त्यांनी त्या वेळच्या काँग्रेस अध्यक्षांना सविनय कायदेभंग रद्द करण्याचा सल्ला दिला.

तथापि, तडजोडीचा पवित्रा घेतल्यावर सरकारचे दडपशाहीचे धोरण सैल होईल ही गांधीजी आणि काँग्रेस-अध्यक्षांची अपेक्षा फोल ठरली. म्हणून गांधीजींनी सविनय कायदेभंग सुरू करण्याचा सल्ला दिला; पण त्याचे स्वरुप सामुदायिक नसावे असे सूचित केले. तो कोणत्या पद्धतीने करावा याविषयी काही निर्बंध घातले; स्वतः वैयक्तिक कायदेभंग सुरू केला आणि संपूर्ण देशाला सामूहिक कायदेभंगाऐवजी वैयक्तिक सत्याग्रहाच्या मार्गावर आणून ठेवले

जेलमधून हरिजन काय चालू ठेवण्यासाठी सवलती देण्यास सरकारने नकार दिल्यामुळे गांधीजींनी पुन्हा उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती खरोखरच चिंताजनक झाल्यामुळे त्यांना पुन्हा सोडून द्यावे लागले. सुटून आल्यावर, आपण निव्वळ हरिजन कार्य करणार असून राजकीय कार्यापासून पूर्णपणे अलिप्त राहणार आहोत, असे गांधीजींनी जाहीर केले.

१९३३–३४ दरम्यानचे काळात हरिजन कार्याकरिता फंड गोळा करण्याच्या तथाकथित हेतूने गांधीजींनी भारताचा व्यापक दौरा केला. ह्याचा उपयोग सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या भवितव्याविषयी अनौपचारिक सल्लामसलत करण्यासाठी गांधीजी व जेलबाहेरील काँग्रेस पुढारी यांनी करुन घेतला. काही काँग्रेस पुढाऱ्यांनी आपापसात गाठीभेटी घेतल्या आणि ते स्वराज्य पक्ष संघटित करण्याचा विचार करू लागले. साहजिकच त्यांनी गांधीजींचा सल्ला घेतला. ह्या सल्लामसलतीनुसार गांधीजींनी ७ एप्रिल १९३४ ला एक निवेदन काढले.

" सर्व काँग्रेसवाल्यांनी स्वराज्याकरिता चालू असलेला कायदेभंग (– विशिष्ट अन्यायाविरुद्ध चालू असलेला नव्हे –) तहकूब करावा असा सल्ला देणे मला भाग पडत आहे. त्यांनी ती बाब केवळ मजवर सोपवावी. माझ्या आयुर्मर्यादेत इतरांना त्याचा उपयोग करता येईल–पण केवळ माझ्याच नेतृत्वाखाली ! या शास्त्राचे माझ्याहून अधिक ज्ञान असलेला दुसरा कोणी पुढे येईपर्यंत व त्याच्या ज्ञानासंबंधी विश्वास निर्माण होईपर्यंत असे करावे लागेल. सत्याग्रहाचा निर्माता आणि विधाता या नात्याने मी हे मत देत आहे. म्हणून यापुढे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने संपूर्ण स्वराज्याकरिता कायदेभंग करण्यास प्रवृत्त झालेल्या सर्व लोकांनी सविनय कायदेभंगापासून परावृत्त व्हावे. " (प्र. ३, पृ. ३१९)

गांधीजींच्या ह्या निवेदनापाठोपाठ सरकारने एक निवेदन काढून काँग्रेसला असे आश्वासन दिले की गांधीजींनी केलेले धोरणविषयक निवेदन अमलात आणण्यासाठी व सविनय कायदेभंग रद्द करण्यासाठी ए. आय्. सी. सी., किंवा काँग्रेस पुढाऱ्यांना योग्य वाटल्यास इंडियन नॅशनल काँग्रेसची सभा घेण्यास हरकत नाही.

मे महिन्यातील ए. आय्. सी. सी. मीटिंगसाठी व्यासपीठ तयार करण्यात आले ते अशा रीतीने. ह्यात सविनय कायदेभग रद्द करण्याच्या गांधीजींच्या निवेदनाला मंजुरी देण्यात आली; आणि पुढे येणाऱ्या केन्द्रीय विधिमंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्याचे ठरविण्यात आले.

० ० ० ०

७. राजकारणापासून अलिप्त

ज्या वेळी संपूर्ण राष्ट्र हे शत्रूशी लढा देण्यात गुंतले होते त्याचवेळी जनव्यापी चळवळीच्या या सर्वश्रेष्ठ पुढाऱ्याने एका गौण प्रश्नाकडे का लक्ष द्यावे ? ज्या प्रश्नांचा समावेश राजकीय जनआंदोलनाच्या अनेक प्रश्नांमध्ये व्हावयास हवा होता तो प्रश्न सामाजिक सुधारणेपुरताच (अस्पृश्यांचे समाजातील व राज्ययंत्रणेतील स्थान) मर्यादित का ठेवला जावा ? सविनय कायदेभंग मागे घेण्याची घाई त्यांनी का करावी ? – हचा प्रश्नांची उत्तरे, गांधीजींच्या सत्याग्रहावरील वक्तव्यावर आपण अवलंबून राहिलो तर सापडणार नाहीत. चळवळीने हिंसक वळण घेतले किंवा तशी शक्यता निर्माण झाली तरच गांधीजींच्या सत्याग्रहाच्या तत्वज्ञानाप्रमाणे, सामूहिक चळवळ रद्द करण्याचा प्रश्न उत्पन्न होत होता ; व हे संकट लक्षात घेऊन गांधीजींनी १९२२ ची चळवळ रद्दही केली. परंतु १९३२ मध्ये ही परिस्थिती नव्हती.

सरकारने मुद्दाम केलेल्या प्रक्षोभकारक आणि पाशवी कृत्यांनंतरही सत्याग्रह–चळवळ गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे शांततापूर्ण व अहिंसक राहिली.

हजारो स्त्री-पुरुष सत्याग्रहींनी गांधीजींच्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन केले ; त्यामुळे अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावर उपोषण करण्याच्या गांधीजींच्या निर्णयाने त्यांना धक्काच बसला. आणि आपली सर्व शक्ती हरिजनोद्धारासाठी खर्च करण्याचे गांधीजींनी ठरविले आहे हे कळल्यावर तर त्या धक्क्याची तीव्रता अगणीच वाढली.

साम्राज्यविरोधी राजकीय चळवळीचा अग्रगण्य पुढारी हचा गौण सामाजिक प्रश्नास स्वतःला वाहून घेत आहे आणि अनुयायांना देखील तेच सांगत आहे या वस्तुस्थितीमुळे, आपल्याच पुढाऱ्याने दगा दिल्यासारखे वाटून त्यांना संताप आला.

गांधीजींनी आपल्या डावपेचात असा बदल करण्याचा अविचारी निर्णय घेऊन हजारो अनुयायांची नाराजी का पत्करली ? त्यांना राजकीय चळवळीपेक्षा सामाजिक सुधारणा महत्वाच्या वाटत होत्या का ? – हचा प्रश्नाचे उत्तर 'नाही' हेच होय ! अर्थात् गांधीजी हे एका वर्गाचे (भांडवदार वर्ग) अत्यंत धूर्त पुढारी होते व या भांडवलदारांच्या हितसंबंधाचेच ते नेहमी रक्षण करीत असत.

तत्कालीन राजकीय परिस्थितीला कलाटणी देण्याकरिता गांधीजींनी पुढील तंत्र अत्यंत विचारपूर्वक तयार केले. सप्टेंबर १९३२ मधील उपोषण व वरवर दिसणारा हरिजनोध्दाराचा कार्यक्रम हे त्या तंत्राचेच अविभाज्य अंग होते. हचा संबंधात १९३२ चा लढा कसा सुरु करण्यात आला हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले असता ब्रिटिश सरकारशी काँग्रेसचे मतभेद झाले. काँग्रेससारख्या स्वाभिमानी राष्ट्रीय संघटनेला अशा परिस्थितीत जन-आंदोलन सुरू करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. सरकारने मात्र काँग्रेसच्या बाबतीत कडक धोरण स्वीकारण्याचा निर्धार केला आणि १९३०-३१ ची पुनरावृत्ती होऊ नये (काँग्रेस व सरकार यातील वाटाघाटी) यासाठी आवश्यक पावले उचलली. याचाच अर्थ हा की १९३२ चा लढा हा गांधीजी आणी त्यांचे सहकारी यांवर लादल्या गेल्यासारखा होता.

हीच परिस्थीती चालू राहिल्यास सरकारला त्याच्या सोयीप्रमाणे राज्य घटना बनविता येईल असे गांधीजींचे मत होते. अशा प्रकारे बनविलेली घटना काँग्रेसेतर-विशेषत: जातीय-पक्ष काँग्रेसला कमकुवत करण्याकरिता उपयोगात आणतील व त्याचा फायदा राष्ट्रीय मागणी धुडकावून लावण्याकरिता सरकार करुन घेईल अशी शक्यता गांधीजींना वाटत होती. ही शक्यता टाळण्याकरिता सरकारशी बोलणी सुरू करण्यासाठी त्यांनी सर्व मार्गांचा अवलंब केला आणि सहाजिकच सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली. अस्पृश्यांकरिता विभक्त अथवा संयुक्त मतदारसंघाची, एकाच वेळी सामाजिक व राजकीय स्वरूपाची असलेली चळवळ त्यांनी हातात घेतली ती याच उद्देशाने !

यामुळे एकीकडे जनतेसमोर येऊन काही सामाजिक सुधारणा करणे व दुसरीकडे सरकारशी घटना दुरूस्तीबद्दल वाटाघाटी करणे हे त्यांना शक्य झाले. सरकारने हरिजनोद्धाराच्या कार्यक्रमाचा शब्दश: अर्थ घेऊन हा प्रश्न निव्वळ सामाजिक सुधारणेचा समजून राजकीय प्रश्नांवर बोलणी सुरू करण्यास नकार दिला. गांधीजींनी हचा अल्प संधीचाही उपयोग सहकाऱ्यांशी आणि जनतेशी देखील संबंध दृढ करण्यासाठी करून घेतला.

त्यांची हरिजनोद्धाराच्या कार्याबाबतची कळकळ ही नुसतीच सामाजिक नव्हती हे नंतरच्या घटनांनी सिद्ध केले. जेलमधून बाहेर आल्यानंतर (मे १९३३) पहिली संधी मिळताच त्यांनी काँग्रेस अध्यक्षांवर वजन टाकून सविनय कायदेभंग मागे घेण्यास त्यांना भाग पाडले. एवढ्यावर देखील राजकीय प्रश्नांवरच्या वाटाघाटी सुरु करण्यास सरकारने स्पष्ट नकार दर्शविला ; कारण सरकारला काँग्रेसचे पूर्ण शरणागतीच हवी होती म्हणून स्वत:चा व संघटनेचा स्वाभीमान राखण्यासाठी सविनय कायदेभंग सामुदायिक स्वरुपात नाही तरी वैयक्तिक स्वरुपात का होईना पण त्यांना सुरु करावा लागला. अर्थात " राजकीय प्रश्नांवर आपण एक वर्षभर तरी बोलणार नाही हे पहिल्याच संधीला सूचित करण्यास ते चुकले नाहीत.

त्यांच्या हरिजन कार्यातील कळकळीचा आणि त्यातून उद्भवणाऱ्या इतर कार्याचा एवढाच अर्थ केला पाहिजे की सरकारशी बिनसल्यामुळे काँग्रेस ज्या खोडचात अडकली होती त्यातून तिला बाहेर काढण्यासाठी त्यांचा तो एक प्रयत्न होता. घटना दुरूस्तीच्या प्रश्नावर सुरू केलेली पण दुसऱ्या गोलमेज परिषदेत तात्पुरती फिस्कटलेली बोलणी सुरू ठेवण्याचा व ह्या नव्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी काँग्रेसची पुनर्रचना करण्याचा तो एक प्रयत्न होता. १९२२ मध्ये सविनय कायदेभंग रद्द केल्याबद्दल मोतीलाल नेहरुंसारख्या मवाळ उजव्यांनी गांधीजीचा निषेध केला होता ; तर १९३४ मध्ये मात्र त्याच सत्याचे सर्व उजव्या पुढाऱ्यांनी मनःपूर्वक स्वागत केले ; या मागचे कारण हेच. १९२० मध्ये काँग्रेसमध्ये 'स्वराज्यीस्ट' व 'नाफेर' अशी फूट पडली ; त्याउलट १९३४ मध्ये मात्र पुढाऱ्यांमध्ये विधिमंडळकार्यांच्या प्रश्नावर संपूर्ण मतैक्य होते. विधिमंडळ मनोवृत्ती (Parliamentarism) कार्यकर्त्यांमध्ये रुढ झाली आहे, असे स्वतः गांधीजींचेच १९३४ मधील उद्गार आहेत. तयार होऊ घातलेली राज्यघटना हाच त्यावेळचा महत्वाचा राजकीय प्रश्न होता आणि म्हणून काँ. मधील उजव्या पुढाऱ्यांचे ह्या प्रश्नावर मतैक्य झाले होते. अशा परिस्थितीत ह्या राज्यघटनेला नकार दर्शविणे धोक्याचे होते. म्हणून १९२० प्रमाणे काँ. बाहेरील 'स्वराज्य' पक्षाऐवजी आता अखिल भारतीय काँ. महासमितीने नियुक्त केलेले सासदीय मंडळ निवडणुकीत मार्गदर्शन करणार होते.

काँ. नेतृत्वात डावपेचांविषयी पूर्ण मतैक्य असले तरी संघटना म्हणून काँ. मध्ये तितकीशी एकजूट नव्हती. काँ. मध्ये कडाक्याचा वादविवाद सुरू झाला. सप्टेंबर १९३२ च्या उपोषणापासूनच गांधीजींच्या डावपेचांना गंभीर आव्हान मिळत गेले. तसेच उजव्या पुढाऱ्यांच्या स्वराज्यपक्ष स्थापण्याच्या दृष्टीने होणाऱ्या हालचालींवर देखील तीव्र टीका होत होती. १९३३-३४ मध्ये राजकारणाबाबत काँ. मध्ये जेवढा तीव्र आणि व्यापक स्वरुपाचा असंतोष होता तेवढा त्यापूर्वी कधीही नव्हता हा असतोष कोणत्या थराला गेला होता याचा अंदाज १९३४ मध्ये ज. नेहरुंनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रावरून येतो. ते लिहितात :-

" राष्ट्रीय चळवळ ऐन शिखरावर असताना शत्रूच्या इशाऱ्यावर हुकूम ज्यांनी झेंडा खाली पाडला होता त्यांच्याच हाती भारतीय स्वातंत्र्याचा झेंडा सोपविण्यात आला. राजकारण गैरसोयीचे झाल्यामुळे ज्यांनी त्यातून अंग काढून घेतल्याचे जगजाहीर केले होते आणि ते सोयीचे होताच जे उडी मारुन पुढे सरसावले त्यांच्याच हाती चळवळीची सूत्रे देण्यात आली

काँ. च्या आणि देशाच्या नावांवर बोलतांना त्यांनी दृष्टीसमोर बाळगलेल्या आदर्शाचे काय झाले ? स्वराज्य पक्षीयांच्या हाती राजकारण येताच

त्यांनी काँ. च्या खऱ्या उद्दिष्टांना बाजूस सारुन व काँ. च्या अनेक हितशत्रूंना पाठीशी घालून प्रत्यक्ष काँ. च्या लढाऊ धोरणाला कडक विरोध केला व राजकारणात सावळा गोंधळ माजविला." (प्र. ३, पृ. ३८१)

१९३४ ची चळवळ मागे घेण्याचा व विधिमंडळात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला. "ही बातमी ऐकून नेहरूंना पाठीत खंजीर खुपसल्यासारखे वाटले ; व गांधीजींशी असलेली निष्ठेची बंधणे जणू तटातट तुटली. बऱ्याच काँ. जनांची ही अशीच प्रतिक्रिया झाली" असे तेंडुलकर म्हणतात.

परंतु काँ. अनुयायांनी विधिमंडळ कार्यक्रमाला विरोध केला नाही. स्वातंत्र्यलढ्याचे एक प्रभावी शस्त्र म्हणून सांसदीय संस्थेचे महत्व पुढाऱ्यांप्रमाणेच त्यांनीही ओळखले. विधिमंडळ बहिष्काराविषयी त्यांना पुढाऱ्यांपेक्षाही कमी आकर्षण होते. पण सांसदीय संस्थांचा उपयोग कशासाठी करायचा हा देखील एक प्रश्नच होता. तो ब्रिटिशांशी पुन्हा बोलणी सुरू करण्याचा मार्ग सुकर होण्यासाठी करायचा की साम्राज्यविरोधी जनतेची चळवळ अधिक मजबूत करण्यासाठी करायचा ? साम्राज्यविरोधी लढ्याचे एकमेव नसले तरी प्रमुख साधन म्हणून तो करायचा की कामगार, शेतकरी व मध्यमवर्गाने साम्राज्यशाही व तिचे हस्तक यांविरूद्ध उभारलेल्या लढाऊ चळवळींपेक्षा या संस्थांचे महत्व कमी मानावयाचे ? हे दोन प्रश्न हजारो काँ. अनुयायांना भेडसावत होते.

काँ. संघटनेचा संदर्भातील या घटनांबरोबरच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक महत्वाच्या घटनांमुळे हजारो क्रांतिकारी तरुणांना कम्युनिस्ट विचारसरणीने आकृष्ट केले. त्या घटना म्हणजे भांडवलशाही व्यवस्थेवर १९२९-३३ मध्ये कोसळलेले—

अभूतपूर्व जागतिक आर्थिक अरिष्ट ; रशियाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेची झालेली यशस्वी सांगता ! जर्मनीत नाझींचा व इतर भांडवलशाही राष्ट्रांत फॉसिस्ट शक्तींचा झालेला उदय ; मिरत कटाच्या खटल्यातील कम्युनिस्टांनी केलेले कम्युनिस्ट तत्वज्ञानाचे जोरदार समर्थन इत्यादी.

ह्यामुळेच देशातील कम्युनिस्ट गटांना हळहळू पण निश्चितपणे मजबूत होण्यास वाव मिळाला व १९३३ अखेरीस भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अखिल भारतीय केन्द्र प्रथमच अस्तित्वात आले. हे केन्द्र स्थापिले गेल्यानंतर काही महिन्यांतच भारत सरकारने कम्युनिस्टपक्ष बेकायदेशीर ठरविला व त्यामुळे कम्युनिस्ट पक्ष वाढण्यात अडथळा निर्माण झाला. परंतु त्यामुळेच गांधीजींच्या तत्वज्ञानाबद्दल भ्रमनिरास झालेले हजारो साम्राज्यविरोधी तरुण जहाल समाजवादी धोरणाकडे वळले. अशा विचारांच्या काँ. कार्यकर्त्यांनी मे. १९३४ मधील पाटणा संमेलनात एकत्र येऊन काँ. सोशालिस्ट पक्ष स्थापण्याचे ठरविले.

कॉं. मध्ये वाढीस लागलेल्या या नव्या समाजवादी प्रवाहाला जवाहरलाल नेहरूंसारखा प्रभावी प्रवक्ता लाभला हे दिसून आल्यमुळे गांधीजींना नवीन कार्यक्रम आखावा लागला. ह्या कार्यक्रमामुळे सुरूवातीला जरी कॉं. मधील बहुतेक सर्व लोकांना धक्का बसला, तरी ज्या कॉं. जनांना कॉं. मधील या नव्या जहाल प्रवाहाशी लढा द्यायचा होता त्यांना हाच कार्यक्रम पुढे उपयुक्त ठरला.

सप्टेंबर १९३४ मध्ये गांधीजी सरदार पटेलांना लिहितात " कॉं. मध्ये समाजवादी गट वाढत आहे. जवाहरलालकडे त्याचे निर्विवाद नेतृत्व आहे. त्यांना काय हवे आहे आणि ते कशाचे प्रतिनिधित्व करतात हे मला चांगले माहीत आहे ..... समाजवादी गट कमी अधिक प्रमाणात त्याचाच दृष्टिकोण बाळगता. पण त्याची पद्धत मात्र जवाहरलालपेक्षा निराळी आहे. त्या गटाचा प्रभाव व त्याचे महत्व नक्की वाढणार आहे ..... त्याच्या अधिकृत पत्रकात प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमाशी माझे मूलभूत मतभेद आहेत. माझ्या विचारांचे नैतिक दडपण मी त्यांच्यावर आणू इच्छित नाही. माझे कॉं. मध्ये राहाणे हे एकप्रकारे तसा दबाव आणणेच होईल." (प्र. ३, पृ. ३८७)

गांधीजींनी कॉंग्रेसमधून निवृत्त होण्याचे ठरविले. ह्या संदर्भात १९३४ मध्ये त्यांनी एक निवेदन काढले. त्यात त्यांनी 'बुद्धिवादी' वर्गाशी असलेले मतभेद नमूद केले. त्यानुसार, बहुसंख्य कॉंग्रेसजनांप्रमाणे अहिंसा हे त्यांच्याकरिता केवळ धोरण नसून ते एक व्रत होते. खादी व चरखा यांवर त्यांची अढळ श्रद्धा होती. सांसदीय पक्षांशीही त्यांचे मतभेद होते. पण समाजवाद्यांप्रमाणेच त्यांच्याही वाढीच्या आड ते येऊ इच्छित नव्हते. त्याचे आयुष्य ज्याकरिता वाहिलेले होते त्या 'सत्याग्रहाच्या प्रयोगा' करिता त्यांना 'संपूर्ण अलिप्तता व कृतिविषयक निरकुशता' हवी होती.

गांधीजींच्या निवृत्तीच्या घोषणेमुळे सहाजिकच कॉंग्रेसमध्ये खडाखडीची चर्चा झाली. मुंबईस ऑक्टोबर अधिवेशनासाठी जमलेल्या प्रतिनिधींच्या मनात गांधीजींच्या निवृत्तीचाच विषय घोळत होता. गांधीजींनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अशा अनेकांनी विनंती केली ; परंतु त्यांनी निश्चय सोडला नाही अधिवेशनात एका ठरावाद्वारे गांधीजींच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास व्यक्त करण्यात आला. ठरावात पुढे म्हणण्यात आले -

" कॉंग्रसचे हे स्पष्ट मत आहे की त्यांनी कॉंग्रेस निवृत्तीबाबत पुन्हा विचार करावा. परंतु याबाबत त्याचे मन वळविण्याचे प्रयत्न फोल ठरल्यामुळे नाखुषीनेच त्यांचा निर्णय मान्य करण्यात येत आहे. गांधीजींनी केलेल्या अद्वितीय देशसेवेबद्दल आम्हा कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. जरूर पडेल तेव्हा कॉंग्रेसला सल्ला देऊन मार्गदर्शन करण्याचे त्यांनी मान्य केल्याबद्दल आम्ही समाधान व्यक्त करीत आहोत. " (प्र. ३ पृ. ३७२)

विधायक कार्यक्रमासाठी सर्व वेळ व शक्ती लावता यावी आणि समाजवादी व सांसदीय गटांना आपल्या नैतिक दबावापासून मुक्त राहून स्वतःची धोरणे कार्यान्वित करता यावीत अशा दुहेरी हेतूने गांधीजी राजकारणातून निवृत्त झाले असे सांगण्यात येते. खादी, ग्रामोद्योग, अस्पृश्यता, स्वच्छता, गोरक्षण, सततिनियमन असेच प्रचलित राजकारणाशी संबंध नसलेले विषय 'हरिजन' मध्ये येत असत. गांधीजींचे देशव्यापी दौरे व त्यांच्या मुलाखती यांतूनही हेच विषय चर्चिले जात.

प्रत्यक्षात मात्र, ते "सल्लामसलती" साठी नेहमी उपलब्ध असल्यामुळे काँ.च्या राजकीय जीवनात त्यांचा प्रभाव होताच. कार्यकारी समितीचे महत्त्वाचे पुढारी सर्व प्रमुख राजकीय प्रश्नांबाबत त्यांचा सल्ला घेण्यास त्यांच्याकडे धाव घेत. त्यांच्या काँ. निवृत्तीचा अर्थ राजकीय कार्यातून निवृत्ती असा कधीच नव्हता. आपल्या निष्ठावंत सहकाऱ्याशी व अनुयायांशी चर्चा करताना त्यांनी हे स्पष्ट केले. उदाहरणार्थ, १९३६ मध्ये गांधी सेवा संघाच्या सभेत ते म्हणाले.

"विधायक कार्यक्रम आणि राजकीय कार्यक्रम हे दोन परस्परविरोधी कार्यक्रम आहेत असा लोकांचा समज दिसतो. त्यामुळेच आपले बरेचसे गैरसमज उद्भवतात. या दोन कार्यक्रमांचे पाईक एकमेकांना तुच्छ लेखतात. पण प्रत्यक्षात हे कार्यक्रम परस्परविरोधी नाहीत." (प्र. ४, पृ. ६६)

विधायक कार्यक्रमातील हरिजनोद्धार, ग्रामोद्योग आणि इतर कार्यक्रम हे स्वतंत्र भारताच्या स्थापनेच्या अहिंसात्मक लढ्याचे अविभाज्य घटक आहेत; यावर गांधीजींनी आपल्या लेखनात व भाषणात भर दिला. त्यामुळे राजकारणापासून त्यांनी अलिप्त राहाण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.


काँ. नेतृत्वाला धोरणाबाबत मार्गदर्शन करून त्याचे धोरण तर गांधीजींनी घडविलेच; शिवाय काँ. सोशालिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांनादेखील सल्ला देऊन त्यांच्यावरही आपला प्रभाव पाडला. आचार्य नरेंद्र देवांना लिहिलेल्या पत्रात तर ते असे म्हणतात की समाजवादी कार्यकर्त्यांनी ज. नेहरूंच्या सल्याने चालावे.

"तुमचा समाजवादी कार्यक्रम हा तुमच्या मसुद्याप्रमाणे शास्त्रोय समाजवादावर अधिष्ठित नसावा; तर भारतीय परिस्थितीला अनुरूप अशा व्यवहार्य समाजवादावर तो अधिष्ठित असावा असे मी सुचवू इच्छितो. तुम्ही नेमलेल्या समितीने तयार केलेला कार्यक्रम हा नुसता मसुदा आहे याचा मला आनंद होतो. तुमचा कार्यक्रम पूर्ण करताना तुम्ही समाजवादी विचारसरणीचे व प्रत्यक्ष परिस्थितीचे ज्ञान असलेल्या व्यक्तींचा सल्ला घ्यावा." (प्र. ३, पृ. ३४४)

जवाहरलाल नेहरूंना नेतृत्व द्या व त्यांचे मार्गदर्शन स्वीकारा हा काँ. सोशालिस्टांना गांधीजींनी दिलेला सल्ला म्हणजे एखादी आकस्मिक घटना नव्हती.

तद्वतच जवाहरलालविषयी त्यांना वाटत असलेल्या आदरभावनेची ती अभिव्यक्ती ही नव्हती. गांधीजींनी अवलंबिलेल्या धोरणाचा तो अविभाज्य भाग होता. लाहोर अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी ज. नेहरूंना पाठिंबा व्यक्त करताना, त्यांची निवड हा तरूणांनी स्वतःच्या कार्याचा गौरव समजावा असे गांधीजी म्हणाले होते हे लक्षांत घेणे उपयुक्त ठरेल. तरूणांचीं तुलना त्यांनी वाफेशी केली- " वाफ कोंडली गेली तरच प्रचंड शक्ती बनते आणि प्रचंड गती निर्माण करते, " त्याचप्रमाणे ह्या देशाच्या तरूणांनी आपली अविरत शक्ती रवेच्छेने बंदिस्त करावी तीवर ताबा मिळवावा आणि क्रमशः गरजेप्रमाणेच तिचा उपयोग करावा; " दुसऱ्या शब्दात, देशातील तरूणांच्या देशभक्तीच्या व स्वार्थत्यागाच्या वृत्तीला ' योग्य वळण ' लावण्याचे साधन या दृष्टीने गांधीजी जवाहरलालकडे पहात होते. १९३२ साली हे धोरण एकदा यशस्वी झाले होते ; व म्हणून ते आताही यशस्वी होईल असे गांधीजींना वाटले.

एकीकडे काँग्रेसमधील उजव्यांची शक्ती वाढवायची; दुसरीकडे जवाहरलाल नेहरूंना नेतृत्व करू द्यायचे ; आणि स्वतः मात्र पडद्याआड राहून उजव्या व डाव्यांच्या धोरणावर प्रभाव पाडायचा असे गांधीजींचे धोरण होते. त्याच्या राजकारणसन्यासाचा थोडक्यात अर्थ हाच होता.


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. 23200
ग्रंथ शाखा

८ संयुक्त मोर्चा

राजकारणातून निवृत्त होण्याचे गांधीजींचे हे धोरण काँ. मधील उजव्या गटांच्या पुढाऱ्यांच्या अपेक्षांना धरूनच होते. लोकांवर जबरदस्तीने लादण्यात येणाऱ्या नवीन घटनेच्या मुद्यावर सरकारने दिलेल्या आव्हानाला सामना देत असता पक्षसंघटनेच्या अंतर्गत धोरणात दुफळी माजू देणे. काँ. पुढाऱ्यांना यावेळी तरी इष्ट वाटत नव्हते. ब्रिटिशांसारख्या राष्ट्रीय शत्रूशी संघटित सामना देण्याकरिता उजव्या व डाव्या गटातील मतभेद ; गांधीवाद, समाजवाद आणि मांडवलशाही विधीमंडळप्रवृत्ती (Parliamentarianism) याच्यांतील मतभेद; सामाजिक व धार्मिक प्रश्नांवरील मतभेत इ. अनेक अंतस्थ मतभेद कसेही करून मिटविणे हे काँ.सला आवश्यक वाटत होते. समाजवादी व इतर डाव्या गटांना स्थान तर द्यावयाचे ; पण विधीमंडळवादी व इतर उजवे गट यांचे वर्चस्व ही अबाधित राखावयाचे हे दुहेरी धोरण काँ. पुढाऱ्यांना सर्वात महत्त्वाचे वाटत होते

काँ. मधील समाजवादी व इतर गटांचा आपल्यात केवळ सामील करून घेण्यापुरताच हा प्रश्न मर्यादीत नव्हता. त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाची बाब म्हणजे डाव्या गटांना असे स्थान द्यावयाचे की बहुसंख्य कामगार व. इतर समाजवादी जहाल गट यांमध्ये, काँ. जहाल साम्राज्य विरोधी भूमिका प्रामाणिकपणे घेत आहे. असा विश्वास निर्माण व्हावा. डाव्या गटाच्या पुढाऱ्याला संघटनेच्या अध्यक्षपदी ठेवण्याचे जे तंत्र १९२९ मध्ये यशस्वी ठरले होते त्याच तंत्रानुसार १९३६ साली पं. नेहरूंना काँ. अध्यक्ष करण्यात आले ; एवढेच नव्हे तर १९३७ मध्ये त्यांची मुदत संपली असूनही पुन्हा त्यांनाच अध्यक्ष करण्यात आले. जणू या लागोपांठच्या दोन वर्षांनी भागले नाही ; म्हणून १९३८ मध्ये डाव्या गटाचे दुसरे पुढारी सुभाषचन्द्र बोस यांना अध्यक्षपद देण्यात आले. डाव्यांच्या नेतृत्त्वाखाली असलेल्या या संपूर्ण कालावधीत का. कार्यकारी समितीने का. समाजवादी व इतर डावे यांचाही समितीत समावेश करून घेतला.

१९३८ मध्ये का. अध्यक्षपदासाठी सरदार पटेलांचे नाव सुचविले गेले असताना त्यांनी पं. नेहरूंकरिता स्वतःची उमेदवारी मागे घेतली. का. डाव्या बाजूकडे झुकत आहे ह्या घटनेकडे उजवे पुढारी कोणत्या दृष्टीने पाहात होते हे सरदार पटेलांनी त्यावेळी काढलेल्या पुढील उद्‌गारांवरून लक्षात येते– "पं. नेहरूंच्या सर्व धोरणांना माझा पाठिंबा आहे म्हणून मी माझे नाव मागे घेतो असे नव्हे; तर एक म्हणजे अध्यक्षांना संपूर्ण हुकुमशाही अधिकार नसतात ; व दुसरे म्हणजे काँग्रेसशी प्रामाणिक राहून देशातील प्रचलित मनोवृत्तींचे प्रतिनिधित्व करण्याची योग्यता त्यांच्याखेरीज अन्य कोणातही नाही. म्हणून पं. नेहरूंनाच सर्व प्रतिनिधींनी निवडून द्यावे असा माझा त्यांना आग्रह आहे. . . ."

— आणि खरोखरच या धोरणाचा काँग्रेसला बहुमोल असा फायदा झाला. १९३६ ते १९३८ मधील नेहरूंची अध्यक्षीय कारकीर्द, समाजवाद्यांच्या मार्गदर्शनाखाली पं. नेहरूंनी तयार केलेला निवडणूक जाहीरनामा व शेतकीविषयक कार्यक्रम तसेच या दोहोंना लोकप्रियता मिळवून देण्याकरिता प. नेहरूंनी काढलेला झंझावाती दौरा व त्याचवरोवर डाव्या मनोवृत्तीच्या तरूणांनी केलेला स्वार्थत्याग या सर्व १९३७ मध्ये काँग्रेसला कोटचवधी लोकांचा पाठिंबा मिळवून देण्याकरिता व प्रतिगाम्यांविरुद्ध प्रचार करण्याकरिता उपयुक्त ठरल्या. —

— १९३७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जातीय व प्रतिगामी शक्तींचा जो धुव्वा उडाला व काँ. ला ११ पैकी ७ प्रांतात जे बहुमत मिळाले ते काँ. च्या डाव्या गटांच्या चळवळीमुळेच होय.

यामुळेच निवडकीनंतरच्या काळात ब्रिटिश सरकार व. काँ. पुढाऱ्यांत तीव्र मतभेत निर्माण झाले. ज्या नवीन घटनेनुसार निवडणूका होऊन कायदेमंडळे अस्तित्वात आली, त्याच घटनेनुसार प्रांतिक गव्हर्नरांना असे काही जादा अधिकार मिळाले की ज्यांचा वापर केल्यास नवीन कायदेमंडळे व मंत्रीमंडळ यांची निव्वळ थट्टाच झाली असती या जादा अधिकारांचा वापर गव्हर्नर करणार नसतील तरच ज्या कायदेमंडळात काँग्रेसला बहुमत आहे तेथील मंत्रीपदे स्वीकारण्यात येतील अशी अट ब्रिटिशांना घालण्यात आली. हे आश्वासन देण्यास ब्रिटीश सरकार तयार नव्हते. त्यामुळे नेमकी ज्यावेळी घटनेच्या अंमलबजावणीला सुरूवात व्हावी, त्याच वेळी संपूर्ण घटना मोडकळीस येण्याची परिस्थिती निर्माण झाली.

काँ. ची ही मागणी मान्य न केल्यास काँ. च्या भक्कम एकजुटीपुढे आपल्याला माघार घ्यावी लागेल हे ब्रिटिश सरकारच्या लक्षात आले. ब्रिटिश सरकारतर्फे भारतमंत्री लॉर्ड झेटलँड व काँग्रेसतर्फे गांधी हे ह्या प्रश्नावर जाहीरपणे आपआपले विचार व्यक्त करीत होते. (यावरुन गांधीजींची राजकारणनिवृत्ती कशा स्वरूपाची होती हे स्पष्ट होते.) काँग्रेसने व ब्रिटिश सरकारने घेतलेल्या भूमिका जहाल काँ. पुढाऱ्यांना आवडल्या नाहीत ; तरीही या संवादामुळे मंत्रीमंडळात सहभागी होण्याचा निर्णय काँ. ला घेता आला.

या निर्णयामुळे गांधीजींच्या कार्यपद्धतीत बदल झाला पूर्वीच्या विधायक कार्यक्रमाला चिकटून राहण्याचे धोरण त्यांनी सोडून दिले. १७ जुलै १९३७ ला ते ' हरिजन ' मध्ये लिहितात :—

" ज्या अर्थी काँ. कार्यकारी समिती व इतर काँ. जन यांवर अधिकार ग्रहणाच्या प्रश्नावर माझ्या विचारांचा परिणाम झाला आहे त्याअर्थी मला माझे विचार जनतेसमोर स्पष्ट करणे आवश्यक आहे. ' हरिजन ' पत्रात मी स्वत:वर जी बंधने घालून घेतली होती ती पाळण्याची इत:पर मला आवश्यकता नाही. कारण उघड आहे. १९३५ चा ' गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट ' हा स्वातंत्र्य मिळ-

विण्याच्या दृष्टीने असमाधानकारक वाटत आहे. म्हणूनच कितीही मर्यादित वा नगण्य प्रमाणावर का होईना ; परंतु तरवारीच्या बळावर अधिष्ठीत सत्तेच्या जागी बहुमताधिष्ठित सत्ता आणता येत असेल तर तसा प्रयोग करुन पाहाणे मला इष्ट वाटते. तीन कोटी मतदाराना मिळालेल्या या व्यापक अधिकारांचा अर्थ हाच होय. हा जबरदस्तीने लादला गेलेला कायदा आपल्याला कालांतराने आवडू लागेल ; अर्थात् आप शोषण हेच अंती आपल्याला वरदानासारखे वाटू लागेल असे राज्यकर्त्यांना अ त आहे. तीन कोटा मतदाराच्या प्रतिनिधीत पुरेसा आत्मविश्वास असेल व ७ ारांचा योग्य वापर करण्यास पुरेशी बुद्धीमता असेल तर मंत्रीमंडळे स्वीकारू खील कायदा बनविणारांचा गृहित उद्देश निष्फळ करता येईल. सनदशीर माग ह्या कायद्याचा अशा तऱ्हेने वापर करता येईल जे त्यांच्या अपेक्षांना सर्वस्वी विप ठरेल. "

गांधीजीच्या नेतृत्वाचे हे च रूप होते. कॉं. बाहेर राहून देखील कॉं. च्या निरनिराळ्या मंत्रीमंडळांन दर्शन करण्याचे प्रभावी कार्य त्यांनी केले. दर आठवड्याच्या ' हरिजन ' मध्ये, यांनी कसे वागावे व निरनिराळ्या परिस्थितीत काय करावे याबद्दल ते मार्गद करीत असत. दारूबंदी, शिक्षण, कर आकारणी आदि विषयावर देखील त्यांने धोरण आखून दिली. कॉं. मंत्रीमंडळ व गव्हर्नर किंवा व्हॉईसरॉय यांच्यातील मतभेदांच्या प्रसंगी गांधीजींचा मध्यस्थी यशस्वी ठरली. उदा. बिहार व उत्तर प्रदेश मधील राजबंद्यांच्या मुक्ततेच्या प्रश्नावर उद्भवलेला संघर्ष, ओरिसात मंत्र्यांच्या हाताखाली एका सनदी नोकराला गव्हर्नर नियुक्त केल्यामुळे उद्भवलेला संघर्ष !

कॉं. मधील डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही गटांच्या एकजुटीच्या नेतेपदी डावा गट असल्यामुळे साहजिकच पुरोगामी गटांची शक्ती फार मोठ्या प्रमाणात वाढली. समाजवाद, लढाऊ साम्राज्यशाहीविरोध, जमिनदार—भांडवलशाही याविरुद्धचा लढा व जागतीक पातळीवरील साम्राज्यशाहीविरोधी, फॅसिस्टविरोधी व शांततावादी शक्तींचे ऐक्य या कल्पनांनी पूर्वी कधीही नसेल एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनतेच्या मनाची पकड घेतली याचवेळी कामगार, शेतकरी, विद्यार्थी देशातील तरुण व इतर वर्ग यांच्या संघटना तसेच कॉं. सोशालिस्ट, कम्युनिस्ट इत्यादी शास्त्रीय समाजवादाची भाषा बोलणारे वर्ग हे फार झपाट्याने वाढू लागले. हिंदी संस्थानांमधील लक्षावधी लोक आपल्या न्याय्य हक्कांबद्दल प्रथमच जागृत झाले व लोकशाही राज्यघटनेची भाषा बोलू लागले.

अर्थात या सर्व घडामोडी म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक घटनांचा परिपाक होत. या घटना म्हणजे सोविएट रशियाची वाढती ताकद, फॅसिस्ट विरोधी शक्तींचा युरोपातील विजय, स्पॅनिश स्वातंत्र्यवाद्यांनी फॅसिस्टांगी दिलेला यशस्वी लढा, चीन व अॅबीसीनियातील लढे इत्यादी. कॉं. पुढाऱ्यांतील या नव्या जाणिवेचा परिणाम जहाल साम्राज्यशाहीविरोधी व समाजवादी शक्तींची भक्कम उभारणी होण्याकडे झाला.

९ अधिकारग्रहण आणि नंतर

साम्राज्यशाहीविरुद्ध एकजुटीने लढा देत असताना डाव्या शक्तींची झालेली वाढ सुरवातीला काँग्रेसमधील उजव्या पुढाऱ्यांना विशेष महत्त्वाची वाटली नाही. ही सुरुवातीची अवस्था म्हणजे ब्रिटिशांनी दिलेल्या आव्हानाला तोंड देण्याची व निवडणूकीत प्रचंड विजय मिळविण्याची तयारी होती. ब्रिटिशांविरुद्ध मिळविलेल्या प्रचंड विजयानंतर मात्र ही डाव्या शक्तींची वाढ त्यांना अडचणीची वाटू लागली. काँग्रेसने अधिकारग्रहण केल्यानंतरच्या अवस्थेबाबत श्री. तेंडुलकर म्हणतात–

"यापुढे नवे प्रश्न निर्माण झाले आणि आतापर्यंत केवळ तात्त्विक स्वरूपात असलेल्या मतभेदांनी नवीनच रूप धारण केले. अधिकारग्रहणाच्या विरोधकांचीही आता काँ पुढाऱ्यांसमोर अडथळे निर्माण करण्याची इच्छा नव्हती, मग समर्थकांची गोष्ट दूरच. परतु शेतकऱ्यांची निदर्शने व संप इत्यादि साधनांनी काँ. पुढाऱ्यांवर दडपण आणण्याचे प्रयत्न मात्र सतत चालू होते; आणि यामुळे ते अत्यंत त्रस्त झाले. बिहारमधील किसान चळवळींचा काँ. संघटनेशी खटका उडाला. काँ. पुढाऱ्यांनी भरमसाट आशाआकांक्षा निर्माण केल्या होत्या. त्यांची पूर्तता न झाल्यामुळे इतरत्रही असंतोषाचे वातावरण निर्माण झाले." (प्र.४, पृ. २४८)

म्हणून गांधीजींच्या मार्गदर्शनाने चालत असलेल्या उजव्या पुढाऱ्यांना यापुढे दुहेरी लढा देण्याची तयारी करावी लागली. एकीकडे संघात्मक घटना भारताच्या गळी उतरवू पाहाणाऱ्या ब्रिटिशांशी गाठ होती; तर दुसरीकडे निवडणुकीतील निकालाच्या जोरावर जहाल साम्राज्यशाहीविरोधकांची फळी मजबूत करू पाहाणाऱ्या डाव्या पुढाऱ्यांशी टक्कर होती. डाव्या उजव्यांची संयुक्त फळी साम्राज्यशाहीविरोधी लढ्यासाठी उभारण्याचा आता प्रश्नच उरला नव्हता. पण ब्रिटिशांविरूद्ध आणि डाव्याविरूद्ध उजव्या गटाची मजबूती घडविणे हेच महत्त्वाचे झाले होते. या नव्या परिस्थितीला तोंड देण्याकरिता काँ. पुढारी व गांधीजी यांनी एक नवीन धोरण स्वीकारले. त्याचा आशय असा–

१) कामगार व शेतकरी यांच्यावर एकीकडून पोलिसांची दडपशाही व दुसरीकडून वैचारिक स्वरूपाचा जोरदार हल्ला सुरू करण्यात आला. शेतकरी कामगारांची धरपकड, त्यांच्यावर लाठीहल्ले, खटले एवढेच नव्हे, तर गोळीबारसुद्धा होऊ लागला. ब्रिटिश सत्ताधारी ज्या पीनल कोड व इं. क्रि. प्रो. कोड यांसारख्या कुप्रसिद्ध कायद्यांचे हत्यार काँग्रेसविरुद्ध वापरीत तेच हत्यार जनतेच्या व्यापक लढाऊ आंदोलनाविरुद्ध आता काँ. वापरू लागली. इतकेच नव्हे तर गांधींनी

या सर्व कृत्यांवर 'न्याय्य' म्हणून शिक्कामोर्तब केले आणि मंत्रीमंडळाला पुढील सबबींवर उचलून धरले—

" नागरी स्वातंत्र्य म्हणजे गुन्हेगारी स्वातंत्र्य नव्हे. आज सात प्रांतात काँ. राज्य करीत आहे, म्हणून काही लोकांना असे वाटते की स्वातंत्र्य म्हणजे ज्याला जसे वाटेल तसे त्याने बोलावे व करावे. परंतु काँ सरकार असल्या सवलतींचा दुरुपयोग कधीही चालू देणार नाही . . . . " (प्र. ४. पृ. २४८–४९)

२) मिळालेल्या अधिकारांचा उपयोग काँग्रेसने आतापर्यंतचे मुख्य प्रश्न सोडविण्याकडे केला आणि देशासमोर असलेल्या समस्या सोडविण्यास काँ. मंत्रीमंडळे ही ब्रिटिशांइतकीच समर्थ आहेत असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. देशाच्या आर्थिक विकासाची योजना अंमलात आणण्यासाठी अधिकारग्रहणानंतर लगेच या सात प्रांतांतील उद्योगमंत्र्यांचे अधिवेशन बोलविण्यात आले ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. या अधिवेशनात जवाहरलाल यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय नियोजन मंडळ' स्थापण्यात येऊन श्री. के. टी. शाह यांना त्याचे चिटणीस नेमण्यात आले. भविष्यातल्या स्वतंत्र भारताचे चित्र तयार करण्याकरिता काँग्रेसने केलेला हा पहिला उल्लेखनीय प्रयत्न होय. सर विश्वेश्वरय्या यांच्या 'भारताचे नियोजन' या पुस्तकात भारताच्या भावी प्रगतीचे जे भव्य चित्र उभे केले गेले होते, ते प्रत्यक्षात उतरविण्याकरिता काँग्रेसने केलेला हा पहिला उल्लेखनीय प्रयत्न होय.

साम्राज्यवादी शिक्षतपद्धतीऐवजी काँग्रेसला अभिप्रेत असलेल्या शिक्षणपद्धतीची रुपरेषा तयार करण्याकरिता शिक्षणतज्ञांची सभा बोलविण्यात आली. (बुनियादी पद्धतीची ही सुरूवात होती.) काँग्रेस ही 'बेजबाबदार चळवळचांची' संघटना नसून निश्चित 'विधायक कार्यक्रम' असलेली व राज्यव्यवस्थेचा अनुभव असलेली एक जबाबदार संघटना आहे हे सिद्ध करण्यास, सत्ताग्रहण केलेल्या प्रांतात 'कायदा व सुव्यवस्था' राखणारी शासनव्यवस्था व देशासमोरील महत्वाच्या प्रश्नांवर आखलेली 'विधायक उपाययोजना' हे दोन प्रयत्न पुरेसे होते.

३) हिंदी संस्थानांमधील जनतेच्या लोकशाही स्वरूपाच्या सुधारणांसाठी होणाऱ्या चळवळींना नवीन दृष्टी देण्यात आली. असहकाराच्या चळवळीपासूनच संस्थानांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे धोरण काँ. ने अवलंबिले होते. राष्ट्रीय लढा हा परकीय जुलमाविरुद्ध असून संस्थानिक व प्रजाजन यांचे परस्पर संबंध हे अंतर्गत स्वरूपाचे आहेत असे समजले जात असे व या दृष्टीने त्यांचे धोरण योग्यच असल्यामुळे १९२८ साली नेहरू रिपोर्ट तयार होत असताना हिंदी संस्थानांचा प्रश्न सर्वपक्षीय समितीपुढे येऊ देण्याचे कटाक्षाने टाळण्तात आले होते.

परंतु संस्थानिकांचा उपयोग काँ. व तिच्या मागण्या यांना विरोध करण्यासाठीच ब्रिटिशांनी केला हे गोलमेज परिषदेमध्ये सिद्ध झाले. १९३५ चा कायदा अंमलात आणला गेल्यानंतर ही गोष्ट अधिक स्पष्ट झाली. घटनेतील संघविषयक प्रश्नावर भारतातील राजकीय पक्षांशी ब्रिटिशांनी जो सौदा आरंभिला होता त्यात हिंदी संस्थानिकांना फार महत्त्वाचे स्थान होते.

अशा राष्ट्रविरोधी कारवायांसाठी हिंदी संस्थानिकांचा उपयोग ब्रिटिशांनी करून घेतल्यामुळे काँ. पुढाऱ्यांना त्यांच्याबद्दल व त्यांच्या जुलुमी राज्यव्यवस्थेबद्दल नवीन धोरण स्वीकारावे लागले. याशिवाय, संपूर्ण देशात जहाल वृत्तीचे वारे वाहू लागल्यामुळे जी एक नवीन जागृती निर्माण झाली होती तिचा परिणाम संस्थानांतील प्रजेवरसुद्धा झालाच होता. काँ. पुढाऱ्याना आवडो न आवडो; संस्थानी प्रजादेखील 'जबाबदार शासन' या घोषणेखाली स्वतःच्या लोकशाही हक्कांसाठी दिवसेंदिवस अधिकाधिक झगडू लागली.

या परिस्थितीत, १९३८ फेब्रुवारीच्या हरिपुरा अधिवेशनात संस्थानिकांबाबत एक नवीन धोरण स्वीकारण्यात आले. त्याअन्वये काँ. सने संस्थानांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे आपले जुने धोरण सोडून संस्थानी प्रजेला स्वतःची संघटना तयार करण्यास व त्याद्वारे जबाबदारीच्या स्वराज्यासाठी लढा देण्यास उद्युक्त केले मात्र, संस्थानांच्या बाबतीत स्वतःची तटस्थ भूमिका काँ. ने कायमच ठेवली. गांधी मात्र एकामागून एक अशा सर्व संस्थानांमधील राजकीय संघटनांना स्वतः मार्गदर्शन करू लागले. सेठ जमनालाल बजाज व डॉ. पट्टाभि सीतारामय्या यासारखे महत्त्वाचे पुढारी तर या लढ्यांमध्ये सक्रिय भाग घेऊ लागले. राजकोटमधील लढा तर खुद्द महात्मा गांधींनीच सुरू केला. या संदर्भात ते म्हणतात– "जोवर संस्थानी प्रजा स्वतःच्या हक्कांबाबत जागृत झाली नव्हती तोवर संस्थानांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे काँ.सचे धोरण म्हणजे राजकारणातील मुत्सद्देगिरीचा एक उत्कृष्ट नमुनाच होय. परंतु संस्थानी प्रजेत एकदा जागृती आल्यानंतर व स्वतःच्या हक्कांसाठी तिने अखंड लढा चालू केल्यानंतरही तेच धोरण चालू ठेवणे हा काँ.चा भित्रेपणा ठरला असता." (प्र. ५, पृ. ३०)

परंतु, जनता एकदा कृतिशील लढ्यात उतरली की घालून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करण्याची एक 'विशिष्ट' प्रवृत्ती तिच्यात डोकावते, असा अनुभव त्यांनी चालविलेल्या इतर लढ्याप्रमाणेच त्यांना येथेही आला. १९३० च्या उत्तरार्धातील संस्थानांमधील लढ्याचे स्वरूप कमीअधिक प्रमाणावर ब्रिटिश हिंदुस्थानातील असहकाराच्या चळवळीप्रमाणेच होते. पण अनेक संस्थानांमधील जुलुमी राजवटीविरुद्ध संतप्त जनतेकडून घडलेल्या बऱ्याच हिंसक घटनांना मात्र

म. गांधींची मान्यता नव्हती. त्रावणकोर, राजकोट व ओरिसातील संस्थानाच्या लढचात आपली सत्याग्रहाची तत्त्वे काटेकोरपणे पाळली गेली नाहीत हे गांधीजींच्या लक्षात आले होतें; आणि यातूनच संस्थानांबाबतचे त्यांचे 'नवे' तंत्र अमलात आले.

या नवीन तंत्राद्वारे गांधीजींना हिंदी संस्थानिकांना हे दाखवायचे होते की संस्थानी प्रजेचा पाठिंबा काँ. ला असला तरी या चळवळीने भयानक रूप धारण करू नये अशी काँ. ची इच्छा होती. ही चळवळ नियंत्रित राहावी व खुद्द संस्थानिकांना देखील ती निर्धोक वाटावी म्हणून ब्रिटनच्या बाजूने जाण्याऐवजी ब्रिटनच्या विरोधात जाऊन संस्थानिकांनी काँ. मध्ये यावे यासाठी जणू हे संस्थानिकांना आवाहनच होते.

४) एकीकडे मंत्रीमंडळे बनविल्यामुळे काँ.ला जे मानाचे स्थान मिळाले होते ते मजबूत करण्यासाठी डाव्या शक्तींना काबूत ठेवणे व दुसरीकडे संस्थानी मुलुखात झालेल्या जागृतीचा उपयोग संस्थानिकाशी समझोता घडवून आणण्यासाठी करणे– या दोन गोष्टी करीत असतांनाच काँ. पुढारी संघविषयक घटनेविरुद्ध लढा देण्यावर अपले सर्व लक्ष केंद्रित करू लागले. भारताची भावी घटना तयार करण्यासाठी लोकशाही पद्धतीने निवडणुकाद्वारे घटना समिती बनविण्यात यावी अशी मागणी काँ.ने केली. घटनेच्या या भावी प्रश्नाबाबत, विशेषत: तिच्या संघात्मक स्वरूपावरच काँ. व ब्रिटिश यांच्यातले मतभेद तीव्रतम होते.

याच प्रश्नावर काँ. मधील डाव्या व उजव्यामधील अंतर वाढू लागले हे लक्षात घेण्यासारखे आहे. घटनेतील संघात्मक भागाला विरोध करून घटना-समितीची मागणी करीत असतानाच ब्रिटिश सरकारशी वाटाघाटी करण्याची म. गांधींची तयारी होती. न्यूयॉर्क टाइम्सचे वार्ताहर श्री. स्टील यांना दिलेल्या मुलाखतीत गांधीजींची मजल कोठपर्यंत गेली ते पहा—

"वसाहतीचे स्वराज्य– याची व्याख्या भारताला अनुकूल अशी केली आणि भारताचा इंग्लंडशी सन्माननीय सलोखा झाला तर शब्द कोणते वापरावे याबद्दल मला भांडावयाचे नाही. या सन्माननीय तडजोडीची परिभाषा करताना ब्रिटिश मुत्सद्यांना, इतर कोणत्याही शब्दांऐवजी 'वसाहतीचे स्वराज्य' हा शब्दप्रयोग अधिक सोयीचा वाटत असेल तर माझा त्याला विरोध नाही."

मि. स्टील– "पण काँ. मध्ये सुभाषचन्द्र बोस व त्यांचा गट यांसारखे ब्रिटिश साम्राज्याबाहेर संपूर्ण स्वराज्याची मागणी करणारे लोक आहेत, त्याचे काय ?

म. गांधी– "हा फक्त शब्दभेद आहे. आमची भाषा कदाचित वेगळी असेल; पण सुभाषबाबूत आणि माझ्यात या मुद्यावर काही मतभेद आहेत हे मानावयास मी तयार नाही."

प्रत्यक्षात मात्र हा फरक केवळ शब्दांपुरताच राहिला नाही. काँ.ला भेडसावणाऱ्या राजकीय संघटनात्मक प्रश्नांकडे पाहाण्याच्या मूलभूत दृष्टिकोणाबद्दलच हा मतभेद होता. १९३४ पासूनच हे मतभेद निःसंशयपणे काँ.मध्ये होते; व त्यामुळेच काँ.चे डाव्या व उजव्या गटांत विभाजन झाले होते. तरीही १९३५ च्या घटनेप्रमाणे लढविण्यात येणाऱ्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी काँ. मध्ये एकजुट ठेवणे आवश्यक झाल्यामुळे या मतभेदांकडे दुर्लक्ष करण्यात आले. याच कारणामुळे लागोपाठ तीन वर्षे डाव्या गटाचे पुढारी हेच काँ. अध्यक्ष राहावेत अशी आवश्यकता उजव्या गटांना वाटली. काँ. मंत्रीमंडळे बनल्यानंतर आणि प्रांतीय मंत्रीमंडळे व काँ. अनुयायी यांच्यात अनेक खटके उडाल्यानंतर मात्र डाव्या गटांना दिलेल्या सवलती संपुष्टात आणून लढ्याचे नवे पर्व सुरु करणे उजव्या पुढाऱ्यांच्या दृष्टीने आवश्यक ठरू लागले. यामुळेच 'त्रिपुरा' काँ. अधिवेशनाच्या वेळी बोस व पट्टाभि यांच्यात लढत झाली. ही लढत वैयक्तिक स्वरूपाची नव्हती हे लढ्याने घेतलेल्या वळणावरून स्पष्ट होते.

सुभाष बोस यांनी अध्यक्षपदासाठी दुसऱ्यांदा लढत देण्याचे ठरविताच सरदार पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, ज. बजाज, दौलतराम, शंकरराव देव, भुलाभाई देसाई व श्री. कृपलानी यांनी एक पत्रक काढून त्याद्वारे सुभाषबाबूंनी फेरविचार करावा व डॉ. पट्टाभींना एकमताने अध्यक्षपदासाठी उभे राहू द्यावे असे आवाहन केले. पण सुभाष बोसांनी उत्तर दिले. :—

"अध्यक्षपदासाठी उजव्या गटाचा उमेदवार निवडून देण्याच्या धोरणात निस्संशयपणे काही विशिष्ट हेतू आहे. येत्या वर्षात स्वराज्याच्या संघीय स्वरूपाबद्दल उजवा गट व ब्रिटिश सरकार यांच्यात तडजोड होण्यांची शक्यता आहे अशी सार्वत्रिक समजूत झालेली आहे. परिणामतः सलोख्याच्या मार्गात काटचाप्रमाणे सलणारा व अडथळे निर्माण करणारा डाव्या गटाचा अध्यक्ष उजव्या गटाला नको आहे. वस्तुतः याच परिस्थितीत संघीय स्वराज्याला मूलतःच विरोध करणारा अध्यक्ष निवडून देणे हे अत्यंत आवश्यक आहे."

२५ जानेवारीला सरदार पटेलांनी एका निवेदनात डॉ. पट्टाभींच्या उमेदवारीबद्दल खुलासा केला —

"अनौपचारिकपणे घेतलेल्या बैठकीत डॉ. पट्टाभींच्या उमेदवारीचा निर्णय घेण्यात आला असता मौ. आझाद, ज. नेहरु, डॉ. राजेन्द्रप्रसाद, भु. देसाई आ. कृपलानी, म. गांधी व मी स्वतः हजर होतो."

पाठोपाठ दि. २७ जानेवारीला पं. नेहरुंनी एक निवेदन सादर केले. वरील बैठकींला आपण हजर असल्याबद्दल पटेलांनी केलेल्या निवेदनाचा त्यांनी यात इन्कार केला नाही. परंतु डॉ. पट्टाभि किंवा सुभाष बोस यांपैकी कोणाला पाठि-

वाही दर्शविला नाही. अध्यक्षीय निवडणुकीच्या चर्चेला अशी दुर्दैवी कलाटनी मिळावी याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. या निवडणुकीत स्वराज्याच्या संघीय स्वरुपाबद्दल संघर्ष उद्‌भवण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही ; कारण काँ. ने संघीय स्वराज्याचा निश्चितपणे निषेध करून त्याला स्पष्ट नकार दिला आहे असेही त्यांनी या निवेदनात निःसंदिग्धपणे सांगितले. एकूण, उजव्या गटाला प्रत्यक्ष किंवा संपूर्ण पाठिंबा दिला नसला तरी अप्रत्यक्षपणे सुभाष बोस यांच्या धोरणाला त्यांनी विरोधच दर्शविला.

अत्यंत चुरशीने लढविल्या गेलेल्या ह्या निवडणुकीची परिणती उजव्या गटाच्या पराभवातच झाली. सुभाष बोसांना १५८० व डॉ. पट्टाभि यांना १३७५ मते मिळाली. हा निकाल जाहीर करताना म. गांधी म्हणाले—

"श्री सुभाष बोस यांनी डॉ. पट्टाभींविरुद्ध निश्चितच विजय मिळविला आहे. सुभाष बोस यांच्या विरोधात मी प्रथमपासूनच होतो हे कबूल केलेच पाहिजे. त्याच्या कारणमीमांसेत शिरण्याची काही आवश्यकता नाही. त्यांच्या जाहीरनाम्यातील निवेदनाशी मी सहमत नाही. आपल्या सहकाऱ्यांबद्दल त्यांनी केलेले वक्तव्य अनुदार व अनुचित आहे असे मला वाटते. तरी त्यांच्या विजयाबद्दल मला आनंदच होत आहे. मौ. आझाद यांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर डॉ. पट्टाभींनी आपली उमेदवारी मागे घेऊ नये याकरिता मीच त्यांचे मन वळविले असल्यामुळे हा पराभव त्यांच्यापेक्षाही माझाच आहे."

उजवे पुढारी मात्र या पराभवाकडे दुर्लक्ष करण्यास तयार नव्हते. परंतु म. गांधींनी हा स्वतःचा पराभव असल्याचे जाहीर करताच काँ. प्रतिनिधींनी याचा उपयोग जनजागृतीसाठी करून घेऊन अधिवेशनाने दिलेला निर्णय बदलवून घेण्याचा प्रयत्न केला. काँ. कार्यकारिणीच्या पुढील १२ सभासदांनी आपल्या सभासदत्वाचे राजीनामे दिले — स. पटेल, मौ. आझाद, राजेन्द्रप्रसाद, श्रीमती नायडू, भु. देसाई, पट्टाभि, शं. देव, श्री. मैहताब, कृपलानी, दौलतराम, ज. बजाज आणि खान अब्दुल गफारखान.

गांधीजींनी ज्याचा मसुदा तयार केला असे समजले जाते, त्या पत्रकात वरील सभासदांनी म्हटले आहे —

"काँ. मधील अत्यंत विरोधी असलेल्या गटांत 'समझौता' घडवून आणण्यासाठी देशाने निश्चित असे धोरण स्वीकारण्याची वेळ आता आली आहे असे आम्हास वाटते. त्यामुळे बहुमताची द्योतक असणारी एकसंघ विचारांची कार्यकारिणी तुम्ही तयार करावी हेच योग्य ठरेल."

या जोडपत्रकावर पंडित नेहरुंची स्वाक्षरी नसली तरी त्यांनीही स्वतःच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. एका स्वतंत्र पत्रकात ते म्हणतात :

" समझौता घडवून आणण्यासाठी मी प्रयत्नांची शिकस्त केली आहे. " घटनेच्या संघीय स्वरुपाबद्दल उजव्या पुढाऱ्यांनी ब्रिटिशांशी केलेल्या सलोख्या-विषयी सुभाषबाबूंनी निवडणुकपूर्व कालात जे आरोप केले होते ते त्यांनी मागे घ्यावेत म्हणून ही नेहरुंनी सुभाषबाबूंवर दडपण आणले होते.

काँ. ला आतापर्यंत कधीही तोंड द्यावे लागले नसेल अशा गंभीर स्वरुपाच्या अंतस्थ कलहाला जवाहरलाल नेहरुंसह १३ कार्यकारिणीसदस्यांनी दिलेल्या राजी-नाम्यामुळे सुरूवात झाली होती. पण अखेरीस उजव्या पुढाऱ्यांच्या विजयानेच हा पेचप्रसंग सोडविला गेला.

त्रिपुरा अधिवेशनाचा उजव्या पुढाऱ्यांना गंभीर धक्का बसला. श्री. बोस यांनी गांधीजींच्या इच्छेनुसार नवीन कार्यकारिणीची नेमणूक करावी असा उजव्या पुढाऱ्यांनी ठराव मांडला.

परंतु श्री. बोस म. गांधींचा सल्ला घेण्यास गेले असता त्यांना काय सांगीतले गेले.

" तुमची मते माहीत असून आणि मूलभूत तत्वाबद्दल बहुतांश सभासदां-तील मतभेदांची जाणीव असून देखील मी तुम्हाला नवीन कार्यकारिणीसाठी नावे सुचविली तर ती तुमच्यावर लादली गेल्यासारखे होईल असे मला वाटते. माझ्या पत्रातून या परिस्थितीविषयी मी तुम्हाला लिहिलेच होते या तीन दिवसांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर माझ्या मतात परीवर्तन घडून यावे असे काहीही घडलेले नाही. आणि त्यामुळे तुम्ही तुमची कार्यकारिणी नेमण्यास स्वतंत्र आहात. "

म. गांधीच्या या धोरणांमुळे सुभाष बोस यांना राजीनामा देणे भाग पडले. त्यांच्या जागी राजेंद्रबाबूंची निवड झाली. त्यांनी निवडलेल्या कार्यकारिणीत इतके उजवे पुढारी होते की ज. नेहरुंचे देखील नाव त्यातून वगळण्यात आले. नवीन कार्यकारिणीने प्रथम जी पावले उचलली ती म्हणजे अ. भा. काँ. कमेटीची बैठक बोलावून सुभाष बोस, सोशालिस्ट व इतर डावे पुढारी यांच्या जबरदस्त प्रतिकारा-विरूद्ध दोन ठराव पास करुन घेतले. एका ठरावान्वये काँ. मंत्रीमंडळे असलेल्या प्रांतातील काँ कमिटोच्या परवानगीशिवाय काँ. जनांना कोणत्याही प्रकारचे सत्याग्रह कार्यान्वित करण्यास मज्जाव करण्यात आला शेतकऱ्यांच्या वाढत्या संघ-र्षात कोणाही काँ. सभासदाने सहभागी होऊ नये हाच याचा उघड हेतू होता. डॉ. लोहिया म्हणाले — " तुमचा (गांधींचा) मंत्रीमंडळविषयक व विधायक कार्यक्रम लोकांना आता मुळीच पसंत नाही. त्याऐवजी शेतकरी उठावासारख्या कार्यक्रमांत ते सहभागी होऊ पहात आहे. ज्यावेळी सार्वत्रिक सत्याग्रह चालू नसतो अशाही वेळी स्थानिक नव्या चळवळी होत राहतात "

म. गांधी त्यावर म्हणाले — " बहुतेक ठिकाणी अहिंसात्मक चळवळ करण्याचे शिक्षण शेतकऱ्यांना दिले जात नाही याचे मला दुःख होते. माझ्या सभोताली जे काही घडत आहे ते म्हणजे अहिंसात्मक लढ्याची तयारी नव्हे ; तर अभावितपणे वा अहेतुकपणे का होईना पण हिंसात्मक उठावाचेच ते प्रकार आहेत. "

हा ठराव म्हणजे संघटनविषयक संघर्षाची जोरदार सुरूवातच होय. सुभाष बोस व कार्यकारिणीचे पदाधिकारी व सभासद यांनी ' ९ जुलै ' हा कार्यकारिणीच्या विरुद्ध ' निषेधदिन ' म्हणून पाळण्याचे ठरविले. काँग्रेस कार्यकारिणीने या निषेधाविरुद्ध एक ठराव पास करुन त्या अन्वये ' श्री. सुभाष बोस यांची शिरतभंगाची कृती गंभीर स्वरूपाची असल्यामुळे ऑगस्ट १९३९ पासून पुढील ३ वर्षांकरिता बंगाल काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदासाठी ते अपात्र असल्याचे ठरवून त्यांना दूर करण्यात आले.

यामुळे साहजिकच डाव्या व डाव्या गटांत जबरदस्त संघर्ष सुरू झाला. सुभाष बोसांप्रमाणे अनेक सभासदांची काँग्रेसमधून हकालपट्टी होण्यापूर्वीच जागतिक पातळीवर यापेक्षा महत्वाचा असा पेचप्रसंग निर्माण झाला. हिटलरने पोलंडवर हल्ला केला. पाठोपाठच इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारुन भारतही युद्धात सहभागी असल्याचे जाहीर करुन टाकले. भारतातील जनमताचा कौल न घेताच इंग्लंडने युद्धात भारताची भागीदारी जाहीर करावी याबद्दल देशभर असंतोष पसरला. हा असंतोष सर्वदूर भडकण्यापर्यंत परिस्थिती चिघळली असतानाच व्हॉईसरॉयने अनेक वटहुकूम जारी केले. भारताची सुरक्षितता युद्धामुळे धोक्यात येण्याइतका ' गंभीर आणीबाणीचा प्रसंग ' उद्भवला आहे, असे कारण त्यांनी पुढे केले.

१० कार्यकारी समितीशी मतभेद

अहिंसावादी असूनही गांधीजींनी पहिल्या महायुद्धात ब्रिटिनतर्फे सैन्यभरतीचे काम केले असल्यामुळे दुसऱ्या महायुद्धातही तेच काम गांधीजी पुन्हा करतील का असा प्रश्न साहजिकच उद्भवला; आणि हाच प्रश्न त्यांना एका प्रमुख कार्यकर्त्याने विचारला असता गांधीजींनी त्याला उत्तर दिले —

" पहिल्या महायुद्धापेक्षा चालू युद्धातील भयानकता मला तीव्रतेने जाणवत आहे. त्यावेळी वाटली नाही इतकी अस्वस्थता आज मला वाटत आहे. या युद्धातील वाढत्या भयानकतेमुळे गेल्या युद्धात स्वेच्छेने केलेले सैन्यभरतीचे काम आज मी करू इच्छित नाही. परंतु इतरांना आश्चर्य वाटले तरी माझी संपूर्ण सहानुभूती मित्रराष्ट्रांनाच आहे. कोणाला आवडो न आवडो ; परंतु हे युद्ध पश्चिमी राष्ट्रांनी विकसित केलेली लोकशाही व हिटलरने निर्माण केलेली हुकूमशाही यांतील संघर्षच होय. " (प्र. ५, पृ. २०७)

ह्यामुळे गांधीजींची ब्रिटनविषयक भूमिका बदलली नव्हती ; त्यांची इच्छा ब्रिटन विजयी व्हावा अशी असूनही पहिल्या महायुद्धानंतर ते अधिक अहिंसावादी झाल्यामुळे आता सैन्यभरतीला मात्र मदत करण्याची त्यांची इच्छा नव्हती असे वाटणे साहजिक आहे. परंतु हे खरे नव्हते.

१) पहिल्या महायुद्धातील ब्रिटिश सैन्यभरती प्रचारकाची गांधींची भूमिका हे वैयक्तिक धोरण नसून संपूर्ण भारतीय भांडवलदार वर्गाच्या धोरणाचाच अविभाज्य भाग होता. अमेरिकेतील गदर पार्टी आणि बंगाल व इतर प्रांतामधल तथाकथित ' दहशतवादी ' असे मूठभर क्रांतिकारक वगळता, राष्ट्रीय चळवळीतील संपूर्ण नेतृत्वाने युद्धात ब्रिटनला मदत करण्याचे धोरण स्वीकारले. परंतु त्यांनी जबाबदारीच्या स्वराज्याची राष्ट्रीय मागणी मंजूर करावी अशी अट घातली.

२) सैन्यभरतीला आपण मदत केली आहे अर्थ आपण स्वराज्य मिळविण्याचे उद्दिष्ट सोडले आहे असा नव्हे, हे गांधीजींनी स्वतःच प्रांजळपणे कबूल केले होते. ' स्वराज्य मिळविण्याचा सरळ व सोपा मार्ग साम्राज्याचे रक्षण करणे हा होय ' असे गांधीजी म्हणाल्याचे सुरुवातीच्या प्रकरणांमध्ये सांगीतले आहेच. ' जर एवढा त्याग आपण साम्राज्याकरिता आणि स्वराज्यकरिता केला नाही तर आपण स्वराज्य मिळविण्याच्या योग्यतेचे नाही, असे समजल्या गेल्यास त्यात आश्चर्य नाही' असे गांधीजी पुढे म्हणाले होते.

३) पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात भारतीय भांडवलदारवर्ग शक्तिशाली झाल्यामुळे त्याला प्रांतीय स्वायतता देण्यात आली होती.

७ प्रांतामध्ये काँग्रेस स्वतःचे मंत्रीमंडळ बनवू शकली. एवढ्यावरच मांडवलदार-वर्गाचे समाधान झाले नव्हते ; म्हणून काँग्रेसने एकीकडे जनतेच्या चळवळीचा दबाव आणून तर दुसरीकडे वाटाघाटी करुन आपली शक्ती आणखी वाढविण्याचा प्रयत्न केला. १९३५ ते ४० च्या काळात हेच डावपेच काँग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली अमलात आणले.

ह्याच डावपेचांचा काँग्रेस नेतृत्वावर ठसा उमटला होता. पहिल्या महायुद्धाप्रमाणे काँग्रेस आता ब्रिटिशांना बिनशर्त पाठींबा द्यायला तयार नव्हती ; तर निदान युद्धानंतर तरी केंद्रीय सत्ता दिली जावी या अटीवर तयार होती.

तथापि असेच धोरण काँग्रेसव्यतिरिक्त मुस्लिम लीग व हिंदू महासभा यासारख्या मांडवलदारधार्जिण्या किंवा जमीनदारधार्जिण्या पक्षांचेही होते.

४) सर्वसाधारणपणे मांडवलदारवर्ग आणि विशेषतः काँग्रेस यांच्या ह्या बदललेल्या परिस्थितिमुळेच गांधीजींच्या धोरणातही तसाच बदल झाला. गांधीजी ज्या वर्गाचे प्रतिनिधीत्व करीत होते त्या वर्गाची शक्ती आता पूर्वीपेक्षा वाढल्यामुळे ब्रिटिशांच्या अडचणीच्या वेळी त्यांच्याशी असहकार पुकारून ते दबाव आणू शकत होते. पहिल्या महायुद्धानंतर युद्धाविषयी निर्माण झालेल्या 'आत्यांतिक तिटकाऱ्यामागची गांधीजींची भूमिका यावरून स्पष्ट होते.

तेंडूलकरांच्या म्हणण्याप्रमाणे गांधीजी आणि कार्यकारिणी यांच्यात दुसऱ्या महायुद्धाच्या सुरूवातीच्या काळात युद्धविषयक भूमिकेत मूलभूत मतभेद होता. एकीकडे गांधीजी ब्रिटिशांना हवी असलेली मदत बिनशर्त देण्यास तयार होते; तर कार्यकारी समिती काही अटींवर पाठींबा द्यायला तयार होती; आणि दुसरीकडे कार्यकारिणी ही काँग्रेसच्या अटी मान्य झाल्यास सैन्यभरतीसारखे कार्य करायला तयार होती ; पण गांधीजी फक्त नैतिक व अहिंसामक पाठींबाच द्यायला तयार होते.

अहिंसेच्या तत्वाबाबतचा गांधीजींचा व कार्यकारिणीचा वेगवेगळा दृष्टिकोन हेच त्यांच्या मतभेदाचे मुख्य कारण होते. एकीकडे कार्यकारिणी फक्त ब्रिटिशांविरूद्धच अहिंसेचे तत्व वापरायला तयार होती ; परंतू जातीय दंगे, गुंडगिरी किंवा परकीय आक्रमण यांचा प्रतिकार करण्यासाठी अहिंसेच्या तंत्राने स्वतःस बांधून घेण्यास तयार नव्हती. गांधीजी मात्र अंतर्गत प्रश्न सोडवितांना काय, किंवा परकीय आक्रमणाचा प्रतिकार करताना काय, अहिंसेचेच तंत्र वापरण्याचा आग्रह धरीत होते.

गांधीजी आणि कार्यकारिणी यांच्या दृष्टीकोनातील ह्याच मतभेदामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या सूरुवातीस काँग्रेसमध्ये कडाक्यांचा वादविवाद होऊन अंतस्थ दुफळी माजली होती. गांधीजींचे सरदार पटेल व राजगोपालाचारी यांसारखे निक-

टवर्ती अनुयायी अहिंसेच्या नैतिक तत्वाचा वापर गांधीजींनी घातलेल्या मर्यादे-पर्यंत करायला तयार नव्हते त्यामुळे हा मतभेद होता असे भासविण्याचा प्रयत्न गांधीजी व त्यांचे चरित्रलेखक करू पाहतात.

वरवर नैतिक वाटणाऱ्या ह्या प्रश्नाच्या पाठीमागे, ब्रिटिशांशी कोणते डाव-पेच लढवावे हा मुख्य प्रश्न दडलेला आहे हे गांधीजी व कार्यकारिणी यांमधील मतभेदाचा आढावा घेतल्यास दिसून येते. गांधीजी व कार्यकारिणीचे बहुसंख्य सभासद यांच्यामधील मतभेद परस्पर संकेताने ठरल्यासारखे दिसत होते. यां-करिता ज्या परिस्थितीत मतभेद उद्भवला, तात्पुरता मिटला, पुन्हा तीव्रतर झाला आणि मिटला त्या परिस्थितीचा विचार उदाहरणादाखल करता येईल.

युद्ध सुरू झाल्यानंतर भरलेल्या कार्यकारिणीच्या पहिल्याच बैठकीत हा संघर्ष सौम्य स्वरुपात उद्भवला. ब्रिटिशांना सर्व प्रकारचा पाठिंबा विनशर्त द्यावा असे म्हणणारे आपण एकटेच असल्याची हळहळ गांधीजींनी या प्रसंगी व्यक्त केली. युद्ध नुकतेच सुरु झाले होते. युद्धातील प्रत्येक पक्ष आणि फॅसिस्टविरोधी प्रत्येक देश यांचा काय प्रतिक्रिया होईल हे अनिश्चित असल्यामुळे या परिस्थितीत कार्य-कारिणीने गांधीजींचा सल्ला अमान्य केला. संभाव्य अशा कोणत्याही वाटा-घाटीत ब्रिटिशांविरुद्ध आपली बाजू लंगडी पडेल अशा कोणत्याही विशिष्ट धोरणाने काँग्रेस स्वतःला बांधून घ्यायला तयार नव्हती विनशर्त किंवा निव्वळ अहिंसात्मक — ; कोणत्याही प्रकारे पाठिंबा दिल्यास अशी परिस्थिती निर्माण झाली — असती.

तथापि ब्रिटिश सरकार काँग्रेसच्या अटींवर वाटघाटी करुन तडजोड करण्यास तयार नव्हते हे नंतरच्या घटनांवरुन स्पष्ट झाले. भारतात लोकशाही व स्वयंनिर्णयाचे धोरण लागू होणार की नाही हे ब्रिटिश सरकारने जाहीर करावे या काँग्रेसच्या मागणीच्या विरुद्ध सरकारने मुस्लिम लीग, शे. का. फे उदारमतवादी व संस्थानिक यांच्या मागण्या उभ्या केल्या भारतमंत्री लॉर्ड झेटलँड व व्हॉईसरॉय लिन्लिथगो यांच्या वक्तव्यावरुन हे स्पष्ट झाले. गांधींच्या म्हणण्या-प्रमाणे, या वक्तव्यांना 'जुणाच दर्प' होता. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे युरोपीय हितसंबंध, सैन्य, संस्थानिक व जातीय विभाजन हे ब्रिटिश साम्राज्याचे चार आधारस्तंभ होते. यांपैकी जातीय प्रश्नाचा सरकारने उचललेला फायदा काँग्रसला अत्यंत अडचणीचा वाटत होता. हे देखील उघड होते. विशेषतः मुस्लिम लीग ही अधिक मजबूत होत जाऊन इतर अल्पसंख्यांकाबरोबर काँग्रेसच्या मार्गात मोठे अडथळे निर्माण करीत होती.

ब्रिटिशांवर आणखी दबाव आणल्याशिवाय ते आपली मागणी मान्य करणार नाहीत अशी काँग्रेस कार्यकारिणीची खात्री पटली. म्हणून कार्यकारिणीने सर्वप्रथम

प्रांतीय मंत्रीमंडळांना राजीनामे द्यायला सांगीतले. याच पाठोपाठ 'कोणत्याही प्रसंगाला' तोंड देण्यासाठी देशाचो तयारी करण्याची हाक कार्यकारिणीने दिली. नाझी लष्करशाहीला प्रतिलष्करशाहीने उत्तर देण्याऐवजी अहिंसात्मक मार्गाने ते द्यावे असे ब्रिटिशांना व इतर दोस्तराष्ट्रांना गांधीजींनी केलेल्या आवाहनाचा काँग्रेस कार्यकारिणीला चांगलाच उपयोग झाला. याच कारणामुळे जनतेचो युद्धविरोधी भावना भडकविणे शक्य होऊन ; जेणेकरून आपलो युद्धतयारी इतःपर कोणत्याही प्रकारे सुरू ठेवणे शक्य नाही असे ब्रिटिशांना वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण करता येईल अशी अटकळ कार्यकारिणीने बांधली.

म्हणून या काळात गांधींचा कार्यकारिणीशी मतभेद नव्हता. उलट कार्यकारिणीनेच लढ्याची तयारी म्हणून गांधीजींच्या सूचनांचे पालन करण्याचे जनतेला आवाहन केले. १९३४ च्या मुंबई अधिवेशनानंतर प्रथमच गांधीजींनी रामगढ अधिवेशनात भाषण दिले. ब्रिटिश सरकारने अवलंबिलेल्या धोरणामुळे काँग्रेस व तिच्या प्रभावाखाली असलेली जनता युद्ध चालू ठेवण्यास तन-मन-धन अर्पण करू शकणार नाही, अशा आशयाचा ठराव या अधिवेशनात मान्य करण्यात आला.

गांधीजींनी आपल्या या भाषणात युद्धविरोधी लढा कसा संघटित करायचा आणि चालू ठेवायचा हे विस्ताराने विशद केले. रामगढ अधिवेशनानंतर लगेच 'प्रत्येक काँग्रेस समिती ही सत्याग्रह समिती आहे' ही घोषणा गांधींनी दिली. काँ. समिती आणि वैय्यक्तिक काँ. कार्यकर्ते यांनी सत्याग्रही म्हणून कसे कार्य करावे याबद्दल इत्थंभूत सूचनाही त्यांनी दिल्या.

तथापि, लौकरच जागतिक परिस्थिती बदलली. ब्रिटन आणि त्याच्या दोस्त राष्ट्रांच्या पराभवांची मालिकाच जणू जर्मनीनें तयार केली ; संपूर्ण पश्चिम युरोप नाझींच्या वर्चस्वाखाली आला आणि खुद्द ब्रिटनचेच अस्तित्व धोक्यात आले, ब्रिटनमध्ये चेंबरलेनचे सरकार जाऊन चर्चिलचे सरकार आले. या सर्व घटनांमुळे ब्रिटनच्या भारतविषयक धोरणात बदल होणार का, असे प्रश्न पुढे येऊ लागले. गांधीजी म्हणतात—

" एकीकडे पाश्च्यात देशांमध्ये एकसारखो कत्तल सुरू असताना व घरेदारे बेचिराख होत असताना सध्याच्या या कुंठितावस्थेत शांततामय आणि सन्मान्य तडजोड घडवून आणण्याच्या प्रयत्नांत मी कोणतीही कसर ठेवणार नाही.

अशा परिस्थितीत गांधीजी आणि कार्यकारिणी यांच्यातील मतभेद पहिल्यापेक्षा अधिक वाढणे अपरिहार्य होते. ब्रिटनचे अस्तित्वच धोक्यात आलेले असल्यामुळे ब्रिटिश, राज्यकर्त्यांना भारतात काँग्रेसशी तडजोड करणे आता भागच पडेल असा विचार करणारे लोक कार्यकारिणीत बहुसंख्य होते. ब्रिटिशांना निव्वळ अहिंसात्मक मार्गांनी पाठिंबा देण्याचे गांधीजींचे धोरण अशा वेळी काँ. ला महाग

पडणार होते हे स्पष्टच आहे. गांधीजी व कार्यकारिणी यांच्यातील वादविवादानंतर, अहिंसेच्या इष्ट तत्वाला राष्ट्रीय संरक्षणापेक्षा अधिक प्राधान्य देणे कार्यकारिणीला इष्ट वाटले नाही. म्हणून त्यांनी अहिंसात्मक लढ्याचे नेतृत्व करण्याच्या जबाबदारीतून गांधीजीना मुक्त करण्याचा निर्णय घेतला. काँ. ने अहिंसेचे तत्व पाळावे व जबाबदारीतून परकीय आक्रमणाविरूद्ध वा अंतर्गत शांततेसाठी देखील सशस्त्र सैन्याचा करण्याची वापर तयारी दाखवू नये असे गांधींचे म्हणणे होते. परंतु ज्याअर्थी कार्यकारिणी त्या मर्यादेपर्यंत जाण्यास तयार नाही त्याअर्थी गांधींना स्वतःचा मार्ग आचरण्यास स्वातंत्र्य मिळावे म्हणून काँ. जो कार्यक्रम हाती घेणार होती त्याच्या नेतृवाच्या जबाबदारीतून काँग्रेसने गांधीजींना मुक्त केले.

यानंतर लवकरच अ. भां. महासमीतीची बैठक पुण्यास झाली. तीत अध्यक्ष मौलाना आझाद म्हणाले —

" काँग्रेस ही राजकीय संघटना असून तिने देशाकरिता राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची शपथ घेतली आहे. ही जागतिक शांतता प्रस्थापित करणारी संघटना नाही. महात्मा गांधी आम्हाला ज्या मर्यादेपर्यंत नेऊ इच्छितात त्या मर्यादेपर्यंत आम्ही जाऊ शकत नाही, असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते. हा आमचा कमकुवतपणा आहे ; पण या कमकुवतपणात आम्ही अखिल मानवजातीच्या बरोबर आहोत. आम्हाला भासणाऱ्या कितीतरी अडचणी आम्हाला सोडवायच्या आहेत. तरीही महात्माजींचा काँग्रेसशी होत असलेली ताटातुट हे कटु सत्य आम्हाला पचवावेच लागेल. या परिस्थितीला आम्हाला धैर्याने तोंड द्यावे लागेल.

(प्र. ५, पृ. ३८४)

काँग्रेस महासमितीच्या ह्या अधिवेशनात सुप्रसिद्ध ' पुणे मसुदा मांडण्यात आला. या मसुद्यात असे ज हिर करण्यात आले की देशाच्या रक्षणासाठी काँग्रेस राष्ट्रीय मंत्रीमंडळात सहभागी व्हायला तयार आहे. अर्थात् ब्रिटिश सरकारने युद्धानंतर भारताला स्वातंत्र्य देण्याची तयारी दाखवावी.

तथापि ह्याला सरकारपक्षाकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. जुलै-मधील काँग्रेसच्या 'पुणें मसुद्या' ला सरकारने 'ऑगस्ट मसुद्या' ने प्रत्युत्तर दिले. ह्या मसुद्यात व्हॉईसरॉय म्हणाले की भारतीयांनी नवी राज्यघटना पुढील दोन अटींवर तयार करावी.

(१) ब्रिटिशांच्या जबाबदाऱ्या मान्य कराव्या.

(२) अल्पसंख्याकांच्या मागण्यांना स्थान द्यावे,

यावरून ब्रिटन अद्याप आपल्या जुन्याच 'चार आधारस्तंभांच्या' धोरणास चिकटुन आहे हे स्पष्ट झाले. आपल्याला उपेक्षिण्यात आले आहे, असे काँग्रेसला वाटल्यास आश्चर्य नाही. काँग्रेसने उघडपणे गांधीशी मतभेद दर्शविला. तेंडुलकर

पुढे म्हणतात; —" अहिंसेचे तत्त्व देशाच्या संरक्षणार्थ वापरण्याच्या बाबतीतील आपली असमर्थता काँग्रेसने व्यक्त केलेली आणि आपली पूर्ण शक्ती युद्धतयारीसाठी खर्ची घालता येईल अशा अटी मांडल्या."

ब्रिटिश सरकारने उघडपणे काँग्रेसचा मसुदा फेटाळल्यामुळे पुन्हा एकदा काँग्रेस कार्यकारिणी व गांधीजीं याच्यातील मतभेद मिटला. कार्यकारिणीने महासमितीची तातडीची बैठक बोलावलीं. त्यात अध्यक्ष आझाद म्हणाले—

" ह्या घटनांमुळे म. गांधींना पुन्हा काँग्रेसच्या क्रियाशील नेतृत्त्वात येण्याची विनंती करण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे. मला हे कळविण्यास आनंद होतो की त्यांनी ही विनंती मान्य केली आहे. कारण कार्यकारिणी आणि त्यांच्यात आता काहीही मतभेद राहिले नाहीत." (प्र. ५. पृ. ३९६)

गांधीजींनी मांडलेला ठराव मंजूर करण्यात आला. त्यात जाहीर करण्यात आले —

" अहिंसेचे धोरण व त्यांचा उपयोग फक्त स्वराज्याच्या लढ्यापुरताच नसून शक्य होईल तिथपर्यंत स्वतंत्र भारतातही करता येईल असा या समितीला दृढ विश्वास वाटतो." (प्र. ५, पृ. ३९७)

महासमितीच्या ह्याच ठरावाची परिणती १९४०–४१ च्या युध्दविरोधी वैयक्तिक सत्याग्रहात झाली. प्रथम आचार्य विनोबा भावे यांनी सूरू केलेला व नंतर गांधीजींनी स्वतः निवडलेल्या अनेक सत्याग्रहींनी सुरू केलेला हा सत्याग्रह कित्येक महिने चालला. ब्रिटिशांच्या युद्धकार्यात ओढले जाण्यास विरोध दर्शविण्याशिवाय अन्य कोणताही उद्देश या सत्याग्रहामागें नव्हता ; आणि त्याहून अधिक परिणाम त्याचा झालाही नाही. गांधींनी वारंवार भाषणांतून व निवेदनांतून स्पष्ट केले की सुरू केलेला हा लढा स्वराज्यासाठी नसून ' तात्पुरते भाषण – व लेखन स्वातंत्र्य मिळविण्यापुरताच आहे. ' या लढ्याचा शेवट विजयातच होईल अशी अपेक्षा नाही हे त्यांनी स्पष्ट केले. ' ब्रिटन त्याच्या शत्रुंचा प्रतिकार करीत असताना आपण ब्रिटिशांचा प्रतिकार करीत आहोत . . . ब्रिटिशांचे व आपले अंतीम ध्येय एकच असावे. '

काही महिन्यांनंतर डिसेंबर १९४१ मध्ये गांधीजी व कार्यकारिणी यांतील मतभेद पुन्हा एकदा उद्भवला हे उल्लेखनीय होय. मुंबई ठरावाद्वारे टाकल्या गेलेल्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करण्यात यावे अशी मागणी गांधीजींनी केली. कार्यकारिणीने ती मान्य देखील केली. हे ज्या परिस्थितीत घडले तिचे वर्णन तेंडुलकरांनी पुढीलप्रमाणे केले आहे—

" १) जर्मनीने १९४१ मे मध्ये रशियावर आक्रमण केल्यामुळे जागतिक परिस्थिती एकदम बदलली. जुलैमध्ये व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात वाढ व राष्ट्रीय संरक्षण मंडळाची स्थापना जाहीर करण्यात आली.

२) राजकीय परिस्थिती सुधारण्यासाठी काहीतरी केले पाहिजे हे १९४१ च्या शेवटी स्पष्ट झाले होते. जर्मन फौजा हळूहळू रशियात घुसत होत्या आणि

सुदूर पूर्वेस जर्मनी धडक देण्याची शक्यता होती. जपानने इंडोचायनात आपले पाय मजबूत केले होते आणि पुरतेपणी युध्दात पडण्याची तयारी जपान करीत होते. भारतातील विपुल साधने व मनुष्यबळ एकवटणे ही तातडीची लष्करविषयक गरज झाली होती.

पर्ल हार्बर घटनेच्या आगेमागे ब्रिटिश सरकारने समझौता करण्याच्या दृष्टीने हालचाल केली. (ही हालचाल म्हणजे सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील राजबंद्यांची सुटका. त्यांत ज. नेहरू व. मौ. आझाद होते.)

३) २३ डिसें. १९४१ ला कार्यकारिणीची बार्डोलीला बैठक झाली. ह्या बैठकीत मागील बैठकीनंतरच्या १४ महिन्यात बदललेल्या परिस्थितीचा अढावा घेण्यात आला. जपान युध्दात पडल्यामुळे भेडसावणाऱ्या संकटाबाबत वस्तुनिष्ठ दृष्टिकोण कार्यकारिणीला घ्यावा लागला."

कार्यकारिणीच्या वरील दृष्टिकोनामुळे गांधीजींनी कार्यकारिणीला पत्र लिहिले. त्यात मुंबई ठरावांचा त्यांनी लावलेला अर्थ आणि इतरांनी लावलेला अर्थ यांमधील विसंगतीबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. ते पुढे म्हणाले—

"[illegible] ठरावाचे पुनर्वाचन केल्यानंतर, माझ्याशी मतभेद असणारे लोक बरोबर होते; आणि मी ठरावांचा अर्थ वेगळा लावला असे लक्षात आले आहे. ही चू[illegible]त आल्यामुळे युध्दविरोधी लढ्यात अहिंसात्मक मार्गच न चोखाळण्याच्या काँग्रेसच्या निर्णयामुळे मला काँग्रेसचे नेतृत्व करणे अशक्य झाले आहे. . . म्हणून तुम्ही मुंबई ठरावाद्वारे माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीतून मला कृपया मुक्त करावे."

कार्यकारिणीने त्यांची सूचना ताबडतोब मान्य केली आणि सरकारशी बोलणी सुरू करण्याच्या प्रयत्नांसाठी पुन्हा मार्ग मोकळा केला.

"४) घटना विजेच्या वेगाने घडत होत्या. दोस्तराष्ट्रांची युरोप व आशिया मध्येही पीछेहाट झाली. ब्रह्मदेशात ब्रिटिश फौजांची दाणादाण उडाली. त्याचे परिणाम चीनमध्ये जाणवू लागले. फेब्रुवारी १९४२ मध्ये मार्शल चँग कै शेक यांनी दिल्लीला भेट दिली आणि त्यांनी धिटाईने भारत व ब्रिटन यांना आवाहन केले भारताला राजकीय स्वातंत्र्य देण्याचे उघड आवाहन मार्शलने राज्यकर्त्यांना केले."

५) ह्या सर्व घटनांमुळे वाटाघाटी सुरू करणे ब्रिटिशांना भाग पडले.

"७ मार्च १९४२ ला रंगून पडल्यामुळे तर असे वाटले की जपानच्या विजयाची लाट लवकरच बंगाल व मद्रासमध्ये पोहोचणार. ११ मार्चला, युध्द मंडळाने भारताबाबत एक योजना मान्य केली असल्याचे चर्चिलने जाहीर केले. ह्या योजनेला 'योग्य व खरीखुरी' मान्यता कितपत मिळते हे आजमावण्यासाठी आणि भारतीय जनतेची विचारसरणी व तिची ताकद जपानविरोधी लढ्यात संपूर्णपणे एकवटली जाईल की नाही हे पाहण्यासाठी सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्सने भारताला भेट देण्याचे मान्य केले." (प्र. ६, पृ. ८७)

११. 'चले जाव' आणि त्यानंतर

राष्ट्रीय संरक्षणासाठी अहिंसेचे तत्त्व वापरणे हे न्याय्य मानावे की नाही हा गांधीजी व कार्यकारिणी यांमधील वादविषय नसून ब्रिटिशांशी कशा प्रकारे वाटाघाटी कराव्या आणि त्याच्यावर कसा दबाव आणावा हा खरा वादाचा मुद्दा होता, हे गेल्या प्रकरणात निर्देशिलेल्या घटनांवरून स्पष्ट झालेच आहे.

निर्भेळ अहिंसेबाबत गांधीजींचा आग्रह आणि ब्रिटिशांच्या युध्दकार्याला अहिंसात्मक विरोध करण्याचा त्यांचा निर्धार ही ब्रिटिशांवर दबाव आणणारी परिणामकारक शस्त्रे ठरली. त्यामुळे ज्या ज्या वेळी लढ्याची धमकी देणे वा लढा उभारणे हे कार्यकारिणीला आवश्यक वाटले त्या त्या वेळी गांधीजींना नेतृत्व देण्यात आले.

याउलट ; ज्या वेळी ब्रिटिशांशी वाटाघाटी करण्याची संधी असेल त्या वेळी सत्तेचे हस्तांतरण मान्य करण्याची अट घालून ब्रिटिशांना युध्दकार्यात पूर्ण मदत केली पाहिजे असा 'व्यावहारिक दृष्टिकोन' कार्यकारिणीने घेतला. अशा सर्व प्रसंगी गांधींनी स्वतःच नेतृत्वातून मुक्तता मागितली व कार्यकारिणीने त्याला ताबडतोब मान्यताही दिली. ब्रिटिशांशी वाटाघाटी व त्यांना जनतेच्या दबावाची जोड ही मांडवलदारवर्गाच्या मूलभूत डावपेचांशी तंतोतंत जुळणारी उत्कृष्ट व्यवस्था होती

गांधीजी व काँग्रेसचे इतर नेते यांच्यातील संघर्ष आणि तडजोड याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणून काँग्रेस व सरकारी प्रतिनिधी यांच्यात ज्या पद्धतीने नंतरच्या वाटाघाटी झाल्या त्यांचा निर्देश करावा लागेल.

काँग्रेस कार्यकारिणीला ब्रिटिशांशी वाटाघाटी करणे शक्य व्हावे याच विशिष्ट उद्दिष्टाकरिता १९४१-४२ च्या सुमारास गांधीनी काँग्रेसचे नेतृत्व सोडले. औपचारिकपणे काँ. अध्यक्ष व कार्यकारिणी हे जरी वाटाघाटीत भाग घेत असले तरी प्रत्येक वेळी गांधीजींचा सल्ला घेतला जात असे. गांधीजी औपचारिकरीत्या जरी प्रत्यक्ष वाटाघाटींपासून अलिप्त असले तरी त्यांच्याच मताने काँग्रेसचे वाटाघाटीतील धोरण ठरत होते. याहीपुढे, ज्या ज्या क्षणी वाटाघाटी फिसकटल्या व ब्रिटिशसरकार काँ. च्या न्यूनतम मागण्या पूर्ण करण्यास तयार नसल्याचे दिसले त्या त्या क्षणी गांधींजी ब्रिटिशविरोधी जनआंदोलनाच्या अग्रभागी आले. 'छोडो भारत' ही प्रसिद्ध घोषणा गांधीजींनीच दिली.

१९४०-४१ व १९४२ मधील गांधीजींच्या भूमिकांमधील तफावतीचे कोणालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. ४०-४१ मध्ये सुरू केलेला लढा हा स्वातंत्र्याचा लढा नाही, हे गांधीजींनी स्पष्ट केले होते. ते म्हणाले—

" ज्याचे स्वतःचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे अशा राष्ट्राविरुद्ध आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी कसे लढावे ! एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला स्वातंत्र्य देऊ शकेल ; पण इंग्लंडला तसे करणे शक्य नाही. स्वतःच जे संकटात सापडले आहेत ते दुसऱ्यांना कसे वाचवणार ? परंतु जर स्वतःच्या स्वातंत्र्याकरिता ते मरेपर्यंत लढू शकत असतील जर ते पुरेसे समजूतदार असतील तर त्यांनी भाषणस्वातंत्र्याचा आमचा हक्क मान्य केलाच पाहिजे."

पण १९४२ मध्ये मात्र त्याचे मत बदलले होते. ते म्हणतात " ब्रिटिशांनी आता शांतपणे निघून जावे आणि सिंगापूर, मलाया व ब्रह्मदेशात पत्करलेला धोका पुन्हा ओढवून घेऊ नये असे माझे ठाम मत आहे. असे करणे हे उच्च दर्जाचे धैर्य ठरेल ; मानवतेच्या मर्यादेचा तो कबुलीजबाब ठरेल आणि भारताकरिता केलेले एक न्याय्य कार्य ठरेल. "

' फक्त भाषणस्वातंत्र्य ' आणि 'स्वातंत्र्य- इथे व आताच' या दोन उद्दिष्टांमधील तफावत पाहा. त्यातच आपल्याला लढ्याच्या तंत्रातील फरक दिसून येतो. १९४०–४१ चा लढा हा गांधीजींनी कठिण निकषांवर पारखून घेतलेल्या काही सत्याग्रही व्यक्तिविशेषापुरताच मर्यादित ठेवला. तो तसा मर्यादित न ठेवता जनताव्यापी करावा अशी सूचना करणाऱ्यांवर ते चिडत असत. ' एक राजदूत सबंध देशाचे प्रतिनिधित्व करीत नाही का ?" असा गांधीजींनी त्यावेळी सवाल टाकला होता.

परंतु १९४२ मधील त्याँची भूमिका पूर्णपणे भिन्न होती. आयुष्यात प्रथमच जनतेने केलेल्या हिंसात्मक प्रतिकाराचा धिक्कार त्यांनी केला नाही. जनतेच्या लढाऊ कृत्यांकडे पाहाण्याचा त्यांचा जुना दृष्टिकोन बदलला. (चौरी चौऱ्याच्या वेळेचा) ' जनतेचा हिंसात्मक प्रतिकार ' ही सरकारने केलेल्या ' आत्यंतिक हिंसेची अपरिहार्य प्रतिक्रियाच ' होय असे आता ते म्हणू लागले.

' छोडो भारत ' चळवळ सुरू केल्यास जनतेचा उत्स्फूर्त उठाव होईल अशी अटकळ गांधीजींनी ८ ऑगस्ट १९४२ च्या आधीच बांधली होती असे दिसते. कारण लाखो शेतकरी ब्रिटिशांविरुध्दच नव्हे तर जमीनदारांविरुध्द देखील बंड करुन उठतील असे गांधीजी आयुष्यात याच वेळी पहिल्यांदा म्हणाले. सारा देणे बंद करून लढ्याची सुरुवात शेतकरी करतील आणि सारा देण्यास नकार दिल्याने शेतकऱ्यांना आपण स्वतंत्रपणे लढा देण्यास समर्थ आहोत असे समजण्याचे धैर्य होईल. यापुढची पायरी 'जमिनी चा ताबा घेणे' ही राहील, असे अमेरिकन वार्ताहर लुई फिशर यांना ते म्हणाले. पुढील प्रश्नोत्तरे पाहा :—

श्री. फिशर : ताबा हिंसात्मक मार्गाने घेतला जाईल का ?

म. गांधी : हिंसा कदाचित होईल ही; परंतु नंतर जमीनदार सहकार्य देतील.

श्री. फिशर : तुम्ही आशावादी आहात.

म. गांधी : पळून जाण्याद्वारे देखील ते सहकार्य देतील.

श्री फिशर : कदाचित हिंसात्मक मार्गानेही ते संघटित प्रतिकार करतील.

म. गांधी : होईलही पंधरा एक दिवस गोंधळ. परंतु मला वाटते, ही परिस्थिती लवकरच आटोक्यात आणता येईल.

अर्थात जनतेच्या खऱ्याखुऱ्या क्रांतिकारी लढ्याची कल्पना गांधींनी केली होती असा निष्कर्ष वरील संवादावरून काढणे चूक होईल. कारण ब्रिटिशांना भारत सोडणे भाग पडावे यासाठी देशाची तयारी करीत असताना ते –'शेतकरी जमिनी हिसकतील, 'पंधरा दिवस गोंधळ होईल' -- इत्यादि म्हणत असले तरी प्रत्यक्षात संघटित कामगारवर्ग व शेतकरी यांचा क्रांतिकारक लढा सुरू करण्यासाठी अथवा त्यांचे नेतृत्व करण्यासाठी कोणतीही पूर्वतयारी त्यांनी केली नाही.

अ. भा. काँग्रेस महासमितीसमोर त्यांनी केलेल्या दोन तासांच्या भाषणात त्यांनी कामगार किंवा शेतकरी यांना उद्देशून एकही शब्द उच्चारला नव्हता हे उल्लेखनीय होय. त्यांच्या भाषणाचा बहुतांश भाग हिंदू-मुसलमान प्रश्नावरील त्यांची व काँग्रेसची भूमिका स्पष्ट करण्यासाठीच खर्ची पडला होता. एवढे झाल्यावर 'दुर्दम्य त्याग करा' अशासारखे काही शब्द; आणि त्या पाठोपाठ पत्रकार, संस्थानिक, सरकारी कर्मचारी, सैनिक आणि विद्यार्थी या प्रत्येक थरातील व्यक्तींना 'छोडो भारत' चळवळीत त्या काय करू शकतात आणि त्यांनी काय करावे याविषयी सूचनावजा आवाहन होते. जनतेतील बहुसंख्य कामगार व शेतकरी हे मात्र गांधींच्या दृष्टिपथात देखील नव्हते. गांधींच्या मते जनतेच्या या मूक वर्गांसाठी असलेले कार्य म्हणजे केवळ त्याग करणे, 'करा किंवा मरा' एवढेच.

ही चूक अनवधानाने झालेली नव्हती, हे कार्यकारिणीकरिता त्यांनी तयार केलेल्या 'सूचनांच्या मसुद्या' वरून लक्षात येते या मसुद्यात एक दिवसाच्या हरताळाची सूचना होती. अशीच सूचना दोन दशकांपूर्वी असहकार चळवळ सुरू करताना त्यांनी दिली होती. हरताळाच्या दिवशी शहरातून मिरवणुकी काढू नयेत किंवा सभाही घेऊ नयेत; सर्वांनी त्या दिवशी २४ तासांचे उपोषण करावे; प्रार्थना करावी अशी अट गांधीजींनी घालूनच ठेवली होती. खेड्यामध्ये हिंसाचार उपद्रव होण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे तेथे मात्र सभा-मिरवणुकी यांसाठी त्यांनी परवानगी दिली होती. यावरून हे उघड होते की कष्टकरी जनतेला लढाऊ कार्यक्रमापासून रोकून ठेवणे हा जुनाच उद्देश अजूनही ते बाळगून आहेत.

शेतकऱ्यांचा जमीनदारविरोधी संभाव्य लढा थोपवून धरणे या दृष्टिनेच गांधींनी सूचनांचा हा मसुदा अत्यंत काळजीपूर्वक तयार केला होता, हे उल्लेखनीय आहे. शेतकऱ्यांचा लढा हा सरकारविरोधापुरताच मर्यादित राहावा म्हणून त्यांनी

शेतकऱ्यांना आवाहन केले होते—

" जेथे जमीनदारी पद्धती प्रचलित आहे . . . . . तेथे कुळांनी जमीनदाराशी तडजोड करून त्यांना त्यांचा हिस्सा द्यावा व दोघांनी संयुक्तपणे सरकारचा विरोध करावा; पण जमीनदार जर सरकारचा पक्ष घेत असेल, तर त्याला सारा देण्यात येऊ नये "

' ऑगस्ट क्रांति ' ही गांधीजींनी योजिलेली जनतेची खरीखुरी क्रांतिकारी चळवळ होती असे समजणारे कैक राजकीय गट व व्यक्ती आजही आहेत. परंतु असे समजण्यास काहीही आधार नाही. हे मात्र निर्विवाद खरे आहे की या चळवळीत लोकांनी हिंसात्मक वृत्ती दाखविली तेव्हा त्यांना हिंसेपासून परावृत्त करण्याबाबत त्यांनी विशेष उत्साह दाखविला नाही. लढा सुरू केल्याभुळे जनतेची शक्ती व लढाऊ वृत्ती प्रवाही बनेल अशी त्यांनी कल्पना केली होती आणि त्यांची इच्छाही तशीच होती. पूर्वीच्या लढ्यांमध्ये अहिंसापालनाबद्दल त्यांनी जितका आग्रह धरला होता तितका या वेळी धरला नाही. परंतु याचा अर्थ तडजोडविरहित लढाऊ कृतीपर्यंत जनतेची चळवळ जावी आणि तिचा शेवट साम्राज्यशाहीच्या व तिच्या भारतीय दलालांच्या संपूर्ण पराभवात व्हावा असा होतो का?

गांधीजींचा उद्देश असा नव्हता हे वस्तुस्थितीवरून सहज उघड होते. हा लढा लवकरच संपेल अशी गांधीजींची कल्पना होती. जनतेच्या उत्स्फूर्त आंदोलनामुळे सरकारला तडजोड करणे भाग पडेल असे त्यांना वाटले होते. जनतेने उत्फूर्त प्रक्षोभ दर्शविला आणि सरकारी यंत्रणा खिळखिळी करणारी लढाऊ चळवळ उभारली तर काही दिवस तरी गोंधळ उडेल असे त्यांना वाटत होते. सरकारचे न्याय्य हुकूम तेवढे पाळायचे असे शासकीय कर्मचाऱ्यांनी व सैनिकांनी जर ठरविले तर दोस्तराष्ट्रांचे पुढारी ब्रिटिशांवर दबाव आणून भारताची मागणी मंजूर करण्यास त्यांना भाग पाडतील अशी त्यांची अटकळ होती. ऑगस्टपूर्व काळातील गांधीजींची सर्व भाषणे व लिखाण यांतील बहुतेक भाग दोस्तराष्ट्रांना व त्यांच्या पुढाऱ्यांना उद्देशून होते ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. परदेशी पत्रकारांना त्यांनी दिलेल्या मुलाखती, मार्शल चँग-कै-शेक व राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांना लिहिलेली वैयक्तिक पत्रे, रशिया व चीनचे रक्षण आवश्यक असल्याबद्दल त्यांनी वारंवार केलेला उल्लेख, विदेशी वृत्तपत्रांमधून संबंध जगाला त्यांनी केलेले विशेष आवाहन आणि शेवटी अ. भा. काँग्रेस महासभेपुढे त्यांनी केलेले भाषण–या सर्वांचा उद्देश दोस्त राष्ट्रांनी भारतातर्फे मध्यस्थी करावी हाच होता. मौ. आझाद सुद्धा अ. भा. महासभेचा समारोप करताना म्हणाले– " काँग्रेसच्या मागण्या आपण संयुक्त राष्ट्रसंघापुढे ठेवीत आहोत; आणि शेवटच्या क्षणापर्यंत तडजोड घडविण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. "

अ. भा. काँग्रेस महासभेच्या मुंबई अधिवेशनानंतर काही आठवड्यातच वरील आडाखे सपशेल चुकीचे असल्याचे दिसून आले. जनतेचा लढा सरकारी यंत्रणा खिळखिळी करण्यास जसा पुरेसा नव्हता तसाच दोस्तराष्ट्रांचा दबाव हा-देखील ब्रिटिश सरकारला भारताची मागणी मान्य करण्यास भाग पाडण्याइतका पुरेसा नव्हता. तेंडूलकर म्हणतात– " सप्टेंबरच्या शेवटी शेवटी ब्रिटिश सरकार हिंसात्मक व शांततामय असे दोनही लढे चिरडून टाकण्यात यशस्वी झाले. "

१९३२ प्रमाणेच आताही गांधीजींनी तुरुंगातच उपोषण सुरू केले. १९३२ व १९४३ ची ही दोन्ही उपोषणे राजकीय स्वरूपाची नसून नैतिक मूल्यांबाबत असल्याचे वरकरणी भासते. परंतु या दोन्ही उपोषणांचा उपयोग त्यांनी राजकीय कारवाई सुरु करण्यासाठीच केला. ही कारवाई म्हणजे राजकीय प्रश्नांवर ब्रिटि-शांशी वाटाघाटी. १९४३ मध्ये अ. भा. काँग्रेस महासभेच्या ऑगस्ट बैठकीनंतर ब्रिटिशानी आपले दडपशाहीचे धोरण न्याय्यच होते या भूमिकेच्या पुष्टचर्थ केले-ल्या आरोपांचा गांधीजींनी नैतिक प्रश्न म्हणून उपयोग केला. तथापि हा मुद्दा कोणत्याही प्रकारे नैतिक नसून राजकीयच होता हे गांधीजींनी व्हॉईसरॉयला आपल्या भूमिकेबद्दल जानेवारी ४३ मध्ये लिहिलेल्या पत्राच्या गोषवाऱ्यावरून दिसून येईल.

(१) " मी एकट्याने काही करावे असे वाटत असल्यास आपण माझी चूक मला पटवून द्यावी. म्हणजे मी ती सुधारण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीन.

(२) मी काँग्रेसच्या वतीने तडजोड सुचवावी असे वाटत असल्यास मला कार्यकारिणीच्या सभासदांबरोबर विचारविनिमय करू द्यावा. सांप्रतचा पेचप्रसंग दूर होण्याच्या दृष्टिने आपण निश्चयपूर्वक धोरण ठरवावे अशी माझी आपणास विनंती आहे. "

तथापि गांधीजींच्या सूचना ऐकावयास सरकार तयार नव्हते. त्यामुळे क्षुब्ध होऊन गांधीजींनी उपोषण केले. या वयात त्यांनी केलेल्या उपोषणामुळे देश चिंताग्रस्त व भयकंपित झाला. त्यांच्या जीविताबद्दल वाटणाऱ्या जनतेच्या भाव-नेला सरकारला प्रतिसाद द्यावाच लागला. त्यांच्या उपोषणकालात सरकारने अने-कांना त्यांची भेट घेण्याची परवानगी दिली. काँग्रेस पुढाऱ्यांच्या सुटकेसाठी आणि काँग्रेस व सरकार यांच्यात वाटाघाटी सुरू करण्यासाठी मोहीम सुरू झाली.

'छोडो भारत' चळवळीमुळे व काँग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेमुळे निर्माण झालेला पेचप्रसंग सोडविण्याचा मी सर्वतोपरी प्रयत्न करीन असे गांधींनी सर्वांना सांगीतले. मार्चमध्ये मुंबईत जमलेल्या कांग्रेसेतर पुढाऱ्यांनीं एक पत्रक काढले. त्यात ते म्हणाले—

" आमच्यापैकी काही जणांची गांधीजींशी नुकतीच जी मुलाखत झाली तीवरून सद्यपरिस्थितीत तडजोडीचा प्रयत्न केल्यास त्याला यश येईल असे आम्हाला वाटते. गांधीजींना मुक्त केल्यास ते आपली सर्व शक्ती पणाला लावून अंतर्गत पेचप्रसंग सोडविण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य देतील अशी आमची खात्री आहे. लढाई यशस्वी करण्याच्या कार्यात यामुळे अडथळा येईल अशी भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही." (प्र. ६, पृष्ठ २५०)

सरकार व काँग्रेस यांच्यातील वाटाघाटीचा प्रश्न, त्याचप्रमाणे काँग्रेस व लीग यांच्यांतील वाटाघाटीचा प्रश्न यांविषयी गांधीजींनी ' छोडो भारत ' चळवळीच्या काळात घेतलेली भूमिका आता बदलली होती हे राजगोपालाचारी यांनी एक वर्षानंतर स्पष्ट केले होते.

'१९४३ च्या उपोषणकालात विचारविनिमय झाला होता. त्यावेळी तयार मसुद्याला गांधींनी मान्यता दिली होती. याच मसुद्याच्या आधारावर काँग्रेस व लीग यांच्यात तडजोड व्हावी असे गृहित धरले गेले होते. ' (प्र. ६, पृ. ३२२)

गांधीजींनी श्री. जिना यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु — " गांधी माझ्याशी सरळ पत्रव्यवहार का करित नाहीत," ही जिनांची तक्रार होती. मे महिन्यात याचा खुलासा करताना गांधीजी म्हणाले — " मी आपल्या निमंत्रणाचे स्वागत करतो. पत्रव्यवहारांपेक्षा आपली प्रत्यक्ष भेट घेऊन समोरासमोरच विचारविनिमय करावा अशी माझी इच्छा आहे. जातीय प्रश्न सलोख्याने सोडविण्याचा प्रयत्न या भेटीत व्हावा असे मला वाटते." (प्र. ६, पृ. ३१८)

परंतु काँग्रेसशी वाटाघाटी करण्यास सरकार तयार झाले नाही. एवढेच नव्हे; तर काँग्रेस व लीग यांच्यात विचार विनिमय होऊ देण्यास ही सरकारने नकार दिला. गांधीजींच्या उपोषणानंतर त्यांना दिलेल्या पत्रोत्तरात, गांधीजींनी काँग्रेसच्या ऑगस्ट ठरावापासून अलिप्तता दर्शवून जनतेच्या व अनेक काँग्रेस पुढाऱ्यांच्या हिंसात्मक कृत्यांचा निषेध करावा अशी सूचना सरकारने केली. गांधीजींची भेट घेण्याबाबत काँग्रेसेतर पुढाऱ्यांनी केलेली विनंती ही सरकारने खालील मुद्यांवर फेटाळून लावली —

" काँग्रेसचे धोरण ' जैसे थे ' असे तो पर्यंत आमची काँग्रेसविषयक भूमिका बदलण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तुमच्या सद्भावनेचा आणि योग्य मार्ग शोधण्याच्या हेतूचा आदर ठेवूनही जोपर्यंत परिस्थितीत बदल होत नाही. तोपर्यंत गांधींना भेटण्याची सवलत सरकार देऊ शकत नाही. " (प्र. ६, पृ. २५१)

गांधीनी जिनांना लिहिलेले पत्र पोहोचविण्यास देखील सरकारने अशा मुद्यावर स्पष्ट नकार दिला, की " बेकायदेशीर जनआंदोलनाचा निषेध न करता

त्याला उत्तेजन दिल्यामुळे अटकेत असलेल्या व्यक्तीला राजकीय पत्रव्यवहार व संपर्क साधण्याची संधी सरकार देऊ शकत नाही; कारण आणीबाणीच्या वेळी युद्धविषयक कार्यात त्यामुळे अडथळा निर्माण होईल." (प्र. ६, पृ. २६०)

म्हणून १९४३ व १९४४ च्या पूर्वार्धात राजकीय पेचप्रसंग कायम राहिला. काँग्रेस पुढाऱ्यांना अजूनही तुरुंगात ठेवल्यामुळे संपूर्ण राष्ट्र संतप्त झाले होते. परंतु सरकार त्यांच्या सुटकेची मागणी पूर्ण करण्यास तयार नव्हते. शेवटी मे १९४४ मध्ये प्रकृत्ती फार बिघडल्यावरच गांधीजींची सुटका करण्यात आली.

तथापि ह्या सुटकेमुळे परिस्थिती थोडी बदलली कारण त्यामुळे काँग्रेस-सरकार संबंधाचा प्रश्न व हिंदू-मुस्लिम प्रश्न यांबाबतच्या नव्या धोरणासाठी जाहीरपणे आपले वजन खर्च करणे गांधीजींना शक्य झाले. सर्व संबंधित पक्षांना पुनर्विचार करणे सुलभ व्हावे याकरिता त्यांनी प्रयत्न केले.

(१) सर्वात प्रथम त्यांनी 'न्यूज क्रॉनिकल' च्या श्री. गिल्डर या पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीच्या संधीचा उपयोग त्यावेळेच्या राजकीय परिस्थितीविषयीचा स्वतःचा दृष्टीकोन व्यक्त करण्यासाठी केला. ह्या मुलाखतीच्या वेळी त्यांनी असे म्हटल्याचा उल्लेख आहे — '१९४२ मध्ये त्यांनी जी मागणी केली ती आणि आता जी मागणी करू इच्छितात ती—या दोहोंत तफावत आहे. आता सनदी राज्यकारभारावर पूर्ण नियंत्रण असलेले राष्ट्रीय सरकार निर्माण झाल्याने त्यांचे समाधान होईल. १९४२ मध्ये त्यांचे मत तसे नव्हते." (प्र. ६, पृ. ३१८)

ही काही साधीसुधी पत्रकार मुलाखत नव्हती. ही म्हणजे "सध्याचा पेचप्रसंग सोडविण्याचा माझा वैयक्तिक प्रयत्न होता. तो जनतेपेक्षा प्रचलित राज्य सत्तेलाच उद्देशुन होता." असे गांधीजी म्हणतात. गिल्डर मुलाखतीनंतर गांधीजींनी व्हॉईसरॉयला दोन पत्रे लिहिली. या पत्रांमध्ये त्यांनी खालील निःसंदिग्ध विधान केले :—

"बदललेली परिस्थिती लक्षात घेता ऑगस्ट ४२ च्या ठरावात सुचविलेला सविनय कायदेभंग अमलात आणता येणार नाही असा कार्यकारिणीला सल्ला देण्याची माझी तयारी आहे. स्वतंत्र भारताची घोषणा ताबडतोब केल्यास व मध्यवर्ती कायदेमंडळाला जबाबदार असे सरकार स्थापन केल्यास युद्धकार्यात संपूर्ण सहकार्य देण्याचा ही सल्ला मी देईन. युद्धकालात सैनिक हालचाली आहेत तशाच चालू राह्यात; पण त्याची आर्थिक जबाबदारी भारतावर नसावी ही अट राहील. ब्रिटिश सरकारची तडजोडीची इच्छा असेल तर पत्रव्यवहाराऐवजी मित्रतापूर्ण वाटाघाटी सुरू कराव्या" (प्र. ६, पृ. ३२८)

(२) सरकारशी ही बोलणी सुरू असतानाच गांधीजींनी मुस्लिम लीगशी बोलणी सुरु केली. राजगोपालाचारी मसुद्याच्या आधारे सुप्रसिद्ध 'गांधी-जिना

वाटाघाटी' सप्टेंबरमध्ये सुरू झाल्या. वास्तविक हा मसुदा म्हणजे ४२ यध्ये राजगोपालाचारींनी सुचविलेल्या व त्यावेळी काँग्रेसने प्रचंड बहुमताने फेटाळलेल्या सूचनांचेच नवे स्वरूप होते.

(३) ऑगस्ट लढ्याबाबत गांधीजींनी स्वतःची भूमिका स्पष्ट केली. " सरकारने ताळतंत्र सोडले. त्यामुळे काही लोकांवर विपरित परिणाम झाला. घातपाती व तत्सम कृत्यांचा अवलंब करण्यात आला; व बऱ्याच गोष्टी काँग्रेसच्या व माझ्या नावाखाली करण्यात आल्या. " ९ ऑगस्ट १९४४ हा दिवस साजरा करण्याच्या प्रश्नावर मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणी त्या दिवसासाठी जारी होणाऱ्या खास पोलीस बंधनांकडे दुर्लक्ष न करण्याचा सल्ला त्यांनी जनतेला दिला. मुंबईलासुद्धा पोलिस बंदोबस्त विरोध नोंदविण्यापुरताच तोडण्यात यावा.

" जे भूमिगत आहेत त्यांनी बाहेर यावे. पोलिसांना न चुकविता व अधिकाऱ्यांना जाहीरपणे कळवून त्यांनी स्वतःचे कार्य करावे " असाही आदेश गांधीजींनी दिला. संपूर्ण देशभर अधिकाऱ्यांनी घालून दिलेले निर्बंध तोडण्यास मनाई करणारा पण प्रतिकाराचा झेंडा फक्त फडकत ठेवणारा हा कार्यक्रम होता.

गांधीजींचे वाटाघाटीचे हे प्रयत्न सुरू असतानाच सुभाषचंद्र बोस 'आझाद हिंद फौज' संघटित करीत होते. या दोन्ही पुढाऱ्यांनी चालविलेले धोरण परस्परविरोधी होते. एक 'छोडो भारत' चळवळीला मागे नेणारे; तर दुसरे देशातील बंडखोर शक्तींना परकीय फौजेची मदत देऊन 'छोडो भारत' चळवळ पुढे नेणारे होते.

तरीही एका अर्थी दोघांचेही कार्य परस्परपूरकच होते. गांधीजी माघार घेण्याचा मार्ग शोधत असले तरी प्रतिकाराचा झेंडा मात्र फडकवत ठेवीत होते. हे ९ ऑगस्टला मुंबईत लाक्षणिक कायदेभंग करण्याच्या त्यांनी दिलेल्या आदेशावरून स्पष्ट होते. म्हणूनच ऑक्टोबर १९४४ मध्ये गांधीजींच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी नेताजींनी रंगून येथील भाषणात गांधींचा 'आपले राष्ट्रपिता' म्हणून उल्लेख केला आणि ते पुढे म्हणाले — " भारतीय स्वातंत्र्याच्या या पवित्र लढ्यात आम्ही आपलीसदिच्छा व आशीर्वाद मागतो. " नेताजींचा कार्यक्रम व त्यांचे धारण यांवर गांधीजींनी अनुकूल वा प्रतिकूल अभिप्राय देण्याचे टाळले.

तथापि दोन्ही धोरणे आपापली नजीकची उद्दिष्टे गाठण्यात अयशस्वी ठरली. ब्रिटिश सरकारने उभ्या केलेल्या अडचणुकीच्या 'अभेद्य भिंतीपुढे' गांधीजींचे वाटाघाटीचे प्रयत्न फोल ठरले. भारताचे स्वातंत्र्य ताबडतोब जाहीर करून राष्ट्रीय सरकार स्थापन केल्यास युद्धकार्याला संपूर्ण सहकार्य देऊ या गांधीजींच्या सूचनेला हॉईसरॉयकडून पुढील उत्तर मिळाले — " तुम्ही सुचविलेले, मध्यवर्ती विधिमंडळाला जबाबदार असे सरकार स्थापण्यासाठी घटनादुरुस्ती व

करावी लागेल. सध्याच्या शत्रुत्वाच्या वातावरणात ते शक्य नाही." त्यांच्या मुस्लिम लीगशी चाललेल्या वाटाघाटीसुद्धा अयशस्वी ठरल्या. कारण जिनांनी राजाजींचा मसुदाच काय, गांधीजींच्या अटीदेखील " त्यांचा उद्देश मुस्लिम भारताची मागणी उडघून लावण्याचा आहे " या सबबीवर फेटाळून लावल्या.

ऑगस्ट १९४२ च्या धोरणापासून मागे जाण्याच्या गांधीजींच्या प्रयत्नाला ज्याप्रमाणे तात्पुरते अपयश आले त्याचप्रमाणे नेताजींच्या धोरणालाही आले. १९४४ मध्ये युरोपात उघडलेली दुसरी आघाडी, सोवियत लाल फौजांची जर्मनी-तील जोरदार मुसंडी आणि चीन व इतर आशियाई राष्ट्रांमधील लढवय्यांचा शौर्यशाली लढा यावरून अंतर्गत क्रांतिकारी चळवळीला परकीय जपानी फॅसिस्ट फौजांचे सहाय्य देण्याचे नेताजींचे धोरण फोल आहे हे स्पष्ट होत होते. आझाद हिंद फौज स्थापन झाल्यानंतर काहीच महिन्यांत ह्या फौजेला जपानी फौजेसमवेत ताज्या दमांच्या सुसंघटित अशा दोस्त राष्ट्रांच्या फौजेकडून शेवटी पराभव पत्करावा लागला. आझाद हिंद फौज नकाशावरून नामशेष झाली; मात्र तिचे वैशिष्ट्य आणि उद्दिष्ट यांमुळे तिने भारतीय जनतेत स्वाभिमान व देशप्रेम यांनी प्रेरित केले.

ह्या आंतरराष्ट्रीय घडामोडीचा दबाव अंतर्गत राजकीय परिस्थितीवर आला. दोस्तराष्ट्रांनी मारलेल्या जोरदार आघाडीमुळे काँग्रेस पुढाऱ्यांना बंदिस्त ठेवणे किंवा युद्धपरिस्थितीमुळे घटनादुरुस्तीचा प्रश्नच उदभवत नसल्याची भूमिका कायम ठेवणे सरकारला अशक्य झाले. अंतर्गत राजकीय पेचप्रसंग सोडविण्याच्या दिशेने नवा पवित्रा घेणे सरकारला आवश्यक झाले होते.

हे नवीन प्रयत्न जून १९४५ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांची सुटका करून सुरू करण्यात आले. यापाठोपाठ मध्यवर्ती कार्यकारी मंडळाची पुर्नघटना करण्यासाठी काही पर्याय सुचविण्यात आले.

" त्यायोगे ग. ज. व. सेनाप्रमुख वगळता इतर सर्व सभासद हे भारतीय राजकीय पुढारी राहू शकतील व त्यांत हिंदू-मुसलमानांना सारखेच प्रतिनिधित्व राहील. .... ही योजना पुढे नेण्याकरिता व्हॉईसरॉय हे राजकीय पुढारी, प्रांतीय मुख्यमंत्री व माझी मुख्यमंत्री यांची परिषद बोलावतील. त्यात नव्या कार्यकारी मंडळासाठी नेमता येतील अशा नावांची यादी मागविण्यात येईल. त्यातून ग. ज. नेमणुका करतील. " (प्र. ७, पृष्ठ ७)

तथापि ह्या प्रयत्नांना यश आले. कारण बॅ.जिनांनी मौ. आझाद व असफअली या दोन राष्ट्रीय मुसलमानांच्या मंत्रीमंडळांतील समावेशास हरकत घेतली. सर्वसाधारणपणे जातीयतेचा प्रश्न व विशेषत: हिंदू-मुस्लिम प्रश्न यांचा पुरेपूर उपयोग ब्रिटिश राज्यकर्ते राष्ट्रीय सरकार स्थापन न होऊ देण्यासाठी

करून घेत होते.

सरकारच्या धोरणाचे खरे स्वरूप जनतेपुढे तीव्रतेने स्पष्ट होत असल्यामुळे जनतेमध्ये संतापाची लाट उसळली. राष्ट्रीय सरकार स्थापण्यासाठी चाललेल्या वाटाघाटी अयशस्वी झाल्यानंतर पाठोपाठच आझाद हिंद फौजेच्या बंद्यांच्या सुटकेसाठी देशभर मोहीम सुरू झाली. १९४५ च्या उत्तरार्धात आझाद हिंद फौजेच्या बंद्यांचा बचाव हा साम्राज्यशाहीविरोधी नव्या लढ्याचे केन्द्रस्थान झाला होता. तेंडूलकर म्हणतात — "३० वर्षांपूर्वी त्यागलेल्या बॅरिस्टरच्या पोषाखात नेहरू कोर्टामध्ये उपस्थित होते. बचावाचे वकील भुलाभाई देसाई यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली आझाद हिंद फौजेने केलेल्या महान कार्याकडे देशाचे लक्ष वेधले. आझाद हिंद फौजेतील आरोपींच्या सुटकेसाठी राष्ट्राने मागणी केली व शेवटी ती पूर्णही करून घेतली. 'भारतीय जनतेच्या व राज्यकर्त्यांच्या मनोदेवतांमधील बलाबलाची ती कसोटी होती; व त्यात शेवटी जनता विजयी झाली; असे नेहरू म्हणाले." (प्र. ७, पृ. १७)

एकीकडे आझाद हिंद फौजेतील सैनिकांच्या प्रश्नाने साम्राज्यशाहीविरोधी लढ्याला उजाळा मिळत होता; तर दुसरीकडे ह्याच चळवळीचा दबाव ब्रिटिशांच्या हाताखालील फौजवर येत होता. १९४२ चा लढा दडपल्यामुळे किंवा आझाद हिंद फौजेचा पराभव झाल्यामुळे भारतीय जनतेच्या प्रतिकाराला कोणत्याही प्रकारे ओहोटी लागली नव्हती हे रॉयल इंडियन नेव्हीच्या बंडाने दर्शविले होते.

ह्या संपूर्ण परिस्थितीमुळे गांधीजी अस्वस्थ झाले होते. रॉयल इंडियन नेव्हीच्या बंडाच्या एक आठवडा आधी 'हरिजन' मध्ये त्यांनी लिहिले — "वातावरणात वैमनस्य आले आणि देशप्रेमाने उतावीळ झालेले देशभक्त संधी मिळाल्यास हिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करतील. आझाद हिंद फौजेच्या छायेची मोहिनी आपल्यावर पडली आहे. नेताजींचे नाव अभिमानास्पद आहे. त्यांची देशभक्ती कोणापेक्षाही काकणभर कमी नाही. याहून अधिक सहानुभूती मी त्यांना दाखवू शकत नाही. त्यांच्या कृतीचा शेवट अपशयात होणार हे मला माहीत होते. ते विजयी जरी झाले असते तरी मी हेच म्हटले असते; कारण त्यामुळे जनता कार्यप्रवण झाली नसती." (प्र. ७, पृ. ७६)

रॉयल इंडियन नेव्ही बंडावावत ते म्हणाले — "ह्या घटनामुळे मला 'दुःख झाले." ते पुढे असेही म्हणाले — "हे नौसेनेचे बंड व त्यानंतरच्या घटना कोणत्याही प्रकारे अहिंसात्मक नाहीत. नौसेनेतील भारतीयांना अहिंसात्मक मार्ग जर समजत असेल त्याविषयी जर आस्था असेल व अहिंसात्मक प्रतिकार जर सामुदायिक पातळीवर असेल तर तो मार्ग प्रतिष्ठित, पुरुषार्थाचा व संपूर्णतया

यशस्वी असा ठरेल ..... अशा प्रकारच्या कृतीला मी अहिंसात्मक असहकार म्हटले आहे. अशा प्रकारे (हिंसात्मक मार्गाने) ते भारतापुढे चुकीचा आदर्श ठेवीत आहेत." (प्र. ७, पृ. ७८)

साम्राज्यविरोधी चळवळीला आलेल्या या नव्या उधाणामुळे ब्रिटिश सरकारला हे कळून चुकले की जुन्या पद्धतीने राज्य करणे आता शक्य नाही. म्हणून पेचप्रसंग सोडविण्यासाठी त्यांनी नवा पवित्रा घेतला. तीन कॅबिनेट मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ भारतातील निरनिराळ्या पक्षांशी वाटाघाटी सुरू ठेवण्यासाठी पाठविण्यात आले.

एप्रिल आणि मे मध्ये त्यांनी प्रदीर्घ चर्चा केली व एक दीर्घमुदतीचा तसेच एक अल्पमुदतीचा असे दोन मसुदे त्यांनी सुचविले. नव्याने निवडलेल्या प्रांतीय विधिमंडळाद्वारे निवडण्यात आलेल्या घटनात्मक विधिमंडळाचा समावेश दीर्घ-मुदतीच्या मसुद्यात होता. अ, ब, क याप्रमाणे प्रांतांचे वर्गीकरण करून प्रत्येक गटाला संयुक्त राज्यापासून विभक्त होण्याचा अधिकार दिला जाणार होता. यामुळे मुस्लिम लीगची मागणी अंशतः पूर्ण होणार होती. अल्पमुदतीच्या मसुद्यात काँग्रेस, मुस्लिम लीग, इतर पक्ष व गट यांचे प्रतिनिधी असलेले हंगामी सरकार स्थापण्याची योजना होती.

प्रदीर्घ वाटाघाटींनंतर याच मसुद्याच्या आधारे १९४६ च्या उत्तरार्धात हंगामी सरकार स्थापन होऊन भारत व पाकिस्थान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली.

● ● ●

१२. १५ ऑगस्ट : जय की पराजय?

१९४७ मधील सत्तेचे हस्तांतरण हो इतिहासातील अद्वितीय घटना असल्याबद्दल काँग्रेस पुढारी डांगोरा पिटतात. अहिंसेच्या प्रणेत्याने घडवून आणलेली १९४७ ची रक्तविहीन भारतीय क्रांती ही जगाच्या इतिहासातील फ्रेंच, रशियन किंवा चिनी क्रांतीशी तुलना करू जाता अजोड ठरते कारण ती रक्ताचा थेंबही न सांडता झाली आहे असा काँग्रेसचा दावा आहे.

परंतु ह्या मताशी खुद्द महात्मा गांधी सहमत नव्हते. तेंडुलकर म्हणतात : "देशभर समारंभ होत होते. परंतु परकीय राज्यकर्त्यांपासून स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या या राष्ट्रपित्याने मात्र ह्या विजयोल्लासात भाग घेतला नाही. भारताच्या माहिती व नभोवाणी खात्याचे अधिकारी त्यांचा संदेश मागायला गेले असता ते म्हणाले — " मला शब्द स्फुरत नाहीत. " काहीच संदेश न दिल्यास वाईट दिसेल असे सांगण्यात आल्यानंतर देखील ते म्हणाले — " वाईट दिसत असले तरी मजजवळ काहीच संदेश नाही. " (प्र. ८, पृ. ९५)

२६ जानेवारी १९४८ ला म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवळजवळ ५ महिन्यांनी-त्यांच्या हत्येच्या चारच दिवस आधी – ते म्हणाले—

" २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपण लढा देत असताना हा दिवस साजरा करणे योग्य होते. पण आता स्वराज्यप्राप्तीनंतर राज्यकारभार हाती घेतल्यावर मात्र कोणाचा होवो न होवो; माझा मात्र संपूर्ण भ्रमनिरास झाला आहे. " (प्र. ८, पृ. ३३८)

ह्या नैराश्याचे मुख्य कारण म्हणजे ब्रिटिश सरकार, काँग्रेस, मुस्लिम लीग व इतर पक्ष यांच्या प्रतिनिधींची बोलणी सुरू असताना १९४६-४७ मध्ये देशभर उसळलेली जातीय प्रक्षोभाची लाट. भारताच्या राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासात असा प्रक्षोभ यापूर्वी कधीच झाला नव्हता. देशातील मुसलमान, हिंदू व शीख यांची परस्परांकडून इतकी निर्घृण कत्तल १५ ऑगस्टच्या आधी किंवा नंतर कधीही झाली नव्हती.

गांधीजी नेहमीच असा दावा करीत कीत्यांनी भारतीय जनतेकरिता आखलेला मार्ग हा परस्परद्वेषाचा नसून प्रेमाचा आहे. हा मार्ग भारतीय जनतेने स्वीकारला तरच ते अत्यंत निर्दय व हिंसक अशा ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे हृदयपरिवर्तन करू शकतील. परंतु जेथे या मार्गाने भारतीयांचेच हृदयपरिवर्तन घडून आले नाही तेथे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची तर गोष्टच नको.

ज्या घडामोडींचे पर्यवसान सत्तेच्या हस्तांतरणात झाले त्या घडामोडी म्हणजे आपण आयुष्यभर प्रसारित केलेल्या तत्वांचा विजय नसून पराजय होता,

हे 'प्रांजळपणे' मान्य करणारे काँग्रेसचे एकमेव पुढारी गांधीजीच ही त्यांची महानता होय.

१४ जुलैला ते म्हणाले — "गेल्या तीस वर्षात आपण जी चळवळ केली ती अहिंसात्मक प्रतिकाराची चळवळ नसून कमकुवत मनाच्या लोकांच्या मूक प्रतिकाराची ती चळवळ होती. अशा लोकांची सशस्त्र लढा देण्याची इच्छा तर असते; पण सशस्त्र प्रतिकाराचे सामर्थ्य मात्र नसते. म्हणूनच हा मूक प्रतिकार. विशालहृदयी जनताच करू शकेल. असा अहिंसात्मक प्रतिकार आपल्यास माहीत असता तर स्वतंत्र भारताचे संपूर्णपणे वेगळे चित्र आपण जगाला दाखवू शकलो असतो. ह्याउलट आज भारताचे दोन तुकडे झाले आहेत. एक भाग दुस-याकडे अत्यंत संशयाने पाहात आहेत. दोघेही आपसातल्या भांडणात इतके गुंतले आहेत की लाखो भुकेकंगाल लोकांच्या अन्न व वस्त्र या प्रश्नांविषयी ते विचारच करू शकत नाहीत. या जनतेला जीवनावश्यक वस्तूच परमेश्वररूपी भासत आहेत...." (प्र. ७, पृ. ५७)

गांधीजींच्या दृष्टीने पाहू जाता, आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत व शक्तीच्या शेवटच्या कणापर्यंत त्यांनी जातीयतेच्या भुताविरुद्ध लढा दिला. यातच गांधीजींचे मोठेपण दिसून येते. मुस्लिम लीगने १६ ऑगस्ट १९४६ हा 'प्रत्यक्ष कृतीचा दिवस' जाहीर केल्यावर त्या दिवशी कलकत्त्यात जी जातीय दंगल उसळली तिच्यापासून त्यांनी जातीय सलोखा निर्माण करण्याच्या कार्याला स्वतःस वाहून घेतले. शहरातील दंगे खेड्यात पसरू लागताच, एकतेचा संदेश पसरविण्यासाठी त्यांनी इतर कार्य बंद केले. यासाठीच बंगालच्या नौखाली जिल्ह्यातल्या खेड्योपाडी कित्येक आठवडे त्यांनी खर्च केले होते. पुन्हा ह्या कार्यासाठीच त्यांनी बिहारमध्ये जाण्यासाठी नौखाली सोडले. पंजाबात जाण्याची त्यांची इच्छा असूनही त्यांना कलकत्ता व दिल्ली येथे जावे लागले. जातीय प्रक्षोभाविरुद्ध लढणे, दंगलग्रस्तांना संरक्षण देणे, निर्वासितांना दिलासा देणे हे त्यांच्या प्रार्थनोत्तर भाषणांचे विषय झाले होते.

तथापि त्यांच्या संदेशाचा प्रभाव आता पूर्वीसारखा राहिला नव्हता. निव्वळ त्यांच्या उपस्थितीमुळे किंवा त्यांनी उपोषण सुरू केल्यामुळेही पूर्वी निरनिराळ्या जातीचे लोक एकत्र येत असत व जातीय तणाव निवळण्यास त्याची मदत होत असे. आतादेखील त्यांची नौखालीमधील उपस्थिती व नंतर बिहार, कलकत्ता व दिल्ली येथील उपस्थिती यांमुळे काही प्रमाणात किंवा काही काळ तरी दंगे थांबविण्यास मदत झाली. पण सर्व शक्ती ह्या विशिष्ट कार्याकरिता लावल्याव सुद्धा ते ज्या भागात कार्य करीत होते त्या भागातील परिस्थितीतदेखील म्हणण्यासारखा बदल झाला नाही ; मग दूरच्या भागांची तर गोष्टच नको.

परिस्थिती इतकी गंभीर झाली की भारत व पाकिस्थान या देशांमध्ये युद्ध होण्याची शक्यता असल्याबद्दल गांधीजींनी जनतेचे लक्ष वेधले. त्यामुळे साहजिकच देशामध्ये खळबळ माजली. काही लोकांनी तर अशा युद्धाला गांधीजींचा पाठिंबा राहील असे देखील सूचित केले. त्यामुळे युद्धाच्या शक्यतेचा उल्लेख आपल्याला कोणत्या परिस्थितीत करावा लागला हे सांगणे त्यांना भाग पडले.

"दोन्ही देशांमधील सद्यपरिस्थिती पाहून व या दोन देशांत युद्ध भडकण्याचे नेमके काय कारण असू शकेल याकडे निर्देश करुन मी दोन्ही राष्ट्रांची सेवा केली आहे. ही सेवा मी युद्ध भडकविण्यासाठी केली नसून शक्योतोवर ते टाळण्यासाठीच केली आहे. लोकांनी मूर्खपणाने केलेले खून व लुटमार चालूच राहिली तर त्यातूनच युद्ध निर्माण होईल हे निदर्शनास आणण्याचाही प्रयत्न मी केला. एका-पाठोपाठ एक अपरिहार्यपणे घडणाऱ्या घटना लोकांच्या लक्षात आणून देणे गैर आहे काय ?" (प्र. ८, पृ. १६९)

दोन जमातींमध्ये सलोखा घडवून आणण्याचा जो कोणी प्रयत्न करील तो दोन्ही जमातींमधील उग्रवाद्यांच्या रोषास पात्र होईल इतक्या विकोपास या दोन जमातींमधील संबंध गेले आहेत याची देखील गांधीजींना कल्पना होती. जातीय प्रक्षोभाविरुद्ध लढतांना आपण स्वत:चा जीव फार मोठ्या धोक्यात घालत आहोत याची गांधीजींना जाणीव होती. २८ जानेवारीला राजकुमारी अमृतकौर यांच्याशी बोलतांना 'एखाद्या माथेफिरुच्या गोळीला बळी पडण्याच्या' शक्यतेचा त्यांनी केलेला उल्लेख आणि तसे घडले 'तर मी हसतहसत मरेन' हे त्यांनी दिलेले आश्वासन आठवा. 'माझ्या मनात एवढासाही द्वेष त्यावेळी नसावा; परमेश्वर माझ्या ओठांवर आणि हृदयात असावा' या शब्दांभोवती पुढे दोन दिवसांनी जे घडले त्यामुळे दु:खाचे एक वलय आता निर्माण झालेले आहे.

१५ ऑगस्टच्या विजयोल्लासात भाग न घेण्याला या दु:खदायी घटना कारणीभूत असल्या तरी काँग्रेसच्या अंतर्गत घडामोडी सुद्धा तितक्याच कारणीभूत होत्या. काँग्रेस संघटनेच्या मार्फत वैयक्तिक स्वार्थ साधण्याच्या काँग्रेस सभासदांच्या प्रकृतीबद्दल गांधीजींना खंत वाटत होती. उदाहरणार्थ, जुलै १९४६ मध्ये 'एक दु:खकारक घटना' या मथळ्याखाली त्यांनी खालील टीप लिहिली —

"घटना समितीत राहाण्याची इच्छा असल्याबद्दल अनेक सभासदांची पत्रे मला आलीत. ही पत्रे जर सार्वत्रिक भावनेची द्योतक असतील तर भारतातील बुद्धिजीवी वर्ग हा स्वातंत्र्यापेक्षा वैयक्तिक स्वार्थ साधण्यातच गुरफटला आहे की काय अशी भीतीयुक्त शंका मला ग्रासते." (प्र. ७, पृ. १८६)

तथापि हा रोग इतका वाढला आणि चिंताजनक झाला की गांधींच्या अनेक वार्ताहरांनी त्यांचे लक्ष त्याकडे वेधले. या परिस्थितीबरोबरच स्फोटक जातीय

परिस्थितीमुळे गांधीजींना जानेवारी १९४८ मध्ये त्यांचे शेवटचे उपोषण सुरू करणे भाग पडले. १२ जानेवारीला प्रार्थनेनंतरच्या भाषणात त्यांनी जाहीर केले की १३ तारखेपासून ते उपोषण सुरू करणार आहेत. ह्यावेळी त्यांनी आंध्रचे सुप्रसिद्ध पुढारी दे. भ. कोंडा वेंकटप्पय्या यांच्या पत्राचा उल्लेख केला — ' गुंतागुंतीच्या राजकीय व आर्थिक प्रश्नांव्यतिरिक्त, काँग्रेस गोटातील व्यक्तींच्या नैतिक अधःपतनाचा प्रश्न फार विकट होत आहे. इतर प्रांतांबद्दल मी सांगू शकत नाही; परंतु माझ्या प्रांतातील परिस्थिती मात्र शोचनीय आहे. राजकीय सत्ता उपभोगल्यामुळे त्यांची माथी फिरली आहेत. काँग्रेस वर्तुळातील गटबाजी, असंख्य आमदारांच्या पैसे कमावण्याच्या कारवाया आणि मंत्र्यांचा कमकुवतपणा यामुळे जनसामान्यांमध्ये बंडांची भावना धुमसत आहे. ह्यापेक्षा ब्रिटिश राज्य फार चांगले होते; असे लोक म्हणू लागले आहेत व काँग्रेसला शिव्याशाप देऊ लागले आहेत. " (प्र. ८, पृ. ३०२)

बरे; गटबाजी व सत्तासंघर्ष यांना प्रांतीय व जिल्हा काँग्रेस समित्यांमध्ये ऊत आला होता तरी केन्द्रीय नेतृत्वात तो अजिबात नव्हताच असे नाही. नोव्हेंबर १९४७ मध्ये अ. भा. नेतृत्वात एक अल्पसा संघर्ष उडाला.

" अगदी पहिल्याच दिवशी गांधीजींच्या उपस्थितीत आपण आपल्या जागेचा राजीनामा देत आहोत ' असे काँग्रेसाध्यक्ष कृपलानी यांनी महासमितीला सांगीतले. सरकारने त्यांचा सल्ला घेतला नव्हता किंवा त्यांना पूर्ण विश्वासातही घेतले नव्हते. ' सरकारने काँग्रेस पक्षाची उपेक्षा केली असल्यामुळे आपला राजीनामा गांधीजींना समयोचित वाटतो ' असे कृपलानींनी जाहीर केले. नेहरु व पटेल हे सरकारचे अध्वर्यु होते. काँग्रेस यंत्रणेवरील त्यांची पकड निर्विवाद होती. पक्षाच्या धोरणाबरहुकूम ते चालत होते. मग त्यांनी आपल्या अधिकारांवरील काँग्रेसअध्यक्षांचा लगाम का मान्य करावा ? " (प्र. ८, पृ. २३३)

कृपालानीचा राजीनामा मंजूर करून व त्या जागी राजेंद्रप्रसादांची निवड करुन हा पेचप्रसंग सोडविण्यात आला. तरी सरदार पटेल व नेहरु यांच्यातील संबंध अधिकच बिघडले. तेंडूलकर म्हणतात — ' सरदार आणि पंडित नेहरू यांच्यातील संघर्षाची गांधीजींना कल्पना होती; आणि त्याची त्यांना काळजीही वाटत होती. पण ते एकत्र असावेत असेही त्यांना वाटत होते. ह्याच संदर्भात ३० जानेवारीला दुपारी ४ वाजता म्हणजे त्यांची हत्या होण्याच्या एकच तास अगोदर त्यांनी सरदारांशी विचारविनिमय केला होता. पुन्हा ह्याच संदर्भात नेहरु व आझाद हे त्यांना सायंप्रार्थनेनंतर भेटणार होते. '

ह्या अंतर्गत घडामोडीमुळे काँग्रेसच्या भवितव्याविषयी गंभीरपणे विचार करणे गांधीजींना भाग पडले. त्यांच्या उपोषणकालात काँग्रेस पुनर्घटित करण्यासाठी

त्यांनी तयार केलेल्या घटनेनुसार– " प्रचाराचे साधन व विधिमंडळ यंत्रणा म्हणून आजच्या स्वरूपातील काँग्रेस टाकाऊ झाली आहे. भारतातील शहरांपेक्षा खरे म्हणजे सात लाख खेड्यांमधील जनतेसाठी सामाजिक, नैतिक आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचे आहे. लोकशाहीच्या उद्दिष्टाकडे भारताची वाटचाल होत असताना मुलकी अधिकारांचे सैनिक अधिकारांवर वर्चस्व प्रस्थापित होण्यासाठी संघर्ष होणार हे निश्चितच. राजकीय पक्ष व जातीय संस्था यांच्याशी होणाऱ्या अनुचित चढाओढीपासून काँग्रेसला अलिप्त ठेवले पाहीजे. ह्या व अशाच इतरही कारणांमुळे सध्याची काँग्रेस संघटना बरखास्त करून लोकसेवक संघ स्थापण्याचे महासमितीने ठरविले आहे. ह्या संघाचे नियम खालीलप्रमाणे राहातील; परंतु प्रसंगानुरूप त्यांच्यात बदल करण्याचा अधिकार महासमितीला राहील " (प्र. ८, पृ. ३४२)

त्यांचे सर्व अनुयायी संपूर्ण स्वराज्य मिळाल्याबद्दल आनंदोत्सव करीत असताना गांधीजी मात्र नवीन स्थापन झालेल्या भारतवर्षाबद्दल आनंद मानण्या• ऐवजी त्याच्या अस्थिर ते विषयी चिंता करीत होते; हे गांधींजींचे वैशिष्ट्य होय. काँग्रेसचे इतर पुढारी जेव्हा राष्ट्रीय चळवळीचा विजय म्हणून सत्तेच्या हस्तांतरणाच्या नावे जयघोष करीत होते तेव्हा गांधीजी मात्र भारताच्या राजकीय अस्थिरतेस कारणीभूत होणाऱ्या दोन मुख्य प्रवाहांकडे जनतेचे लक्ष वेधणे हे आपले कार्य मानीत होते. हे प्रवाह म्हणजे (१) हिंदू-मुसलमान यांच्यातील बिघडलेले संबंध (ज्याचा परिणाम नवनिर्मित भारत व पाकिस्थान यांच्यात तणाव निर्माण करण्यात झाला)

व (२) काँग्रेस संघटनेची खालावलेली पातळी व तिचा ऱ्हास.

ह्यामुळे काँग्रेसच्या इतर पुढाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर ते वैशिष्ट्यपूर्ण ठरतात• जनतेची नाडी ओळखू शकल्यामुळे, हिंदू-मुस्लिम संबंधात मूलभूत बदल न झाल्यास आणि काँग्रेसमधील अंतर्गत संघटन न सुधारल्यास भारताचे राज्य गड-गडेल ही भयप्रद वस्तुस्थिती त्यांना दिसू शकली.

गांधीजींना वैयक्तिक स्वार्थ साधावयाचा नव्हता. ते सबंध भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करीत होते; भांडवलदारांच्या एखाद्या गटाचे नव्हे. त्यामुळे कोणत्याही प्रश्नाकडे ते एखाद्या भांडवलदार गटाच्या किंवा वैयक्तिक अशा संकुचित दृष्टिने न पाहता दूरदृष्टिने पाहात असत. अस्थिरतेची पाळेमुळे स्पष्ट करूनच ते थांबले नाहीत; केवळ तर ती खणून काढण्याचेही सर्वतोपरी प्रयत्न त्यांनी केले. यातच भारतीय भांडवलदार वर्गाचे तात्विक व राजकीय पुढारी म्हणून गांधीजींची महानता व्यक्त होते.

अस्थिरतेच्या मुळाशी असलेल्या दोन कारणांकडे बोट दाखविणे व ही मूळ कारणे राज्यनिर्मितीच्या वेळीच नेमकी का उद्भवली हे स्पष्ट करणे गांधीजींना शक्य झाले. तथापि, तीन दशके शांततासंदेशाचा प्रचार करूनही; आयुष्याच्या अखेरीस भारतीय जनता ही दोन परस्परांविरुद्ध लढणाऱ्या गटांत इतकी विभागली गेली की धर्मावर आधारित अशी दोन परस्परविरोधी राज्ये निर्माण झाली व आपल्या राजकीय उद्दिष्टांचा मात्र पराभव झाला हे पाहाण्याचे दुर्भाग्य त्यांच्या नशिबी आले. या दुर्भाग्याचे संयुक्तिक कारण मात्र गांधीजी देऊ शकले नाहीत, हे विशेष. त्यांच्या नेतृत्वाखाली ज्या जनतेने राष्ट्राकरिता अतुलनीय त्याग केला तीच जनता स्वार्थाकरिता व सत्तेकरिता आपसात का भांडू लागली याचेही पटण्यासारखे कारण गांधीजी देऊ शकले नाहीत.

ज्या मनुष्याच्या नैतिक पुनरुज्जीवनासाठी त्यांनी अहिंसात्मक प्रतिकाराचे तंत्र व मंत्र विकसित केले तो मनुष्यच ठार वेडा झाला आहे; एवढे एकमात्र कारण या दुःखद घडामोडींसाठी ते देऊ शकले. सतत तीन दशके प्रेमाच्या व अहिंसात्मक असहकाराच्या आपल्या संदेशाचा प्रचार केल्यावर मूर्ख मानवाचे विचारी मानवात रूपान्तर झालेले दिसण्याऐवजी नेमके विपरित का घडले ? — या प्रश्नापुढे ते इतके दिङ्मूढ झाले की परमेश्वरावर विश्वास ठेवण्यापलीकडे ते काहीही करू शकले नाहीत.

जातीयतेच्या अपप्रवृत्तींविरुद्ध व्यक्तिशः जरी ते शौर्यशाली लढा देत असले तरी त्यांचा आत्मविश्वास ढळला होता; आयुष्यातला आनंद ओसरला होता; व जगण्याची इच्छा राहिली नव्हती. १९४७ मधील त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी एका वार्ताहराला उत्तर देताना ते म्हणाले — " स्वतःला हिंदू किंवा मुस्लिम म्हणवून घेण्याचे धाडस करणाऱ्या, रानटी झालेल्या मनुष्याकडून होत असलेले हत्याकांड अगतिकतेने पाहाण्यास जीवंत ठेवण्यापेक्षा; हे सर्वशक्तिमान परमेश्वरा! मला ' या शोकसागरापासून ' दूर घेऊन जा. " (प्र. ७, पृ. १७६)


गांधीजींच्या महानतेची मर्यादा यातच दडलेली आहे. त्यांची दृष्टी भांडवलदारवर्गाच्या जगाकडे पाहाण्याच्या दृष्टिकोनाने मारावलेली असल्यामुळ जातीय संबंधांमधील तणाव आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी व नंतर झालेले काँग्रेसचे अधःपतन या बाबी अपघाती नव्हत्या हे त्यांना समजू शकले नाही- या घटना म्हणजे सामाजिक विकासाच्या काही निश्चित नियमांचा परिपाकच होत; हे त्यांना समजले असते तर हिंदू-मुस्लिम संघर्ष हे हिंदू किंवा मुस्लिम जनतेत मूलतःच काही दोष असल्यामुळे उद्भवले नसून काही निश्चित सामाजिक प्रवाह त्यांना परस्परांविरुद्ध भडकवीत असल्यामुळे उद्भवलेले आहेत. हे त्यांना कळले असते. मग त्यांनी हिंदू-मुस्लिम संघर्ष घडविणाऱ्या त्या शक्तींशी लढा दिला असता.

जातीय संघर्ष घडविणाऱ्या अशा या सामाजिक शक्तींचे काही ज्ञान नसल्यामुळे जातीय दंग्यापेक्षाही प्रतिगामी शक्तींविरूद्ध होत असलेल्या एकजुटींच्या लढचाला गांधीजी भीत होते. उदाहरणादाखल, रॉयल इंडियन नेव्हिच्या बंडाच्या प्रसंगी दृग्गोचर झालेल्या एकजुटीची त्यांनी जी धास्ती घेतली तिच्याकडे बोट दाखविता येईल. ते म्हणतात —

" नौसेनेतील बंड व त्यानंतरच्या घटना या कोणत्याही अर्थाने अहिंसात्मक नाहीत ..... हिंदू-मुस्लिम व इतर यांच्यातील हिंसात्मक उद्दिष्टांची आघाडी अपवित्र आहे. भारताकरिता व जगाकरिता विनाशकारक ठरणाऱ्या हिंसेत त्याची परिणती होईल; किंबहुना परस्परामधील हिंसेची ही तयारीच होत आहे. घटना बनविण्याच्या आघाडीवर हिंदू-मुस्लिम ऐक्य घडवून आणण्याऐवजी लढचाच्या आघाडींवर एकजूट घडविणे हे श्रेयस्कर आहे; असे अरुणाचे (असफअली) म्हणणे आहे ' ..... " (प्र. ७, पृ. ७८)

काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अधःपतनाचे कारण न कळू शकण्याला देखील हीच गोष्ट लागू पडते. वर्गलढचाच्या सिद्धांतावर ते आग पाखडत; आणि जमीनदार-मांडवलदार वर्गांतील व्यक्तींसहीत सर्वच्या सर्व मानवसमूहाचे परिवर्तन होऊ शकेल असा ते दावा करीत. त्यामुळेच, काँग्रेसच्या नेतृत्वात बहुसंख्येने असलेले उच्च व मध्यमवर्गीय पुढारी हे सत्ता हस्तगत करण्याच्या संघर्षात स्वार्थत्याग करतानाही ज्याप्रमाणे आपसात भांडत; त्याचप्रमाणे सत्ताप्राप्तीनंतरही ते स्वार्थ साधण्यासाठी भांडतील असे त्यांना वाटले नाही. तोवर स्वार्थत्यागी असलेल्या स्त्रीपुरूषांचे निर्लज्ज अशा स्वार्थी लोकांमध्ये परिवर्तन होण्याचे हे कारण त्यांना कळू न शकल्यामुळे काँग्रेसमधील अधःपतनाचे स्पष्टीकरण ते देऊ शकले नाहीत; व दिसत असूनही या अधःपतनाला ते बांध घालू शकले नाहीत, परिणामतः व्यक्तीचा सारभूत चांगुलपणा गृहीत धरुन सार्वजनिक कार्याची सुरूवात करणाऱ्या ह्या व्यक्तीला सरतेशेवटी माणूस वेडा झाला असून त्याचे अधःपतन झाले आहे या तात्विक धारणेला शरण जावे लागले.

लाखो भारतीयांचे आत्मे स्वातंत्र्य मिळविल्याच्या हर्षोल्लासाने उचंबळून आलेले असतानाचा नेमका हाच प्रसंग निवडून गांधीजींनी आपले जीवितकार्य अयशस्वी झाले असे विचार व्यक्त केले हे इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण असे सत्य आहे. मांडवलदारवर्गाचे राजकीय डावपेच व तंत्र म्हणून ब्रिटिशविरोधी लढचात यशस्वी ठरलेला गांधीवाद हा नवीन सामाजिक तत्वज्ञान व मानवाच्या पुनरुज्जीवनाचा नवा मार्ग म्हणून पूर्णपणे अयशस्वी ठरला या वस्तुस्थितीची पाहून अधिक योग्य व सयुक्तिक मीमांसा देता येणार नाही.



१३. गांधीवादाचा अन्वयार्थ !

महात्मा गांधींच्या आयुष्याचे आणि त्यांच्यां शिकवणुकीचे वैशिष्टय कोणते ? ' माझे सत्याचे प्रयोग ' ह्या नावाने त्यांनी १९२० मध्ये लिहिलेले आत्मवृत्त हीच त्यांच्या आयुष्याची कहाणी आहे काय ?

मोहनदास गांधींचा 'महात्मा' म्हणून झालेला उत्कर्ष; पहिल्या महायुद्धातील या निष्ठावंत सैनिकाचे १९४२ मध्ये ' ब्रिटिश राज्यकर्त्यांनो चालते व्हा ' ही घोषणा देणाऱ्या ' करा किंवा मरा ' या चळवळीच्या पुढाऱ्यात झालेले रूपांतर; पोरबंदर संस्थानच्या सरंजामशाही राज्यकर्त्यांशी एकनिष्ट असलेल्या घराण्यातील या बालकाचे भारतीय संस्थानातील जनतेला लोकशाही मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या पुढाऱ्यात झालेले रूपान्तर; किंवा जहाल चळवळीकडे आकृष्ट न होता लंडनमधील ' शाकाहारी मंडळात ' सामील होणाऱ्या धार्मिक वृतीच्या या तरूणाचे साम्राज्यशाहीविरोधी व लोकशाही प्रवर्तक चळवळीच्या असामान्य पुढाऱ्यात झालेले रूपांतर — या सर्वांचे रहस्य कोणते ?

मागील पानांमध्ये रेखाटलेली महात्मा गांधींच्या आयुष्याची कहाणी हातावेगळी करताना वरील प्रश्न साहजिकच आपल्या मनात उद्भवतात. हे प्रश्न कल्पित स्वरूपाचे नाहीत; तर आपल्या देशातील प्रत्येक लोकशाहीवादी व्यक्तीला कार्य करताना ज्या परिस्थितीशी सामना द्यावा लागेल त्या परिस्थितीशी ते निगडित आहेत. कारण महात्मा गांधी आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार मात्र आपल्या लोकशाहीवादी चळवळीतील अनेक गटांना व व्यक्तींना आजही मार्गदर्शक ठरत आहेत.

उदाहरणार्थ भूदान चळवळ हीं निःसंशय गांधीजींच्या विचारांवर आधारलेली आहे. या चळवळीमागचा सिद्धान्त व तिचे तंत्र यांविषयी आपले मतभेद असू शकतील. पण आपण तिच्याकडे कधीही दुर्लक्ष करु शकणार नाही. प्रचलित जमीनदारी पद्धतीविरुद्ध बंड आणि जमिनीचे गैरवाटप बदलण्यासाठी केवळ अहिंसात्मक मार्गाचा वापर या भूदान चळवळीतील दोन बाबी म्हणजे जमीनवाटपासारखा अत्यंत महत्वाचा सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी गांधीजींच्या शिकवणुकीनुसार अनुसरलेले मार्गच होत.

गांधीजींच्या शिकवणुकीने प्रभावित झाल्यामुळेच आजचे कित्येक गांधीवादी (विनोबासुद्धा) हे शांतता चळवळीशी या ना त्या तऱ्हेने संलग्न झाले आहेत हे विसरता कामा नये.

ह्याउलट; केन्द्र व राज्य सरकार या दोहोंचे विद्यमान पुढारी हे कामगारवर्ग व शेतकरी वर्ग यांच्या वाढत्या जनआंदोलनांची ' सामूहिक हिंसाचार ' अशी

संभावना करून त्यांवर हल्ले चढवीत आहेत ते देखील गांधीजींच्या शिकवणुकीच्याच नावाखाली हे देखील विसरता कामा नये.

काँग्रेसमधील प्रत्येक गट व पंथ आणि कम्युनिस्ट बगळता बहुतेक सर्व पक्ष आपल्या धोरणाचे समर्थन करताना गांधीजींच्या नावाचा उपयोग करतात. राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासात गांधीजींनी केलेल्या कार्याच्या महत्तेचे हे मोजमाप आहे. लोकशाही चळवळीच्या पुढील वाटचालीच्या दृष्टीने गांधीजींचे आयुष्य व त्यांची शिकवण यांचे स्थान आणि महत्व जाणण्याचे गंभीर प्रयत्न करणे हे अत्यंत महत्वाचे मानले पाहिजे.

हे काम सोपे नाही. गांधीजींचे व्यक्तिमत्व हे इतर अनेक ऐतिहासिक व्यक्तींइतकेच जटिल होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन कोणत्याही साध्यासुध्या शब्दांनी करता येणार नाही. " राष्ट्रीय आंदोलनाला प्रेरणा देऊन साम्राज्यशाही-विरोधी संघर्ष उभारणारे; " किंवा " आमच्या राष्ट्रीय चळवळीला क्रांतिकारक-स्वरूप प्राप्त होऊ नये असा प्रयत्न करणारे प्रतिक्रांतिवादी " — किंवा असेच कोणतेही अतिसुलभ स्पष्टीकरण देऊन त्यांच्या शिकवणुकीचे विवेचन करणे शक्य नाही.

घटनांनी त्यांचे आयुष्य इतकें ओतप्रत भरले होते; त्यांची भाषणे व त्यांचे लिखाण इतके प्रगल्भ आणि मानवी कार्याच्या अनेकविध पैलूंशी संलग्न होते; आणि कित्येक प्रसंगी त्यांची वागणुक इतकी नाटचमय होती की त्यांच्या आयुष्याच्या व शिकवणुकीच्या कोणाही अभ्यासकाला गांधी व गांधीवाद या-विषयीचा आपला स्वतःचा आवडता सिद्धान्त सिद्ध करणे सोपे जावे. त्यासाठी फक्त त्यांच्या आयुष्यातील निवडक प्रसंग एकत्र गुंफावे लागतील. आणि त्यांची भाषणे व लिखाण यांतील निवडक भाग एकत्र करावे लागतील. तथापि; इतिहास-दृष्ट्या खरेखुरे महत्वाचे प्रसंग निवडणे; त्यांचे आयुष्य व त्यांची शिकवणूक यांच्या विविध पैलूंमध्ये तर्कसंगती लावणे आणि त्यांचे आयुष्य व कार्य यांविषयी संयुक्तिक निर्णयाप्रत येणे हे फारच कठीण आहे.

दुर्दैवाने आजवर केले गेलेले विवेचन हे अतिसुलभ व एकतर्फी गौरवपर लेख या स्वरुपाचे तरी आहे किंवा तितकीच अतिसुलभ व एकतर्फी टीका या स्वरूपाचे तरी. म्हणून हे दोन्ही प्रकार टाळण्याचा पूर्ण प्रयत्न केला पाहिजे. अशा प्रयत्नांना हातभार लावण्याच्या दृष्टीने त्यांच्या आयुष्याच्या प्रवाहातून निघणारे निष्कर्ष प्रस्तुत लेखक खालीलप्रमाणे देत आहे

(१) गांधीजी आदर्शवादी होते सर्वप्रथम लक्षात घेणे आश्यक आहे. त्यांचा दृष्टिकोन भौतिकवादी तत्वज्ञानाच्या विरूद्ध होता; केवळ एवढ्याच अर्थाने ते आदर्शवादी होते असे नसून त्यांनी स्वतःसमोर काही आदर्श ठेवले होते आणि

आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत या आदर्शांना ते चिकटून राहिले होते. सत्य, अहिंसा, सुखासीनतेचा त्याग इत्यादि नैतिक मूल्ये; स्वातंत्र्य, लोकशाही, शांतता इ. राजकीय आदर्श; जातीयता निर्मूलन, स्त्रीदास्यविमोचन, जातिधर्मातीत एकात्मता इ. सामाजिक उद्दिष्टे हा त्यांच्या आयुष्याचा व शिकवणुकीचा अविभाज्य भाग होता. काही आदर्शांना चिकटून असल्यामुळेच आयुष्याच्या पूर्वार्धात द. अफ्रिकेतील सत्याग्रहात उडी घेणे त्यांना भाग पडले. ह्यामुळेच राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता असहकार व इतर चळवळीची त्यांनी आखणी केली; ह्यामुळेच अनेक लोकशाही उद्दिष्टांचे ते अग्रणी ठरले आणि शेवटी राष्ट्रीय एकात्मतेच्या महान ध्येयासाठी त्यांनी हौतात्म्यही पत्करले.

(२) तोवर अंधारात चाचपडणाऱ्या लाखो गोरगरीबांना जागृत करण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे. जनतेशी बोलताना त्यांनी वापरलेली आवरणाची भाषा, त्यांचा जीवनमार्गाचा साधेपणा आणि जनतेच्या मागण्यांकरिता लढताना त्यांनी दाखविलेली जिद्द या सर्व कारणांमुळे त्यांनी लाखो खेडूत गरिबांना आकृष्ट केले. आपल्याला दुर्दशेतून वर काढणारा परमेश्वराचा नवा अवतार म्हणूनच गरीब जनता त्यांच्याकडे पाहात होती.

कित्येक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्नांवरील त्यांचे विचार 'प्रतिगामी' ठरु शकतील; (त्यांतील काही निःसंशयच प्रतिगामी आहेत.) तथापि ह्याच प्रतिगामी विचारांमुळे शेतकरीवर्ग व आधुनिक राष्ट्रीय लोकशाही चळवळीचे प्रगल्भ प्रतिनिधी-नेते यांच्यात मेळ बसविणे त्यांना शक्य झाले हे विसरता कामा नये. गांधीजींच्या प्रतिगामी विचारांनी खेडथातील गरीब जनतेला राष्ट्रीय लोकशाहीचळवळींत ओढले; हे विधान वरकरणी चूक वाटेल; परंतु हा विरोधाभास भारतीय राजकारणाच्या परिस्थितीशी निगडितच होता. राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व मांडवलशाही राहूनही सामंतशाही निगडितच राहिले या वस्तुस्थितीवरुन ते उघड होते.

(३) आपल्या राष्ट्रीय चळवळीत ग्रामीण गरिबांना ओढण्यात त्यांनी महत्वाचा वाटा उचलला असला तरीही पहिल्या महायुद्धानंतरच्या वर्षात त्यांच्यात दिसून आलेल्या जागृतीचे श्रेय व्यक्तिशः गांधीजींना देणे चूक होईल. कारण ही जागृती केवळ भारतातील घडामोडींमुळे झालेली नसून एकूणच जागतिक पातळी-वरील एतिहासिक घडामोडींचा तो परिपाक होता. भारतीय शेतकऱ्यांची हळूहळू खालावत गेलेली व यहायुद्धकाळात व त्यानंतर पराकोटीस गेलेली आर्थिक परिस्थिती; व त्यातच भारतीय राष्ट्रीय चळवळीतील जहाल गटाची झालेली वाढ याचा शेतकऱ्यांवरही परिणाम झाला होता. शिवाय तुर्की, चिनी व सर्वात महत्वाचे म्हणजे रशियन क्रांती यासारख्या आंतरराष्ट्रीय घडामोडींचा संबंध

आशियाई जनतेच्या मनावर पडलेला प्रभाव हे देखील भारतीय जनतेतील जागृतीचे कारण होते. गांधीजी या राजकीय रंगमंचावर आले नसते तरी देखील हे घडलेच असते--कदाचित वेगळ्या स्वरूपात.

हे विधान करीत असताना, भारतीय शेतकऱ्यात आलेल्या जागृतीला विशिष्ट वळण लावण्यात व या नव्या उत्साहाला स्वातंत्र्य व लोकशाही चळवळीशी निगडित करण्यात त्यांनी उचललेला वाटा नाकारण्याचा हेतू नाही. खेड्यातील गरिबांना चळवळीत ओढण्याचे आणि राष्ट्रीय लोकशाही चळवळ अधिक बळकट बनविण्याचे श्रेय गांधीजींना देऊनही; जनजागृती ही केवळ त्यांच्यामुळेच आली हे म्हणणे देखील एकतर्फीच होईल.

(४) राष्ट्रीय लोकशाही चळवळीत असलेल्या मुख्य उणीवा दूर करण्यासाठी गांधीजींनी केलेल्या कार्याबद्दल ते गौरवास पात्र आहेत. ही चळवळ खऱ्या अर्थाने राष्ट्रीय व सर्ववर्गीय बनविण्यासाठी त्यांनी तोवर असंघटित अशा ग्रामीण गरिबांना संघटित केले. परंतु ग्रामीण गरिबांची संघटना ही एक स्वतंत्र शक्ती म्हणून उभी राहील अशी भीती त्यांना वाटत होती व मरेपर्यंत वाटत राहिली हे विसरुन चालणार नाही. गरीब जनतेला स्वातंत्र्य व लोकशाही लढ्याकरिता संघटित करण्याचे ते समर्थक असले तरी आपल्या म्हणजे मांडवलदार-वर्गांच्या नेतृत्वाखालीच त्यांनी कार्य करावे असा त्यांचा आग्रह होता.

चौरीचौऱ्यानंतरच्या काळात स्वातंत्र्य व लोकशाही लढ्यातही भांडवलदार-वर्गाला सोयीस्कर एवढ्याच अंतरावर शेतकरी राहातील अशा प्रकारचे उपाय त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक योजिले. ही वस्तुस्थिती लक्षात न घेतल्यास, साम्राज्यशाहीविरोधी चळवळीत अहिंसेवर कटाक्षाने भर देणाऱ्या गांधीजींना पहिल्या महायुद्धकाळी साम्राज्यशाहीकडून सैन्यभरतीचे काम करताना विवेकबुद्धीची यत्किंचितही टोचणी का लागली नाही याचा उलगडा होणार नाही.

(५) खेड्यांतील गरिबांच्याच नव्हे; तर कामगारवर्ग व इतर वर्ग यांच्या संबंधात देखील त्यांचा दृष्टिकोन प्रत्यक्षात भांडवलदारवर्गाला पोषकच होता. भांडवलदार हा एक विश्वस्त आहे असा त्यांचा सिद्धान्त, राजकीय कार्यासाठी काही नैतिक मूल्ये मार्गदर्शक राहावीत असा त्यांचा आग्रह, आपल्या विधिमंडळबाह्य कार्यक्रमाची विधिमंडळान्तर्गत कार्यक्रमाशी सांगड घालताना (सत्याग्रह व विधायक कार्यक्रम) त्यांनी दाखविलेली सफाई, शत्रुविरुद्ध जनआंदोलनाचे नेतृत्व करतांनादेखील तडजोडीचे राजकारण खेळण्याची त्यांची वैशिष्ट्यपूर्ण गांधीवादी पद्धत हे सर्व प्रत्यक्षात भांडवलदारवर्गाच्या पुढील कार्यासाठी अतिशय उपयुक्त ठरले

(अ) साम्राज्यशाहीच्या विरोधात जनतेला जागृत करणे आणि

(ब) जनतेला क्रांतिकारी मार्ग अवलंबिण्यापासून परावृत्त करणे ही ती कार्य होत.

जनतेला जागृत करीत असतानाच तिला थोपवून धरण्यासाठी एकीकडे साम्राज्यशाहीविरोधी लढा देत असताना त्याचवेळी साम्राज्यशाही राज्यकर्त्यांशी बोलणी करणे या बाबतीतल्या त्यांच्या कौशल्यामुळे ते भांडवलदारवर्गाचे निर्विवाद पुढारी ठरले. भांडवलदारवर्गातील सर्व गट व घटक यांचा विश्वास त्यांच्या ठायी असल्यामुळेच ते त्या सर्वांना एकत्र आणून कार्यप्रवण करु शकले.

सरतेशेवटी, इतिहासातील त्यांचे कार्य हे भांडवलदार वर्गाचे सर्वश्रेष्ठ पुढारी म्हणून असले तरी प्रत्येक वेळी प्रत्येक मुद्यावर भांडवलदारवर्गाशी ते सहमत होते असा याचा अर्थ नाही. याउलट; ज्या वर्गाचे ते मित्र, तत्वनेत्ते व मार्गदर्शक होते त्या भांडवलदारवर्गातदेखील अनेक मुद्यांवर व अनेक प्रसंगी त्यांचा सूर हा सर्वस्वी एकटा नसला तरी अल्पमतात असे हे त्यांचे व भांडवलदारवर्गाचेही वैशिष्टच होते. अशा मतभेदाच्या प्रसंगी, आपण तात्पुरते वेगवेगळचा मार्गांनी जाऊ असे ते आपसात ठरवून घेत असत. उदा. पहिल्या असहकारानंतरचा काळ (स्वराज्यवादी आणि नाफेर यांच्या कार्यातील वाटणी) ; १९३२–३३ च्या सविनय कायदेभंगानंतरचा काळ; दुसऱ्या महायुद्धकाळातील मतभेदांचे अनेक प्रसंग आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधीचा व नंतरचा काही महिन्यांचा काळ. वरील सर्व प्रसंगी वारंवार आढळते ते हेच.

त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात तर वरील धोरणाची सत्यता प्रकर्षाने आढळून येते. या काळात त्यांच्या आदर्शवादाचा सरदार पटेलांच्या पोलादी मनोवृत्तीशी व व्यावहारिकतेशी ' संघर्ष घडून आला. पंडित नेहरुंसारख्या जहाल बुद्धीवाद्याच्या आधुनिकतेशी इतकेच नव्हे तर अनेक वर्षे त्यांचे शिष्य म्हणून राहिलेल्या सहकाऱ्यांशीदेखील त्यांच्या आदर्शवादाचा अनेकदा संघर्ष झालाच. महात्मा गांधींचा दुःखद अंत होण्यापूर्वी देखील त्यांच्या सहकाऱ्यांमधील वाढत्या मतभेदांमुळे स्वातंत्र्योत्तर काळात त्यांचे आयुष्य शोकात्म झाले.

त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळातील सहकाऱ्यांशी होणाऱ्या त्यांच्या वाढत्या मतभेदांचे परिशीलन करताना ' गांधीजी–व्यक्ति आणि कार्य ' याचे सर्वदर्शी व वस्तुनिष्ट मूल्यांकन होते. काही नैतिक मूल्यांबाबतचा गांधीजींचा आग्रह हा भांडवलदारवर्गाला सुरुवातीला जरी उपयुक्त ठरला; तरी शेवटी हीच मूल्ये त्यांना अडचणीची वाटू लागली होती ह्या वस्तुस्थितीचे उघड स्वरूप या मतभेदांनीच स्पष्ट होते.

भांडवलदारवर्गाला एकीकडे साम्राज्यवादाला तोंड देण्यासाठी शहरी व ग्रामीण जनतेला कार्यप्रवण करावे लागे; तर दूसरीकडे वाढत्या क्रांतिकारक प्रवृतींना बांध घालावा लागे. त्यावेळी जनतेतील वाढत्या क्रांतिकारी प्रवृतींना बांध ालण्यासाठी गांधीजींनी विकसित केलेल्या अहिंसात्मक प्रतिकाराच्या तंत्राचा

भांडवलदारवर्गाला उपयोग झाला.पुढे भांडवलदारवर्ग व त्याचे साथीदार यांना राज्यसत्ता मिळाली या अर्थाने त्यांचा साम्राज्यशाहीविरोधी लढा यशस्वी झाल्यामुळे त्यांना दुहेरी लढाईला तोंड देण्याची गरज उरली नाही. साम्राज्यशाहीविरुद्ध जे काही लढे पुढे द्यावे लागले असते ते राष्ट्रीय पातळीवरून लढता येण्याजोगे होते. त्यासाठी जनतेला लढ्यात ओढण्याची आवश्यकता नव्हती.

भांडवलदारवर्गाला राज्यसत्ता मिळाली होती; व ती स्वतःच्या वर्गहितासाठीच त्याला वापरायची होती. ह्याच वस्तुस्थितीमुळे भांडवलदारवर्ग व त्याची राज्ययंत्रणा हीं जनतेशी अधिकाधिक संघर्षांत येऊ लागली. सत्ता हस्तगत करण्याचा दुसरा परिणाम हा झाला की भांडवलदारवर्गाच्या सत्तास्थानी असलेल्या पुढाऱ्यांनी स्वतःबरोबरच स्वतःचे मित्र नातेवाईक व स्तुतिपाठक यांच्याही तुंबड्या भरण्यास सुरवात केली; आणि स्वार्थ साधला जात असेल तर कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याची संधी त्यांनी गमावली नाही.

साम्राज्यशाहीविरोधी लढ्यात प्रतिपादिलेल्या आदर्शांना गांधीजी अजूनही चिकटून राहिल्यामुळे बदललेल्या सत्तास्थानांच्या संदर्भात भांडवलदारवर्ग व त्याच्या प्रातिनिधिक व्यक्ति यांच्याशी गांधीजींचा संघर्ष उडाला. साम्राज्यशाहीविरोधी लढ्याच्या काळात त्यांनी प्रतिपादिलेली नैतिक मूल्ये ही सत्तेवर आलेल्या पुढाऱ्यांच्या मार्गातील धोंड ठरु लागली. गांधीजी स्वतःच्या नैतिक मूल्यांशी प्रामाणिक राहिले व त्यांच्या एकेकाळच्या शिष्य व सहकाऱ्यांमध्ये झालेल्या आकास्मिक परिवर्तनाशीं ते सहमत होऊ शकले नाहीत. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रश्न व काँग्रेसमधील भ्रष्टाचाराचा प्रश्न या दोन बाबतीत ही गोष्ट विशेषकरुन लागू होते.

शेवटी एवढेच म्हणावे लागते की साम्राज्यशाहीविरोधी लढ्याच्या काळात गांधीजींचे जे आदर्श होते व ज्यांना ते चिकटून राहिले होते; ते आदर्श भांडवलदारवर्गाला उपयुक्त असे राजकीय शस्त्र ठरले : आणि ह्याच कारणामुळे मुख्यतः गांधीजी हे 'राष्ट्रपिता' ठरले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांचा आदर्शवाद हा भांडवलदारवर्गाच्या स्वार्थांच्या आड येऊ लागल्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात गांधीजी भांडवलदारवर्गापासून अलग; जवळजवळ एकाकी पडले !



१४. गांधीजीनंतरचा गांधीवाद

गांधीजींची जीवितयात्रा संपून आज (१९५९) जवळजवळ दहा वर्षे झाली आहेत. गांधीजींच्या विचारप्रणालीचे आज स्थान काय ?– असा प्रश्न उद्‌भवणे साहजिक आहे.

यासंबंधी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की गांधीजींचे कित्येक अनुयायी व सहकारी आज आपल्यात असून गांधीवादी तत्त्वज्ञानाचे ते प्रमुख भाष्यकार मानले जातात. परंतू गांधीवादी तत्त्वज्ञानाचे सारतत्व काय ह्या विषयी त्यांचे एकमत आजही दिसुन येत नाही. एवढेच काय; दैनंदिन जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नाची उकल करण्याकरिता हे तत्त्वज्ञान कसे लागू करावे या विषयी देखील त्यांचे एकमत नाही. त्याचे कित्येक शिष्य व अनुयायी असे आहेत जे स्वतः गाँधी-प्रणीत आदर्शाशी एकनिष्ठ असल्याचा दावा करतात आणि त्याचबरोब इतर लोक त्या आदर्शाशी प्रतारणा करीत आहेत अशी टीकाही करतात, असे या पुस्तकाच्या सुरवातीलाच नमूद केलेले आहे.

गांधीवादाचे सारतत्त्व काय व ते आजच्या प्रश्नाँना कशा पध्दतीने लागू करावे याविषयी गांधीजींच्या कित्येक शिष्यांमध्ये मतभेद असले तरी त्यांपैकी विनोबा भावे हे गांधीजींचे खरे अनुयायी व वारस होत ; हे सर्वच एकमताने मान्य करतात.

१९४० साली वैयक्तिक सत्याग्रही म्हणून गांधींनी विनोबांची निवड केली आणि त्यावेळी प्रथमच गांधीजींचे आदर्श व सिद्धान्त यांचे पालन करणारे एकमेव निःस्वार्थी व संयमी कार्यकर्ते म्हणून लोकांना त्यांचा परिचय झाला.

यानंतर एकदम एक दशकानंतर त्यांचे नाव पुन्हा झळकले. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा अत्यंत महत्वाचा प्रश्न म्हणजे जमीन-वाटप. तो सोडविण्याच्या दृष्टीने १९५१ साली त्यांनी सुरू केलेली भूदान चळवळ हा गांधीवादी तत्व-ज्ञानाचा वस्तुपाठच होता. जमीनदारांना जबरदस्तीने जमिनीचा ताबा सोडायला भाग पाडून ती शेतक-यांना वाटून देण्याच्या कष्टप्रद मार्गाला पर्यायी म्हणून ह्या चळवळीचा गौरव करण्यात आला. जमीन-वाटपाचा प्रश्न वैधानिक मार्गाने सोडविण्याचा काँग्रेस सरकारचा इरादा होता. वैधानिक मार्ग असो किंवा कम्युनिस्टांनी तेलंगणात उभारलेल्या चळवळीसारखा लढाऊ मार्ग असो; दोहोत फारसे अंतर नाही.

ज्याप्रमाणे एखादा प्रश्न सोडविण्यासाठी काही बुद्धिवंत गांधीजीकडे जात असत त्याचप्रमाणे विनोबांकडेही अनेक बुद्धिवंत आकृष्ट झाले. जमीन-वाटप किंवा इतरही प्रश्न सोडविण्याचा परिणामकारक मार्ग 'जनशक्ती' हाच असल्याचा संदेश

या बुद्धिवंतांनीं विनोबांकडून ऐकला. मंत्री, प्राध्यापक किंवा इतर प्रतिष्ठीत व्यक्ती त्यांना अशा चळवळींचे नेते म्हणून गौरवू लागल्या; व या चळवळीच्या अहिंसक स्वरूपातून एक वर्गहिन व जातिविरहित समाज स्थापण्याचे त्यांचे उद्दिष्ट पूर्ण होईल असे मानू लागल्या.

महात्मा गांधींचे एकमेव पट्टशिष्य विनोबा भावे आहेत एवढा एक मुद्दा वगळल्यास इतर कोणत्याही मुद्यावर गांधीवादी पंथाच्या आजच्या पुढाऱ्यांचे मतैक्य होत नाही. आजच्या जागतिक प्रश्नांवद्दल गांधीवाद्यांची अगदी विपरित वा विरोधी मते दिसून येतील. त्यांच्यात 'सहप्रवासी' व 'छुपे कम्युनिस्ट' गणले जातील असे लोक आहेत; तसेच निदान खाजगी रीतीने तरी जगातील सुप्रसिद्ध कम्युनिस्ट-विरोधकांप्रमाणेच मते व्यक्त करणारे लोकही आहेत. अंतर्गत आर्थिक किंवा राजकीय प्रश्नांवर विभिन्न मते प्रदर्शित करणारेही अनेक गांधीवादी आहेत. यात भिन्नभिन्न राजकीय पक्षांचे सदस्य व पुढारी यांचाही समावेश होतो. काही असेही लोक आहेत, ज्यांनी साम्राज्यशाहीविरोधी लढ्यात गांधीजींना विरोध केला होता; पण आता मात्र जे स्वतःला गांधींचे अनुयायी म्हणवून घेत आहेत. आणि वर गांधीजींचे पूर्वाश्रमीचे शिष्य गांधीवादी तत्वे पाळत नसल्यावद्दल त्यांचा निषेधही करीत आहेत.

तेव्हा प्रश्न असा उद्भवतो की गांधीवादी पंथात असा गोंधळ का व्हावा? गांधीजींचे अनुयायी आपापसात भांडतात तरी कशासाठी ? ही इतिहासाची पुनरावृत्तीच म्हणावी काय? जो धर्मदूत आपल्या शिष्यसमुदायाचे ऐक्य साधण्यासाठी जीवन वेचतो त्याच्या मृत्यूनंतर ह्याच शिष्यांनी एकमेकांवर तुटून का पडावे? आणि असे असूनही त्यांच्यातल्याच विनोबांसारख्या एकाला गांधीजींचा खरा शिष्य व वारस म्हणून गौरवतांना त्यांचे एकमत होते तरी कसे ? पुन्हा; नेमक्या ज्यावेळी महात्माजींचे शिष्य सध्याच्या प्रश्नांना त्यांची शिकवण लागू करण्याचा योग्य मार्ग कोणता या प्रश्नावर भांडत आहेत; त्याचवेळी साम्राज्य शाहीविरोधी लढ्यात गांधीजींना विरोध करणारे लोक त्यांच्या नावाची शपथ घेऊन त्यांचे अनुयायी असल्याचा दावा करीत आहेत—याची संगती तरी कशी लावणार ?

या प्रश्नांच्या उत्तराकरिता गांधीवादाचे सारतत्व काय हे कळणे आवश्यक आहे. समाजातील सध्याचे प्रश्न सोडविण्यासाठी सत्य व अहिंसा या तत्वांचा आधार घ्यायचा हेच गांधीवादाचे सार आहे असे सामान्यतः उत्तर येईल. अर्थात हे बरोबरच आहे. पण यातून लगेच दुसरा प्रश्न उद्भवतो— " पूर्ण सत्य किंवा संपूर्ण नैतिकता यासारखे खरोखरी काही आहे काय? सध्याच्या जीवनसमस्यांसाठी ही तत्वे लागू करण्याचे ठराविकच मार्ग आहेत का "? उदा. पहिल्या महायुद्धा

त भाग घेणे गांधीजींना पापमय वाटले नाही; उलट ब्रिटिशांच्या बाजूने सैन्यभरती करण्यात त्यांनी सक्रिय भाग घेतला. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मात्र ब्रिटिशांच्या युद्धकार्यात सहभागी होणे हे त्यांना पूर्णपणे अनैतिक वाटत होते. ह्यातील सत्य कोणते? जे पूर्वी नैतिक होते ते नंतर अनैतिक कसे झाले. १९२१ मध्ये ब्रिटिश सरकारचा 'सैतानी' सरकार म्हणून धिःकार करणाऱ्या व विधिमंडळावर बहिष्कार घालणाऱ्या गांधीजींनी नाफेरवाद्यांवरील आपल्या प्रभावाचा उपयोग करुन स्वराज्यवाद्यांना विधिमंडळात कार्य करु दिले ह्यात कोणत्या सत्याला ते चिकटून राहिले? चौरीचौरा येथे दंगा झाला म्हणून सविनय कायदेभंग व इतर जनआंदोलने रद्द करण्याचे आदेश देणाऱ्या गांधीजींना प्रांतीय मंत्रीमंडळाच्या; जनतेला गोळचा घालण्याच्या, उपायांचे समर्थन करतांना काहीच संकोच वाटला नाही. हे अहिंसापालन होते काय? या सर्व गोष्टींमध्ये त्यांनी घेतलेल्या परस्पर-विरोधी भूमिकेत कुठेही पूर्ण सत्य, पूर्ण अहिंसा किंवा नैतिकता इत्यादि तत्वांचे सुसंगत पालन दिसून येते का? हे सर्व प्रश्न पुस्तकाच्या सुरूवातीलाच उपस्थित केलेले आहेत. आता आपण या कहाणीच्या शेवटास आलो असल्यामुळे ह्या चर्चेचा सारांश काढून असे म्हणू शकतो की, अगदी सामान्य मानवाप्रमाणेच सत्य, अहिंसा, नैतिकता ह्या गोष्टी गांधीजींनाही पूर्ण वाटत नसून ह्या बाबतीतल्या त्यांच्याही कल्पना सापेक्षच होत्या. त्यांनी प्रत्येक तत्वाची अग्निपरीक्षा केलेली आहे. देशाच्या व्यापक हितरक्षणाच्या दृष्टिने एकच गोष्ट त्यांना सत्य व नैतिक वाटत होती व तीं म्हणजे शांततामय व अहिंसक मार्गाने ब्रिटिश साम्राज्यवादाचा शेवट करणे. हीच त्यांच्या सत्य व नैतिक मार्गाची कसोटी होती.

म्हणून, गांधीजी परमसत्य व अहिंसा याचेच पालन करीत होते असे जर कोणी म्हणत असेल तर ते खरे नाही. गांधीजींचे अनुयायी व सहकारी हे त्यांच्या सिद्धांताचे व नैतिकनियमांचे सच्चे भक्त होते असे म्हणणे हे देखील सत्याचा विपर्यासच होय.

पहिल्या महायुद्धकाळी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांकरिता सैन्यभरती करणे ही नैतिकता होती; कारण गांधीजींनी त्याचवेळी म्हटल्याप्रमाणे ब्रिटिश साम्राज्य-रक्षणासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या वैयक्तिक त्यागामुळे त्यांचे व साम्राज्यान्तर्गत स्वायत्तता मिळविण्यासाठी लढणाऱ्यांचे हात बळकट होतील. ह्याउलट दुसऱ्या महायुद्धात भाग घेणे अनैतिक होते; कारण बदललेल्या परिस्थितीत लढचाचा धाक दाखविणे हाच स्वातंत्र्यलढा बळकट करण्याचा उत्तम मार्ग होता. चळवळीच्या काही अवस्थांमध्ये युद्धकार्यात भाग घेण्याच्या अटीवर, स्वतःला वगळून काँग्रेसला ब्रिटिशांशी तडजोड करु देण्याची परवानगी देणे ही परस्पर

विरोधी गोष्टदेखील डावपेचांचाच एक भाग होता. जरुर पडल्यास ब्रिटिशांविरूद्ध लढा उभारता यावा यासाठी स्वतः मोकळे राहावे हा त्यामागचा उद्देश. 'सैतान' सरकारविषयी व त्याच्या विधिमंडळ व इतर अंगांविषयीही गांधीजींची भूमिका अशीच होती. सरकारी यंत्रणेवर बहिष्कार घालावयासाठी १९२१ मध्ये गांधीजी-नी प्रयत्न केले. परंतु नंतर मात्र व्हॉईसरॉय आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करण्यात ते एक मुत्सद्दी म्हणूनच यशस्वी ठरले.

गांधीजी नेहमीच पूर्ण सत्य व पूर्ण नैतिकता यांना चिकटून असत असे म्हणणे अप्रामाणिकपणाचे ठरेल. गांधीजींचे शिष्य व अनुयायी हे गांधीजींच्या हरएक कृती-उक्तीशी प्रामाणिक होते असा दावा करणे हे देखील तितकेच अप्रामाणिक-पणाचे होईल. याउलट; गांधीजींच्या सहकाऱ्यांत व अनुयायांत असे कित्येक लोक होते जे खाजगीत 'गांधीवादी खूळ' म्हणून त्यांची हेटाळणी करीत. अहिंसा हे तत्व की धोरण याविषयी झालेली सुप्रसिद्ध चर्चा व "गांधीजींकरिता ते तत्व होते; पण इतरांकरिता धोरण" ही त्या चर्चेत त्यांच्या अनेक अनुयायांनी घेतलेली भूमिका यांवरुन गांधीजी व त्यांचे अनुयायी हे गांधीवादी म्हणविल्या जाणाऱ्या मूलभूत सिद्धान्तांशी कितपत प्रामाणिक होते याची तुलनात्मक कल्पना येते. सत्य, अहिंसा, नैतिकता या तत्वांचा उपयोग साम्राज्यशाहीविरोधी लढ्यासाठी कशा रीतीने करावयाचा याबद्दल भांडवलदार वर्गाचीच कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. आणि यातूनच, भांडवलदारवर्गाला ते एकत्र कसे करु शकले याचे रहस्य उलगडते. कष्टकरी जनतेला जागृत करुन ब्रिटिशांविरूद्धच्या लढ्यात त्यांची एकजूट तर करावयाची; पण भांडवलदारांचे हितसंबंध सुरक्षित राहातील इतपतच जनतेची चळवळ मर्यादित ठेवायची– हे त्यांचे कौशल्य भांडवलदारवर्गाने वाखाणले आहे. साम्राज्यशाहीविरोधी लढ्याच्या लाटेला ज्याप्रमाणे भरती ओहोटी येई, त्याप्रमाणे गांधीजी जनतेची नाडी ओळखून ब्रिटिशांशी संबंध ठेवीत. या दोन्ही संबंधांचा उपयोग जनतेमध्ये साम्राज्यशाहीविरोधी लढ्याची मशाल पेटती ठेवण्यास करीत असतानाच, जनतेने उग्र रूप धारण केल्यास तिच्या ज्वालांनी ज्या वर्गाचे हितसंबंध नष्ट होण्याची भीती होती त्या वर्गाला निर्भय ठेवण्याची काळजी त्यांनी घेतली.

सत्य, अहिंसा, नैतिकता या तत्वांचा उपयोग ह्या विशिष्ट पद्धतीने करण्यामुळेच भांडवलदारवर्गाच्या खऱ्या प्रतिनिधींनी 'पुढारी' म्हणून त्यांचा गौरव केला-त्यांनी प्रतिपादिलेल्या तत्वांबाबत स्वतःची मते राखून ठेवून !

ऑगस्ट १९४७ मध्ये परिस्थितीत मूलभूत परिवर्तन झाले असल्यामुळे जूनाच पवित्रा ठेवणे हे भांडवलदारवर्गाला आता आवश्यक राहिले नव्हते. म्हणून

गांधीजी व त्यांचे सहकारी यामधील मतभेद वाढत राहिले. राज्यसत्ता हाती आल्यामुळे जनआंदोलनाची इतःपर काहीच आवश्यकता नाही असे हे सहकारी म्हणत; किंवहुना जनआंदोलन हा त्यांच्याकरिता वस्तुतः एक अडथळाच होईल अशी काँग्रेसमंत्र्यांना सार्थ भीतीच वाटत होती. आर्थिक व सामाजिक पद्धतीत अपेक्षित असलेली सुधारणा राज्यसत्तेचा उपयोग करुन घडवून आणता येईल अशी त्यांची कल्पना होती. तथापि गांधीजी मात्र या बाबतीत आशावादी नव्हते. सत्तेचे हस्तांतरण होण्याच्या सुमारास आणि नंतर झालेल्या घडामोडींमुळे मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे गांधीजी अत्यंत व्यथित झाले होते. बदललेल्या परिस्थितीत आपल्या तत्वांची पुनर्रचना करणे त्यांना आवश्यक वाटले. त्यांना झालेल्या ह्या जाणिवेतूनच स्वतंत्र भारतात घडणाऱ्या घटनांना उद्देशूनच त्यांनी आपली प्रसिद्ध सूचना मांडली. ती म्हणजे अशा एका राजकारणविरहित 'लोक-सहायक संघात' काँग्रेसचे परिवर्तन करणे; जो जनतेच्या सेवाकार्याला सर्वस्वी वाहून घेईल.

काँग्रेसचे राजकारणरहित संघटनेत रूपांतर करण्याची कल्पना काँग्रेस पुढाऱ्यांनी फेटाळून लावली. राजकीय सत्ता मिळविण्यासाठी अनेक दशके लढलेल्या संघटनेने नव्याने मिळालेल्या राज्यसत्तेचा उपयोग राष्ट्रीय विकासासाठी न करणे हे पुढाऱ्यांना हास्यास्पद वाटू लागले. म्हणून काँग्रेस पुढाऱ्यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी हाती आलेल्या राज्ययंत्रणेचा उपयोग भारताच्या पुनर्निर्माणाकरिता त्यांना योग्य वाटेल त्या मार्गाने (गांधीजींच्या तत्वांविरूद्ध) करुन घेण्याचा कार्यक्रम आपल्यासमोर ठेवला.

तथापि; गांधीजींच्या काही मोजक्या निकटतम अनुयायांनी गांधीजींची कल्पना उचलली व 'सर्व सेवा संघ' या नावाने कार्य करण्याचे त्यांनी ठरवीले. नवीन राजकीय व्यवस्थेतील सत्तेच्या कोणत्याही पदाची अभिलाषा न बाळगण्याची त्यांनी शपथ घेतली. खासदार, आमदार, मंत्रीपदे वगैरे मानाच्या जागा त्यांनी कस्पटासमान मानल्या. गांधीजींनी आपल्या आयुष्यकाळात विकसित केलेल्या विधायक कार्यक्रमानुसार जनतेची सेवा करण्यासाठी स्वतःला वाहुन घेण्याचे त्यांनी ठरविले. बदललेल्या नव्या परिस्थितीनूरूप खादी, ग्रामोद्योग, बुनियादी शिक्षण याविषयी सुधारणा करून हा कार्यक्रम हाती घेण्याचे त्यांनी ठरविले. दुसऱ्या शब्दात, स्वातंत्र्योतर काळात काँग्रेसने जसे कार्य करावे अशी गांधीजींची इच्छा होती. तसेच कार्य 'सर्व सेवा संघ' करू लागला.

आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली सर्वोदय कार्यकर्त्यांच्या कार्या-तूनच एका नव्या चळवळीचा उगम झाला व ती म्हणजे 'भूदान' चळवळ.

ज्या परिस्थितीत ही चळवळ सुरू करण्यात आली ती परिस्थिती सर्वविदितच आहे. तेलंगणाचे जे शेतकरी सुरूवातीला निझामशाहीविरूध्द उठले आणि निझाम-विरोधी चळवळीच्या ओघातच ज्यांनी जमीनदारांचा निःपात करून जमिनीचे फेरवाटप केले ते निझामशाहीनंतर आलेल्या काँग्रेस राजवटीच्याही विरोधात झाले. जमीनदारांकडून काढून घेतलेल्या जमिनी ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यात आणि ही चळवळ दडपण्यासाठी नेमलेल्या पोलिसांत हिंसात्मक संघर्ष उडाले. डझनावारी लोक ठार झाले; शेकडोंना अटक झाली आणि आतंकाचे इतर प्रकारही लढचात वापरले गेले.

हचा घडामोडीनीच आचार्य विनोवा भावे यांना जनतेची ही दुःखे नाहीशी कशी करता येतील या दृष्टीने विचार करण्यास उद्युक्त केले. या विचारमंथनातून बाहेर पडलेला तोडगा हा वैशिष्ट्यपूर्ण असा गांधीवादी नमुनाच होता. कम्युनिस्ट नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी वापरलेला जमिनी हिसकण्याचा क्रांतिकारी मार्गच नव्हे ; तर काँग्रेस सरकारने विधिमंडळाद्वारे जमीनविषयक सुधारणा घडवुन आणण्याचा वैधानिक मार्गही त्यांनी फेटाळून लावला. सामाजिक प्रश्न सोडविण्याचे हे दोन्ही मार्ग हिंसात्मक होते—पहिला, जन आंदोलनाचा उपयोग करावा लागणार म्हणून ; तर दुसरा राज्ययंत्रणेचा उपयोग करण्यातून बहुसंख्याकांच्या संघटित सामर्थ्याचा वापर अल्पमतवाल्यांविरूध्द करावा लागणार म्हणून ! तेव्हा, ज्यांच्याजवळ जमीन आहे. त्यांनी ती उत्स्फूर्तपणे सोडून द्यावी असा उपदेश विनोबांनी केला. "प्रत्येकमनुष्याने स्वतःजवळच्या १।६ जमिनीचा भूमिहीनांसाठी त्याग करावा"— ही सुप्रसिध्द घोषणा विनोबांनी दिली. क्रांतिकारी मार्गाने जमीन हिसकण्याच्या शेतकऱ्यांच्या मार्गाला व त्याचबरोबर विधिमंडळाद्वारे जमीनवाटप करण्याच्या मार्गालाही ही घोषणा पर्यायी होती. जमिनीचा पश्न सोडविण्यासाठी 'राजशक्ती' ऐवजी 'जनशक्ती' चा उपयोग हे भूदानाचे सारतत्त्व होय !

हीच भूदान चळवळ निरनिराळ्या अवस्थामधून गेली आणि ग्रामदानांची चळवळ बनली. भूदान चळवळीच्या अवस्थेत १।६ जमीन सोडण्यावरच विनोबा संतुष्ट होते; तर तेवढ्यावरच समाधान न मानता, प्रत्येकाने स्वतःची संपूर्ण संपत्ती सोडून द्यावी असे ते आता म्हणू लागले. खाजगी संपत्तीचा अधिकार रद्द करणे, खेड्यातील संपूर्ण जमीन जनतेची संपत्ती म्हणून एकत्रित करणे, खेड्यातील जमिनीची एकत्र मशागत करून त्यातील उत्पन्नाची समान वाटणी करणे, खेड्यातील जनतेच्या सर्वसाधारण हितासाठी ग्रामोद्योग व उपजीविकेची इतर साधने संघटितरीत्या निर्माण करणे — थोडक्यात हेच चित्र ग्रामदानासंबंधी बोलतांना विनोबांनी रेखाटले आहे.

साम्राज्यशाहीविरोधी लढयाच्या काळातील प्रश्नांसाठी गांधीजींनी जी तत्त्वे वापरली त्याच तत्त्वांचा वापर आपल्या देशातील स्वातंत्र्योत्तर काळातील मुख्य प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामदानचळवळीद्वारा करण्यात आला असे सर्वार्थानी म्हणता येईल. विनोबांनी जनतेपुढे ठेवलेले उद्दिष्ट हे समाजवादी किंवा कम्युनिस्टांप्रमाणेच क्रांतिकारी आहे. " प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे आणि प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेप्रमाणे " हेच मूलभूत तत्त्व त्यात आहे. मार्क्सवाद्याच्या मते हे तत्व समाजवादाच्या प्रगत अवस्थेत म्हणजेच त्याच्या कम्युनिस्ट अवस्थेतच केवळ लागू करता येईल. तथापि ; **कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली असलेल्या कामकरीवर्गाने प्रदीर्घ राजकीय लढा दिल्यानंतर ; पिळल्या व शोषल्या जाणाऱ्या प्रजेचे राज्य करणाऱ्या वर्गात परिवर्तन घडवून आणल्यानंतर ; कामगारवर्गाची अधिसत्ता स्थापून त्याद्वारा वर्गभेद नष्ट केल्यानंतर ' प्रत्येकाला त्याच्या गरजे नुरूप ' हे उद्दिष्ट गाठणे प्रत्यक्षात शक्य व्हावे इतका समाजाच्या उत्पादनशक्तीचा विकास करून ते न गाठता केवळ युक्तिवाद व हृदयपरिवर्तन याद्वारा ते गाठावयाचे. ग्रामदानाचे किंवा नव्या अवस्थेतील गांधीवादाचे सारतत्त्व हेच आहे ; आणि इथेच गांधीवाद हा मार्क्सवादापासून सर्वतोपरी भिन्न आहे.**

आपल्या देशाला भेडसाविणारे सामाजिक प्रश्न सोडविण्याचा एकमेव आणि योग्य मार्ग आपल्याला सापडला आहे– तो म्हणजे ग्रामदान, असा विनोबाजी व त्यांच्या अनुयायांचा दावा आहे. तथापि हा दावा काँग्रेस पुढाऱ्यांनीही मान्य केला नाही किंवा प्र. सो. पा. व कम्युनिस्टांसारख्या डाव्या पक्षांनीही मान्य केला नाही. जमिनीच्या खाजगी मालकीचें दुष्परिणाम आणि संबंध ग्रामीण जीवनाच्या पुनर्गठनाची आवश्यकता याबाबत भाव्यांच्या शिकवणुकीची मदत आर्थिक किंवा सामाजिक परिवर्तनासाठी होईल हे मान्य करुनही हे परिवर्तन राज्ययंत्रणेशिवाय कोणीहीं प्रत्यक्षात आणू शकत नाहीं असे ते म्हणतात. भावे आणि त्यांच्या ग्रामदानचळवळीला काहीसे यश मिळालें असले तरी ; बडया जमीनदारांनी जमिनींवरचा हक्क सोडून द्यावा– हया त्यांच्या हाकेला जमीनदारांनी प्रतिसाद दिला नाही हे मात्र खरे म्हणूनच ग्रामदान चळवळसंबंधी चर्चा करण्यासाठी भाव्यांनी बोलावलेल्या राजकीय पुढाऱ्यांच्या ' म्हैसूर परिषदे ' त स्पष्टपणे सांगण्यात आले की, निरनिराळया पक्षाच्या पुढाऱ्यांना हया चळवळीविषयी पूर्ण आस्था असली तरीही जमीनसुधारणा, सहकारी चळवळींची संघटना यासारख्या सरकारी उपायांना हा मार्ग पर्यायी ठरू शकत नाहीं. आर्थिक व सामाजिक बदल उत्स्फूर्तपणे घडवून आणण्यासाठी भाव्यांनी सुरू केलेली चळवळ व सरकारी उपाय हे परस्परपूरक असल्याचे मान्य करण्यात आले.

आपल्या देशाच्या आर्थिक सामाजिक रोगांवरचा एकमेव रामबाण उपाय ग्रामदानच होय असे भावे व त्यांचे सहकारी मानतात परंतु गांधीजींच्या सहकाऱ्यांपैकी बहुतेकांना तसे वाटत नाही, हे ह्या संबंधात उल्लेखनीय आहे. ज्या लोकांचा आज जनशक्तीपेक्षा राजशक्तीवर विनोबांपेक्षा अधिक विश्वास आहे त्या लोकांचेच गांधीजींशी वरेच वेळा व बऱ्याच मुद्यांवर मतभेद झाले होते हे देखील तितकेच उल्लेखनीय आहे. विधिमंडळ व निवडणूका याबाबत असलेली भूमिका, युध्दात भाग घेण्याविषयीची भूमिका, राजकारणरहित संघटनेत काँग्रेसचे परिवर्तन करण्याची भूमिका– हे ते मुद्दे होत. गांधीजींच्या नेतृत्वाला मान्यता देऊन आपल्या कार्याला गांधीवादी अधिष्ठान देणे हे राजकीय सत्ता काबीज करण्याचे केवळ एक साधन म्हणूनच वापरले गेले असा त्याचा अर्थ आहे. राजकीय सत्ता काबीज करणे हे ध्येय गाठायला मदत झाली म्हणूनच सत्य, अहिंसा, नैतिकता वगैरे गांधीजींची तत्वे मान्य केली गेली. आजदेखील राजकीय सत्ता व तिचा उपयोग सोडून द्यावयास ते तयार नाहीत ; कारण आर्थिक-सामाजिक परिवर्तनाचे यशापयश हे सत्ता कोण काबीज करतो कोण तिचा वापर करतो ह्यावरच अवलंबून आहे, हे सत्य कट्टर वास्तववादी भूमिकेमुळे ते जाणतात.

राजकीय सत्ता हेच आर्थिक–सामाजिक परिवर्तनाच्या लढयाचे मूलभूत व अत्यावश्यक साधन आहे हे कम्युनिस्ट, सोशालिस्ट व इतर डावे पक्ष यांना मान्य आहे. मार्क्सवादाच्या संस्थापकांनी एक शतकापूर्वीच जाहीर केल्याप्रमाणे, कोणताही वर्ग उत्स्फूर्तपणे सत्ता सोडत नसतो. भावे किंवा त्यांच्यासारख्या एकटयादुकटया आदर्शवाद्याच्या उदात्त शिकवणुकीने भारून जाऊन तुरळक एखादीदुसरी व्यक्ती सत्ता–संपत्ती फेकून देईल. परंतु **वर्ग या नात्याने जमीनदार, मांडवलदार व इतर शोषक वर्ग हे आदर्शवाद्यांनी कल्पिलेल्या व कृतिशील क्रांतिकारकांच्या लढयाचे मोल घेतलेल्या आर्थिक सामाजिक परिवर्तनापुढे आपणहून कधीही नमणार नाहीत.** आणि म्हणूनच भावे व त्यांच्या सहकाऱ्यांना ते सूयश चिततील ; **ग्रामदान चळवळीच्या आदर्शांच्या प्रचाराकरिता त्यांच्या परीने प्रयत्नही करतील ; परंतु राजकीय सत्ता काबीज करण्यासाठी सुरू असलेला त्यांचा लढा ते कधीही सोडून देणार नाहीत.**

REFBK-0023267

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
दा. क्र. निबंध
2329
शाखा